
इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या त्रैमासिक प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. ६० व्या वर्षातील हा अंक सप्टेंबर १९९२, आश्विन शके १९१४ या महिन्याचा आहे. या अंकाचे मूल्य दहा रुपये असून वार्षिक वर्गणी पस्तीस रुपये आहे. मंडळाच्या आजीव सदस्यत्वाची वर्गणी तीनशे रुपये आहे. या अंकाचे संपादन प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे, प्रा. डॉ. मु. ब. शहा व प्रा.ब.ग. हजिरनीस यांनी केले आहे.

संशोधक

सप्टेंबर १९९२

प. पू. शिवाजीराव भावे यांना श्रद्धांजली



विख्यात सर्वोदयवादी नेते आणि परमपूज्य विनोबाजी भावे यांचे बंधू तसेच इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे माजी अध्यक्ष परमपूज्य शिवाजीराव भावे यांचे २९–६–१९९२ रोजी सकाळी ९ वाजता पवनार आश्रमात दु:खद निधन झाले. हे वृत्त ऐकून इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचा आधारच तुटल्याप्रमाणे वाटले. त्यांच्या निधनाने सर्वोदयवादी चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे. तसेच राजवाडे मंडळासारख्या अनेक सांस्कृतिक संस्थांचे आधारस्थान गमावले आहे. इ. वि. का. राजवाडे मंडळाचे सर्व सभासद, कर्मचारी, तसेच राजवाडे बँकेचे संचालक मंडळ, कर्मचारी हितचिंतक हे सर्व आचार्य शिवाजीराव भावे यांच्या निधनाने त्यांच्या शिष्यगणांवर कोसळलेल्या दु:खात सहभागी आहेत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !

" या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. "

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संशोधक

सप्टेंबर १९९२
आश्विन शके १९१४
वर्ष ६० : अंक ३

संपादक

प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे
प्रा. डॉ. मु. ब. शहा

वार्षिक वर्गणी ३५ रुपये
अंकाचे मूल्य २० रुपये
आजीव वर्गणी ३०० रुपये

अनुक्रमणिका

●

प्रकाशक : डॉ. प्र. न. देशपांडे, मुख्य चिटणीस, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४ ००१

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, पुणे ४११ ०३०.

THE INDIAN VILLAGE AS SEEN BY THE FRENCH TRAVELLERS IN THE 18th CENTURY

Florence D'souza

In the 18th Century after Dupleix was summoned back to France in 1754 & after the Treaty of Paris was signed in 1763, the official French presence in India was quite limited and several hundred Frenchmen who were in India had to seek employment with the Indian princes as military adventurers or set themselves up as traders. This brought them into direct contact with the Indian population and led them to traverse the vast expanses of the Deccan and Hindustan either in search of employment or in the execution of military manoeuvers or in search of sacred texts or in connection with trade. Thus they had the opportunity to observe the Indian village from close quarters in different parts of the country. They were present in India in this unofficial way until 1818 when the British took over the administrative reins of India completely (from the Marathas in particular).

The fact that they did indeed observe the particularities of the Indian village is evident from the fact that they frequently used a specific word - "ALDEE" - when referring to the Indian village. This was perhaps because the Indian village did not correspond in any way with the general layout and organisation of a European or French village of that time. For example Anquetil - Duperron describes the Indian "Aldee" (the term comes from the Portuguese word "Aldea" and was used in French only by those French travellers who wrote about India) as follows: "a small township". And Dr. Brunet gives some interesting details : "a kind of 'bourg' presided over by some headman : the streets and houses of the "Aldees", are very clean and well maintained."

In the introduction to his *Zend Avesta* Anquetil Duperron mentions that in March 1758 : ... "I left the Tchoki (Customs

Checkpoint) of Amarguine at 3 o'clock in the morning. I came across the ALDEE of Dongrinne followed by a river; further up, another river; then theTchoki of Montourguine followed by a river; and about half a COSSE from there Konapour. A large town surrounded with walls, defended by a little fort and is perhaps about 4 leagues from the Tchoki of Embarguine."

The distinction Anquetil makes here between the Tchokis or Customs check-points and the small township or ALDEE of Dongrinne as opposed to the big fortified town of Konapour is particularly interesting.

It must not be forgotten that before the French Revolution the 18th Century French countryside had small villages made up of agriculturalists and land cultivators dependent for their lands on a feudal lord on the one hand; and on the other, larger commercial and administrative centres called "bourgs" where the population consisted of independent traders and craftsmen. The Indian "Alde'e" of the same period appears to have been perceived by the French travellers as a happy blend of these 2 French realities.

Another aspect of the Alde'e administration that attracted the attention of those French observers is the method of land administration, paying of land tax and cultivation rights (or ownership of agricultural land). Around 1740 an important debate was raised in France by M. de Montesquieu (the author of *"Esprit des Lois")* concerning Oriental Despotism. According to Montesquieu all Oriental Monarchs were despots since they were considered to be the sole owners of *all* the land throughout their Kingdoms, and only granted temporary privileges and farming rights to those whom they considered fit. In opposition to this view Voltaire maintained that private land-ownership was a fact in all Oriental and Asiatic States since land could be inherited by sons from their fathers. Those French travellers who were in India around this period felt obliged to situate their own observations on land ownership in India in the framework of these 2 opposite view points. And in fact, the actual system of land farming, cultivation and levying of taxes was so complex and different from all they were familiar with that the French travellers ended up often having a rather confused and contradictory idea of the "Alde'e" land administration - though it has to be underlined that they were aware of its importance and significance in the structure and fabric of 18th Century India.

Charpentier de Cossigny put forward the argument that the very prosperity of the land was proof that each farmer felt personally involved and committed to the prosperity of his little stretch of land, undergoing great pains to ensure its rich production. Cossigny felt that if the land did not belong to the cultivator he would never take so much trouble to cultivate it well.

डॉ. फ्लॉरेन्स डिसूझा

डॉ. फ्लॉरेन्स डिसूझा, पुणे विद्यापीठातून फ्रेंच विषयाची पदवी घेऊन उच्च शिक्षणासाठी फ्रान्सकडे रवाना. पॅरिसच्या प्रख्यात 'सोरबाँन' विद्यापीठातून वाचस्पती ही पदवी ऑक्टोबर, १९९१ मध्ये संपादन केली. संशोधनाचा विषय 'भारतातील फ्रेंच प्रवासी-(१७५७ - १८१८)' असा होता. प्राध्यापक डी.एच. पेजॉ (D. H. Pageaux) यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले होते. सध्या त्यांचे वास्तव्य पॅरिस येथे असून 'इंडो-फ्रेंच' या विषयावर त्या संशोधन करीत आहेत.

THE INDIAN VILLAGE AS SEEN BY THE 18th CENTURY FRENCH TRAVELLERS (SUITE)

According to Abbe' Perrin, Mughal Despotism had become decadent by 1760 and the Central Political Power was being subdivided by local potentates. And in the case of excessive exploitation by these new tyrants the land cultivators would resort to abandoning their lands and moving elsewhere to cultivate other fields.

Law de Lauriston also observed this phenomenon of abandoning of fields in the face of exploitation. Law de Lauriston seems to corroborate the hypothesis formulated by the contemporary historian Andre' Wink (*Land & Sovereignty in India)* according to whom India was never so prosperous as when divided into little principalities, especially concerning the administration of agricultural produce. So for Law de Lauriston also the decadence

of the Central Mughal power was not disadvantageous for Alde'e and agricultural prosperity.

As for the Comte de Modave, he supported Montesquieu's view on Oriental Despotism and opposed Voltaire's theory in favour of private property. Nevertheless, Modave has the honesty to admit that Indian sons did indeed inherit movable property from their fathers, even if land possession and inheritance did not exist in his eyes.

Anquetil Duperron is one of the few French observers of this period who supports Voltaire's views on private land ownership in India. He devoted an entire book *("Legislation Orientale"*- Amsterdam, 1778) to the analysis of this question and was quite vehement in defending the existence of private property (including land) in the Orient. According to Anquetil, this idea of Oriental Despotism and all land belonging only to the Tyrannical Despot was a clever ploy used by Western political experts to justify their own colonisation of Oriental states, since the colonial power was then projected as the civilising liberator of Oriental peasants and agricultural cultivators from the Despotic exploitation of their Monarch.

In actual fact, neither Montesquieu nor Voltaire were completely right and all the French travellers' observations were a commendable attempt to understand the very principle of land rights in India - whereas in Europe land ownership implied ownership of a particular stretch of land, in India the ownership only covered the right to cultivate that land and avail of its produce.

Another aspect of Alde'e life that attracted the attention of the French travellers was the excellent productivity of the land, since one field yielded up to three harvests per year. Many of them devoted much time to observing the agricultural implements, irrigation methods and wide diversity of crops cultivated by the Indian farmers at that time.

Legoux de Flaix, an engineer-agronomist, made detailed notes on the agricultural methods practised by the Indians for the edification of his European readers. For example, here is what he noted on the abundant agricultural yields obtained :

> "In Hindustan, by the influence of the climate, two effective harvests are regularly obtained each year. There are even some more richly endowed regions, which are particularly known to the Europeans, such as the Kingdom of Tanjore situated

towards the south of the Coast of Coromandel; the Kingdom of Maissour placed in between the two branches of the Ghats; the large district of Mangalore in South Kanara, situated towards the top of the Malabar Coast; finally Bengal and Ba'ar, large fertile provinces of the northern part: all these regions produce three successive crops either of wheat or rice or other pulses that I have mentioned in my writings. This extraordinary fertility is due as much to the excellence of the methods followed by the cultivators as to Nature which has endowed these regions so abundantly."

After his travels through India, Commissioner Poivre concluded:

"It is the regions situated to the South and to the West of Hindustan that are the granaries of this vast country and which maintain abundance there. These lands have remained in the hands of the former natural inhabitants of India, whose laws are very favourable to agriculture. The Moghols made vain efforts to take control of these lands (.....)

The Coromandel Coast and the lands depending on them are a small part of the East Indies properly speaking and this part is the most barren and one of the most devastated regions due to the Moghol invasions, due to constant wars that these invaders wage among themselves and due to their destructive government (.......)

The Orissa Coast, the Malabar Coast, the territory of Surat, the banks of the Ganga and the heart of Hindustan have an agricultural richness that is quite different, and agriculture is more flourishing in some of these regions. I am only recounting what circumstances have permitted me to observe for myself."

Abbe' Perrin confirms this general impression of green fertility and rich agricultural production :

"I have already mentioned that no other region in the world was more fertile than this: it must be remembered that vegetation grows constantly, that Nature is always in action, that the Sun forcefully attracts juices, that it spends all its warmth in developing germination, that the abundant night dew makes the land constantly light and malleable with the appropriate degree of humidity. One will then be able to imagine that the fields are covered with greenery, or matted

with ears of grain in all seasons & all times; that the trees are simultaneously loaded with flowers and fruits.

All this is true and is yet but half the truth (.....) What is extraordinary is that this land does not indicate its promises in its physical characteristics - in places it is entirely sandy; in other places it is rich indeed but has the colour and texture of volcanic lava; further up it appears burnt or else seems merely to be the rocky debris of some mountain, being so full of pebbles; and yet everywhere ít yields beyond proportion, beyond all hopes even.... (......)"

The fertility of rural India must have indeed been quite remarkable since it drew such unanimous admiration from the French travellers !

Another point that several French observers noted in relation to the Indian *alde'e* of the time is the great skill of the village artisans. In general, they seem to have found that in a caste society a high degree of technical proficiency and expertise was maintained since the professional secrets, methods and tricks of every trade were meticulously passed on from generation to generation. For example, in the case of the Shana palm toddy tappers Legoux de Flaix and Abbe' Perrin have both noted 4 cms the extreme ability and ease of these professionals in climbing the vertical trunk of the toddy palm and according to them this could only result from a deeply ingrained habit cultivated from a young age. Concerning the Indian textiles (like the nensouque muslins) and the dyeing techniques practised, the Jesuit Gaston Coeurodoux and Legoux de Flaix and Le Gentil de la Galaisiere all felt convinced that such high perfection and specialisation of techniques could only be achieved through the professional continuity ensured by the Caste System of hereditary professions.

Abbe' Perrin also noticed that certain services were rendered in different alde'es by a group of nomadic professionals - for instance the barbers and iron-smiths had a certain network of villages which they regularly visited in turn in order to maintain their clientele. Here is Abbe' Perrin's view on the general functioning of the village artisans :

"I would be never ending if I reported everything concerning the various professions that are practised in the country. To what can the success of the Indian craftsmen be attributed, they who do without so many means which our craftsmen

consider to be indispensable, if it is not an extreme ease of conception together with the most obstinate patience ? They spend their whole lives experimenting; then, what experience has taught them becomes the inheritance of their children, always destined to exercise the same profession as their fathers. In this way, the arts are perfected."

Desvaulx pinpoints one of the important aspects of caste in the functioning of the alde'e society :

"This authority of the castes is also a check which halts any abuse which the Princes could make in the exercise in their princely authority. Shops have been seen to close in a town, all trade can be suspended and even agricultural work halted upon orders from a caste in retaliation against some small insult or against some quite inconsequential extortion made by the Prince of a small domain with regards to a kind of merchant group belonging to that particular caste. In doing so, this caste had only exercised its right in accordance with the customs of the country."

Thus it may be stated that the French observers were aware of the importance of caste, particularly at the Alde'e level, even if they did not seize all the nuances of the functioning of this complex social system.

Finally, they also made observations on the role of the Alde'e administration in relation to the Central Government. This is a key factor in the functioning of India even today at the end of the 20th Century. For example, Anquetil - Duperron agrees with the English writer Dalrymple in considering that :

"..... every village constitutes a small and dynamic community protected by the Central Government, but governed by its own inhabitants".

But Anquetil underlines that it is :

".... from the Prince that the head of a village receives the right of managing the revenues of its products, and the authority he has over the inhabitants." (idem).

The Comte de Modave was also astonished to see that the Indian Alde'es functioned like "little republics". Some of them having their own fortifications and firearms with certain of their members being entrusted with the external security and guarding of their entrances.

In this connection, Modave Law de Lauriston and Abbe' Perrin concur in noting that villages under the administration of Hindu rajas often had a much more flourishing and well organised appearance than villages under the jurisdiction of Muslim Officials. All 3 of these observers seem to be of the opinion that this difference in prosperity was due to the fact that the Hindu village chief or Raja had a personal interest and concern in the well-being of his alde'e whereas very often the Muslim official was simply applying an administrative rule or law, having no personal concern in the well-being of his alde'e - which would indeed appear to be a plausible reason for such a difference. Here is an extract of Abbe' Perrin's concluding point of view on this issue.

> "Indostan is divided into an infinity of little sovereign states; and since the rights of each prince are not based on any written laws, it follows that the people are governed by procedures that vary in degrees of oppression, according to the individual character of the sovereign or according to the whims of his administrators, and the degree of influence that the latter have over their master.
>
> There are therefore some regions where the people are momentarily happier than in others, although really speaking this happiness is only in fact a lesser misfortune, and a more tolerable form of slavery. (.....) Eternal victims of despotism, the name of the authority that exercises the power matters little to them."

In conclusion we may state that most of the French travellers in India in the second half of the 18th Century appear to have been very interested in the administration, tax gathering, land cultivation rights and general functioning of the Indian alde'e since these questions occupy an important place in their writings. Although many of them visited, lived and were employed in the large cities and capitals of the time (like Awadh, Hyderabad, DIG, Gwalior, Pune and Mysore) they seem to have been keenly aware of the significance and importance of rural India's alde'es in the turning of the cogs of the Indian political scene, & in particular, in the gradual disintegration of the centralised Mughal Empire.

References cited :

ANQUETIL DUPERRON — *"Zend Avesta"* Paris 1771.

ANQUETIL DUPERRON — *"Legislation Orientale"* —Amsterdam, 1778.

MONTESQUIEU — *"Esprit des Lois"* —Paris, Garnier 1963.

CHARPENTIER DE COSSIGNY — *Voyage au Bengale* (et notes) — Paris, An VII (1799).

COEURDOUX Gaston — in *Lettres Edifiantes et Curieuses* —Paris, 1841.

DELEURY Guy — *"Les Indes Florissantes"* —Robert Laffont, Collection Bouquins, Paris 1990.

DESVAULX — *Moeurs et Coutumes des Indiens* (1777) - edited by Sylvia Murr, Ecole Francaise d'Extreme Orient - Paris, 1987.

LAW DE LAURISTON — *Memoire sur Quelques Affaires de l'Empire Mogol 1751 - 1756* edited by Alfred Martineau — Paris 1913.

LEGENTIL de la Galaisie're — *"Voyage dans les Mers de l'Inde"* - Switzerland, 1780.

LEGOUX DE FLAIX — *Essai historique Ge'ographique et politique sur l' Indoustan Paris, 1807.*

de MODAVE Louis Federbe — *"Voyage en Inde 1773-1776"* —edited by Jean Deloche, Ecole Francaise d'Extreme Orient, Paris, 1971.

POIVRE Pierre — *"Memoires d'un Voyageur"* —edited by Louis Malleret, Ecole Francaise d'Extre'me Orient, Paris, 1968.

PERRIN Abbe — *"Voyage dans l'Indostan"* — Paris, 1807.


VOLTAIRE — *"Fragments sur l'Inde"* Geneve 1773.


VOLTAIRE — *"Essai sur les Moeurs"* —Paris, Garnier, 1965.


WINK Andre' — *"Land & Sovereignty in India"* —Cambridge University Press, Cambridge, 1986.

श्री सलाबत निजाम यांच्या काळातील एक मजहर पत्र (इ.स.१७५४ ते १७६०)


समुद्रगुप्त पाटील
सावरखेड ब्रास प्लेट, ता. बिलोली, जि. नांदेड







पत्रा क्रमांक २ ताम्रपटाची दुसरी बाजु



24 ठी श्रीमदपे यां मुळधम याजम

25 मुळ जाइला मा याजी करणरची

26 उश्री [illegible] भर [illegible] करण [illegible] गी

27 [illegible] मुळ यामहाराजा पाव

28 पहा जी ओवाय गावच्या मुळ वगव

29 मुळ पत्नी ओम ओम प जवाजी जवदार

30 ४ [illegible] मुळ ४ पाडवा गु (६) चा

31 [illegible] मुरोटी पक्षुम [illegible] र

32 [illegible] मुळ भगर [illegible] च मी पुम प

33 [illegible] मुळ पो [illegible] रा ध

[illegible]

ताम्रपट पत्र क्रमांक ३ रा

1 गावच्या ओवार जपाच्या [illegible]

2 याच्या पच्छम स्थळ ११९० पर ओ गाव

3 [illegible] मळ [illegible] च्या गाव

4 गावच्या मुळ पत्नी [illegible] पच्छम [illegible] रा

5 प [illegible] पथगर गावच्या गीराथा म

6 पत्नीज स्माधे प जहली पच्छम [illegible] मा

7 मधी थर भाजेज जाज मप लाज चाईव

8 भी स्माधप्म पवमा [illegible]

9 [illegible] याची वेजगी स्माधम गमळ

10 जाओ उरीकरारधरा [illegible] र उमा [illegible]

11 रोपी करणजी चोराउ राचा धाम

[illegible] रोजी [illegible] यांचे [illegible]
[illegible] पा [illegible] [illegible]
[illegible] ॥
[illegible] वां [illegible] पां
[illegible] तो [illegible]
[illegible]
[illegible] ॥ [illegible]

[illegible]

पत्र क्रमांक ३ [illegible] दुसरी पत्र

[illegible] पुम [illegible] जरग
[illegible]
[illegible] ॥ [illegible]
[illegible] पुम [illegible]
[illegible] यांची [illegible]
[illegible] पा॥ मु॥ [illegible]
[illegible] गा [illegible] जाराम पा॥ [illegible]
[illegible] पा॥ मु॥ [illegible]

र गाव

[illegible] राव [illegible]

[illegible]

[illegible] पा॥ मु॥ [illegible]
[illegible] पा॥ मु॥ [illegible]
[illegible] जरग [illegible]

१३ [illegible]

१४ [illegible]

१५ [illegible]

१६ [illegible]

१७ [illegible]

१८ [illegible]

१९ [illegible]

२० [illegible]

मुळ ताम्रपटचे मोडी लिपीतील देवनागरी लिपीत लिप्यंतर पुढील प्रमाणे आहे.

कृपा करून पान उघडा

चौकोनी ताम्रपट पत्रा क्रमांक एक

मोगर पत्र करून दिले सन ८०१ फसली ९९ हिजरीस मोहजुर मानाजी वा। उदाजी सोमवश रातार काठीकर वि।।। मां।रं याँहसी येथिल मोजे सावरखेड तो। इंदुर जिल्ह बेदर मुकदमी दिली जे मौजे मा।रास एक हाती कामाचा कसुम बद्दल रुसुम तठले वरून वतनदारी समास एक हाती मिरासे दिले आसु न तुमास याची मिराश महताप वा।। हिशाल सयद याचे बुडालेवरून वसती बेचिराख झाली आसुन सरकारी रुसुम दाटुन गेला आसुन आल मगीर दवंळा बाशा यानी या मिराशे सरकारी रुसुम देऊन आबादी करावी मनुन मानाजी वा।। उदाजी सोमवसे काटीकर सोमवसे याजला करू न दिली सही आपण ववशान ववसी आबादी करून खावी. आपल नावी वडील की गावची करूखावी करून दिली पत्र परी हासतकर मिरास करून दिली आस हे खरी दि यदा रामचेंदर देशमुख सही आबासो। देशपाडय सही

ताम्रपटाची दुसरी बाजू

यानी हे माहजुर सरकारयानी करून दिली वरून हे माहजुर लि।। सही. करीमखानी सो।. याची सुंदराजी ता। डी।। ज्या समाभट मभटराव दस्तुर सही सन ८०१ फसली ९९ हिजरी

जर हिंदु लोकानी झुट मनतील तर गऊ हात्या लाग़ल मुसल्मा न यानी हे मोहजुर पत्र झुट म्हणतील तर कासम आसे.

लांब ताम्रपटाचा प्रथम भाग

येथील झील पत्र करून दिले जे रा-
मचेदर देशमुख यांनी सावर-
खेड याची वतन खरीदी खंतल मो-
जुर करून घेतले आसुन आबा सा-
हेब देशपाडय कसबे मा।र येथि-
ल सोमवसे याची गावची एक हाती
वतन याची मिरास करून दिली ते या-
चा हिसा म नवठाक बिघे गावची
उतर कडील कामुलीचा व[१५] नागझरी
नवटाक घुगरी साडेसात बिघे
वावर भारा धा पेडी पर व[ऻ] नवठाक
घेत जाव गावचे पुर्वेकडील आडीच
बिघे परस व मुकदमीचा वाडा
गावात पूर्वीकडील गावचे वरला

कडील दरवाजा सुरवेतळी असे पड
कुट पचिमेकडे दरवाजा आसे आज

या ताम्रपटाची दुसरी बाजू

आपून दिली आसे दुसर मारोतीक
डील वाडे एक पडकुट दोन-
एक पडकुट मुडापासी दिली आसे-
सुभाजी वानखेडे याजला दिली दु-
सर मुंडभाऊ यासी येथिल जागाचे
तिसगज लांबी रुंदी दिली आहे एक
वाडा या शिवाय दुसर मान पान ना
ही सोमवसे पा॥ मुकदम याजला
मोजे सरकार मा॥र यानी करून दि-
ली की सरकारी नजर करून देनगी
दिली दुसर मान जिमेदारी श्रीपान
व दोनी शिवाय गावचा माने लगने
मारवती कुकु व सवाशिन व वार
ल दुसर[३] मान सन पा[४]डवा गुडीचा[५]
कळस व सेंदुर मारोतीस पुजा कर
वी दुसर मान नागर[६] पंचमी पुजा[७] व
दुसर मान पोळा आदि बई`ल पीरान

या ताम्रपटाची दुसरी बाजू

गावचा शिवार सवी चाऊर आहे.
याचा वसुल रुपये[२६] १११७ पर हु गाव
ची लावणी करून वसुल सरकारा
सदेत जान आगर या गावची जिरायत ला-
वणी न झालेस सरकारी वसुल चुकनार
नाही आजभाऊ न खात नाव वतन दिली हे स-
ही झील पत्र आलमगीर
बाशा याची देणगी झिलपत्र करू
न दिली तकरार आरासे पर लि प्रा॥रण
रिदी करून घेतली याचा दाम
सरकारी २५ देसमुक याचे रुसु

म सरदेशपाडेय सरकारी शेहबा
स पर लि रुपये ४००॥
झीलपत्र घो। मानाजी पा॥ उदाजी पा॥
सोमवसे मोजे सावरखेड तो। इ
दुर जिलह बेदर सुमारसन ८०१ फस-
ली ९९ हिजरी झीलपत्र लि॥ दिला सही

ताम्रपटाची दुसरी बाजू

दुसर दसरा आपटा पुजा व खरग-
ठेऊन दिली[९] आसे हे झीलपत्र आक
ल हुशारी न लि॥ दिले सहि सिमगा
पोळी व पुजास परहुमालकी करू
न[१०] घेतले १ सिवभाऊ याची साक्षे
लक्ष्मीचे १ हुलाजी पा॥ मु॥। मोजे कुटुर
मान गावची १ सखाराम पा॥ मु॥। मोजे रुई
पहीलामान १ मनाजी पा॥ मु॥। मोजे आतरगाव
मेड नाडा १ हानमतराव बरबडकर
दुसरा मान भीमाजी पा॥ मु॥। मोजे पाडद
मदन माद कृष्णाजी पा॥ मु॥। मोजे कुसनुर
जिचा दुसरं खरग
मागाचा नाडा दु आनंदा पा॥ मु॥।
सरा एक परसिल मोजे घुंघराळ
सुपदुरडी इठोबा पा। मु॥। मोजे आजेनगांव
मनाजी नाईक नागोजी लवार
महार मोळी जकोजी सुतार
पायली एक समजा जी नाईक पाडेवार
पर हु प्रमान जी मोजे मा॥र साक्ष सही
मान सही.

चौकोनी पत्रा १ सावरखेड ब्रास प्लेटचे वाचन

माजेर पत्र (करारनामा) करून दिले सन (संवत्सर) ८०१ फसली (अकबर बादशहाने सुरू केलेला शक) ९९ हिजरीस (हिज्र-वतन त्याग केलेलेच्या स्मरणार्थ सुरू झालेला शक पैगंबर हजरत मुहम्मद यांनी मक्का सोडून मदिना येथे जाणे हा दिनांक १६ जुलै ६२२ पासुन सुरवात) मोहजुर (मुळ अरबी शब्दाचे मराठीत रूढ शब्द असा झाला. अरबी शब्द महदर

म्हणजे अनेक लोकाच्या सह्या करारनाम्यावर आहेत असे पत्र म्हणून हजर असलेला इसम) मानाजी (व्यक्तिनाम ज्याचे नांवे हामहजर (माजेर पत्र मूळ अरबी महजरनामा-करारनामा किंवा हुकुमनामा मुसलमान अमदानीत फर्मानासाठी महजर पत्र दाखल करावे लागत असे.) वा। (वल्द) उदाजी सोमश (येथे सोमवंशी असा शब्द वापरात आजही आहे) रानार (राहणार हा शब्द पाहिजे) काठीकर (मूळ आडनांव असलेले) वि॥ (विद्यमान आज हजर असलेला) मा।र (मजकुर येथील रहिवास केलेला) याँहसी (यांना) येथील मौजे (मूळ अरबी शब्द मण्झि अ- खेडे- लहान गांव) सावरखेड (हा गांव, नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्य तालुका बिलोलीमधील गांव नांदेड ते देगलूर रोडवर (राजमार्गावर) कुसनुर या स्थानावरून ४ कि. मि. पूर्व बाजूस आहे.) तो। (तालुके इंदुर हा गाव आता आंध्र प्रदेशमध्ये असून त्यास निजामाबाद म्हणतात. हैद्राबादचा निजाम शेवटचा याने या शहराचे नाव बदलले आहे) जिलह (जिल्हा) बेदर (कर्नाटकातील बिदर शहर) मुकदमी (गांवचा प्रमुख या अर्थाने पूर्वी म्हणजे हैद्राबादच्या आसफ झाहीपूर्वी गांवचा प्रमुख म्हणजे मुकदम हा ग्रामाधिकारी असे. याचेकडे शेतसारा आणि गांवचे रक्षण अशी दोन कामे असत. यांना मुकदम पाटील म्हणत असत. मुकदम पद जाऊन इ.स. १७२४ (आसफ जाही घराणे हैद्राबाद येथे सुरू झालेवर) भाली म्हणजे शेतसारा वसूल करणारा पोलीस म्हणजे गांव पोलीस. जेणेकरून गांवचा बंदोबस्त-करणे चोरापासून, गुन्हे नोंदवणे, तंटे सोडवणे, इ. कार्य या पाटलास करावे लागत असे.

ही प्रथा मराठवाड्यात हैद्राबादच्या निजामामुळे अस्तित्वात आली.) दिले जे मोजे मा।र (मजकुर) एक हाती (एका व्यक्तीकडे असलेला कारभार) रुसुम (शासकीय कर) बदल (ऐवजी, साठी) रुसुम (कर) तठले (बंद झालेला) वरून वतनदारी (वडिलोपार्जित मिळकत) समास.

एक हाती मिरासे (भोगवटा घेणारी वंश परंपरा) दिले असुन तुम्हास याची मिरास महताप वा॥ (वल्द चा पिता) हिशाल सयद याचे बुडाले वरून वसती बेचिराक (निर्मनुष्य गांव जेथे लोक वस्ती नसल्मुळे दिवा लावला जात नाही असा गांव) झाली असुन सरकारीरुसुम (शासकीय कर म्हणजे तहसील किंवा शेतसारा) दाटुन गेला (तुंबुन गेले किंवा वसूल झाले नाही) आलमगीर दवला बाशा (तत्कालीन शासक किंवा राजा) यानी या मिराशे (भोगवटा धारकसाठी) सरकारी रुसुम (कर) देऊन आबादी करावी (वसती करावी) मनुन (म्हणून) मानाजी वल्द उदाजी सोमशे काठीकर याजला करून दिली सही (बरोबर किंवा अमुक मान्य असल्याची खूण म्हणून स्वहस्ते स्वनाम लिहिणे) आपण ववशान ववशी (वंशपरंपरा) आबादी (वसती) करून जावी (करून जावी हा जोड क्रियापद केले जावे याअर्थी मराठवाडा बोलीत रूढ असलेला शब्द) आपल नावी वडीलकी (आपल्या नांवाने ज्येष्ठता असलेला कुणी तरी इसम म्हणजे वयाने मोठा असलेला) गांवची (गांवाची प्रमुख या नात्याने गांवचा कारभार सांभाळणे) करू जावी (मराठवाडी बोलीत रूढ असलेला शब्द जो केले जावे. किंवा केले गेले आज्ञार्थ वाक्यरचना) करून दिली. पत्रपरी (परंतु) हासतकत (हस्तगत) मिरास (भोगवटा) करून दिली आस हे (असे हे) जारी दि यंदा (चालू कामात वाकबगार असलेला प्रचलित कायदेकानू जाणणारा) रामचंद्र देशमुख सही (याचे मान्य प्राप्त) आबासाहेब देशपांडे सही (मान्य प्राप्त होकार) यांनी हे मोहजुर (मूळ अरबी शब्द महद्र याचे माहजर म्हणजे अनेकांच्या

सह्या असलेला अर्ज) सरकार यानी (शासनाकडून) प्रमाणपत्र यानी करून दिली वरून हे माहजुर (प्रमाणपत्र) लि॥। (लिहून दिले. सही करीम काजीसाहेब याची सुंपलजी। (मूळ फार्सी शब्द सुपार +राजी-आशा बाळगणारा आणि पा सुबार-सोपवलेला म्हणजे सोपवलेली आशा बाळगणारा) ता। (तामिळ) लि॥। (लिहिले) ज्यास माभट मभटराव दस्तुर (स्वाक्षरी) सही (मान्य करणे) सन ८०१ फसली ९९ हिजरी जर हिंदु लोकांनी झुट मनतील तर गऊ हात्या लागल (लगेल) मुसलमान यानी हे मोहजुर पत्र (करारनामा) झुट म्हणतील तर कसम असे.

पत्रा क्रमांक २ वाचन

येथिल झिल पत्र (मूळ शब्द अरबी जिलु म्हणणजे छत्र, छाया, सावली, आधार) परंतु मराठवाडी बोलीत जिलुचे झिल उच्चार केले गेले. ज्या साधनास परंपरा, आधार आहे अशा परंपरेचा आधार असलेले पत्र) करून दिले जे रामचंद्र देशमुख यांनी मोजे सावरखेड याची वतन वतनखरीदी खतल (कोरक्याने येथे चुकीने कोरलेले असावे. जतन शब्द पाहिजे. खूप दिवसापासून सांभाळून ठेवलेली मालमत्ता अशी हिफाजत करून ठेवलेली) मोजुर (महजरचे अपभ्रंश मराठवाड्यातील शब्द करारनामा, किंवा हुकुमनामा) करून घेतले. आसुन आबासाहेब देशपांडेये कसबे (लिहिण्याचे कसब असलेला) मा॥र (मजकूर) (सांगितलेला) येथिल सोमवशे याची गावची एक हाती वतन याची मिरास (भोगवटा) करून दिली ते याचा हिसा (भाग) मनवटाला (म्हणजे) बिघे (जुनी कल्याणी चालुक्य कालीन जमिनी मापण्याचे परिमाण (एकक) गावची उतर[१५] कडील कामुलीचा व नागझरी (क्षेत्राचे जमिनीचे स्थानिक नाव) नवटाक (१५ ग्राम धान्याचे वजन असलेला एक माप पूर्वीच्या पावसेरचा अर्धा भाग याला नवटाक म्हणत असत. येथे **माळ जमीन** निकृष्ट जमीन, हलकी जमीन या अर्थाने रूढ) घुगरी (वंशपरपरेने जेष्ठ पुत्रास जी जंगम मालमत्ता दिली जाते त्यास मराठवाडी बोलीत वेगवेगळे शब्द आहेत. पासोडी-ज्येष्ठचा भाग म्हणून दिली जाते. घुघरी कडधान्य अखंड शिजवलेल्या पदार्थास घुगरी म्हणतात. घुगरी म्हणजे जेष्ठ पुत्रास वडिलोपार्जित जमिनीतून मिळालेली जास्त जंगम मालमत्ता) साडे सात बिघे वावर भारा धा पेंडी (जेष्ठ पुत्रास मानपान म्हणून कनिष्ठ पुत्रानी दहा पेंडी पीक तयार होत असताना मिळणारे दहा पेंडी पीक) पर (प्रत्येकी) व नवटाक (येथे जसे पिकेल तसे घ्यावे अथवा सोडून द्यावे) घेत जावं (जावे) गावचे पुरवे कडील (पूर्व बाजूस असलेले) अडीच बिघे खरस (माळ जमीन) व मुकदमीचा वाडा (मुकदम पाटील राहतात त्या वाड्यातील काही भाग) गावात पुरवी कडील गावचे वरला कडील (म्हणजे गावच्या पश्चिमेकडील बाजूस) दरवाजा सुरवेतळी याचे पडकुर (म्हणजे गढीखालील रिकामी जागा जेथे सूर्याच्या उन्हाशिवाय दुसरी वस्तू म्हणजे माती दगडगोटा सुद्धा नसलेली पडकुर (रिकामी जागा) पश्चिमेकडील दरवाजा असे. आज भाऊन दिली असे. (कल्पना करून दिली असे. बुद्धीपूर्वक देणे) दुसर मारोतीकडील वाडे एक (मारोतीचे बाजूस असलेले) याचे पडकुट दोन एक पडकुट मुडा माशी दिली असे. (मुंड म्हणजे वंशपरंपरेतील इतर भाऊबंद) सुभाजी

वानखेडे याजला (हा मानाजी वल्द उदाजी ज्याचे नांवचे ताम्रपट आहे. त्याचा हा गढीवरील भाऊबंद पैकी ज्याच्याकडे मुकदमी पाटीलकी आहे.) (या मराठी समाजातील आडनांव वानखेडे आहे. स्वत:ला ते सोमवंशी आडनांव आताही धारण करतात.) दिली. दुसर मुंडभाऊ (वंशातील याच शाखेतील) यासी येथील जागाचे तिस लाबी रुंदी दिली असे. एक वाडा याशिवाय दुसर मान पात्र नाही. सोमवंशे पाटील मुकदम याजला मोजे सरकारी मा|र (मजकूर) यानी करून दिले की सरकारी नजर (उपायन, भेट) करून देणगी दिली. दुसर मान जिमेदारी श्रीपात्र (मारोतीस लग्न समारंभानिमित्त जरीपटका, शेला, डोक्यावर ठेवतात.[२] त्यास श्रीपाव म्हणतात.) व दोनी (दोन्ही) शिवाय गावचा मान लगन (लग्न) मारवतीस कुकु (कुंक म्हणजे लग्न किंवा समारंभास कुंकू लावण्याचा किंवा गुलाल लावण्याचा पहिला[३] मान. हा मुकदम पाटलास मानाजी वल्द उदाजी पाटील वानखेडे तर्फे काय तर सर्व गांवातर्फे असा मान राहील) व सवाशिन व वारल (लग्न समारंभानिमित्त मुकदम पाटलाच्या पत्नीस प्रथम खणचोळी[४] किंवा लुगडे[५] देऊन वरमाय करणे किंवा मान देणे किंवा सवाशिण म्हणून मान्यता देणे) वारल (याचा वारल तर म्हणजे मृत्यू पावले तर चोळीलुगडे नेसवणे हा बहुमान[५] मुकदमाचे पत्नीस होता) दुसर मान सन पाडवा गुढीचा पाडवा (चैत्र मासाचा पहिल्या दिवसाचा मान जेथे मारोती या देवास प्रथम नारळ फोडणे वाजंत्रीसहित जाऊन हे काम केले जाते.) कळस गुडीचा (प्रथम गुढी उभारणे व सेंदूर मारोतीस पूजा करावी (प्रथम पूजा आणि शेंदूर लावण्याचा मान) नागर पंचमी पुजा (नागपूजा वारुळास जाऊन वाजंत्रीसहित जाणे तेथे नागपूजा करावी) व दुसर मान पोळा आदि बइलपिराव (मानकऱ्याचा प्रथम बैल फिरले पाहिजे.)

ताम्रपटाचा ३ रा पत्रा

दुसर मान दसरा आपटा पुजा व खरग ठेवुन दिली असे. (खरग म्हणजे खड्ग-तलवार म्हणजे दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पूजा आणि तलवारीची पूजा करून मग आपटा आणण्यास गेले ते वेळी प्रथम मानकरी याने आपट्याच्या झाडाची पूजा करून नंतर तलवारीची पूजा करतो. मग आपटा तोडतो. मग इतर लोकांनी आपटा तोडावे असा मान असतो.) हे झिलपत्र आकल हुशारीने लि॥। (लिहून) दिली सही शिमगा पोळी व पूजा सदर लि॥। (लिहिले) मालकी करून घेतले १ शिवभाऊ (गांव सरहद्द पलीकडे असणारे गाव प्रमुख पाटील) याची साक्ष लक्ष्मीचे १ (लक्ष्मीचे म्हणजे गांव मैसाईच्या सणाचा मान तेथे रेडा मानकऱ्याचा फिरतो. पोतराज नाचतात. रेडाबली देऊन त्याचे मांस शिजवून खाणे इत्यादि मान गावच्या कामदारास देतात) १ हुलाजी पाटील (पा।) मु॥ (मुकदम) मौजे कटुर (बिलोली तालुका-जिल्हा नांदेड कुंटुर सध्याचे गांव) मान गावचा (याना मान गाववाल्यानी व मानकऱ्यानी लग्नकार्यानिमित्त बोलावल्यास द्यावे) १ सखाराम पा॥ (पाटील) मु॥। (मुकदम) रुई यांना पहिला मान (रुई ता. बिलोली जि. नांदेड महाराष्ट्र राज्य) १ मनाजी पा॥ (पाटील) मु॥। (मुकदम) मोजे आंतरगाव (ता. बिलोली जि. नांदेड) भेड नाडा (मळणी धरण्याचा खांब

आणि नाडा हा मान मानकरी पाटलाचा) हानमतराव बरवडकर (ता. बिलोली जि. नांदेड) दुसरा मान (रुई करानतर दुसरा मान याना) भिमाजी पाटील (पा।।) मु।।। (मुकदम) मोजे पाडद (आजचे पाटोदा जे बरडा गांवाजवळ आहे.) मदन माप (मळणी झालेवर मदन देण्याचा मान म्हणून मदत मळलेली ज्वारी ह्यास मदत म्हणतात.) माप (दिले पाहीजे.) कृष्णाजी पा।। (पाटील) मुकदम (मु।।।) मोजे कुसनुर (ता. बिलोली जि. नांदेड) आनंदा पा। (पाटील) मु (मुकदम) मोजे घुंघराळ (ता. बिलोली जि. नांदेड) इठोबा पा। (पाटील) मोजे आंजन गांव (या गांवची ओळख झाली नाही. बरबडा या गांवाजवळील वजीरगांव बहुतेक असावे) जिचा दुसर खरग (लक्ष्मीपूजाच्या वेळीं खरग -खडग पूजाचा मान) मानकऱ्यास कामदारानी जे मान देण्याची प्रथा मराठवाड्यात होती. मांगाचा नाडा (मांग समाजातील लोकांनी प्रथेप्रमाणे औतासाठी नाडा) दुसरा एक परसेल (रितीरिवाजाप्रमाणे) सुपदुरडी (पोळ्यासाठी असते) मनाजी नाईक महार मोळी (मनाजी नाईक या महारानी मोळी दर सनास मानकऱ्यास आणून द्यावी. मोळी- लाकडाचा भारा) नागोजी ल्वार (लोहार) जकोजी सुतार (प्रथम औतचे सामान भरावे लागते. लोहारानी मानकऱ्यास फास, फाळ यांनी बनवून द्यावे.) मनाजी नाईक पाडेवार (वेशकर असावा) पायली एक. सदर (गावात मानकऱ्यांनी जी मोजमापे ठरविली त्याप्रमाण इतर लोकांनी मोजमाप ठेवावी) सदर (बाब)हु प्रमाण (हुकमाप्रमाणे) जिमान (जिम्मेदारी ठेवावी) सही (स्वाक्षरी) मोजे मो।र (मजकुर) साक्ष सही.

ताम्रपटाची दुसरी बाजू

गावचा शिवार सवी चाऊर (२६ चाऊर मुसलमान आमदानीत चाऊर म्हणजे (जमीन[२६] मोजण्याचे परिणाम हे ९० एकर किंवा १२० एकर परिणामाचे असे. एकूण गावची जमीन २६ चाऊर होती) आहे. याचा वसुल रूपये १११७ सदर हु (हुकुम) गावची लावणी (एक वर्षानि खंड गुता दिलेली जमीन) करून दिली तुमास (तुम्हास) गाव गावची लावणी करून वसूल सरकारास देत जावे. (जाव) आगर गावची जिरायत (शेत, किंवा जमीन) लावणी न झालेस सरकारी वसूल चुकणार नाही. आज भाऊ न जात नाव वतन दिली हे सही. झीलपत्र आलमगीर बाशायाची देणगी झीलपत्र करून दिले. तकरार आरासे (तकरार अरबी मूळ शब्द तक्रार पुनरुक्ती किंवा आक्षेप, आरासे-सजावट इथे आक्षेप घेण्याजोगे काही राहिले नाही असा भावार्थ) पर (दुसर, इतर) हु (हुकुम) प्रा। (प्रमाणे) खरीदी करूनसी घेतली याचा दाम सरकारी २५ देशमुख याचे रुसुम (कर सरदेशपांडे ये सरकारी शेहरव सदर (मूळ शब्द शैरव अरबी हा शब्द श्रेष्ठ, प्रतिष्ठित शासकीय अधिकारी मराठवाडी बोलीत शेहख असा रुढ झाला आहे.) सदर हु (हुकुम) रुपये ४००।। झीलपत्र घो। (घेतले) मानाजी वा।। (वल्द) उदाजी पा। (पाटील) सोमवसे मोजे सावरखेड तो। (तालुके) इंदुर जिलह (जिल्हा) बेदर सुमारसन ८११ फसली ९९ हिजरी झीलपत्र लिं।। (लिहिले) दिला सही.

संशोधनाचा प्रयत्न

झीलपत्र घे।।। (घेतले) मानाजी वा। (वल्द) उदाजी पा। (पाटील) सोमवसे (सोमवंशी)

मौजे सावरखेडे असा जो उल्लेख आहे. त्या गावात चौकशी केली असता दहा पिढ्यांची परंपरा सांगतात. या ताम्रपट क्रमांक १ चे वजन चौकोनी पत्रा ५२० ग्राम आणि लां. x रु. २४ सें. मी. आणि २३.५ से. मी. लांब शलाका वजा पत्रा क्रमांक वजन २९० ग्राम आणि ला. x रु. २७.६ से. मी. आणि ११.४ से.मी. आणि तिसऱ्या शलाका वजा पत्र्याचे वजन २९० ग्राम आणि लां. x रुंदी २७.४ से. मी. आणि ११.७ से. मी. आहे. याला ब्रास प्लेट म्हणता येईल कारण हे पत्रे तिन्ही पितळेचे आहेत वर तांब्याची कडी लांब शलकेवजा पत्र्यास आहेत. चौकोनी पत्र्यास दोन ठिकाणी दोन-दोन छिद्रे जे पूर्वी कडी बसविण्याची सोय असावी.

या पत्र्यात उल्लेखलेली कुंटुर (कुटुर मूळ ताम्रपटातील शब्द) तालुका बिलोली रुई (या ताम्रपटात उल्लेखलेली रुई बु. आणि रुई खुर्द गांवे आज विद्यमान आहे.) ता. बिलोली जिल्हा नांदेड अतरगांव (ता. बिलोली जिल्हा हे गाव सध्या विद्यमान आहे.) बरबडा ता. बिलोली जिल्हा नांदेड हे गाव सध्या विद्यमान आहे. पाडद तालुके विलीली जिल्हा नांदेड हे गांव सध्या विद्यमान आहे. कुसनुर ता. बिलोली जिल्हा नांदेड हे गाव विद्यमान आहे. घुंगराळ ता. बिलोली जिल्हा नांदेड हे गांव विद्यमान आहे. परंतु आंजन गांव या गावची ओळख पटली नाही. परंतु अमुक गांवाला आंजन गांव म्हणत असत व आज अमुक नाव आहे अशी माहिती या परिसरात कुठेही उपलब्ध झाली नाही. हे गांव वजीर गाव असावे. यासच आंजन गांव नांव असावे असे अनुमान करावेसे वाटते. व्यंकटराव वल्द नागुजी पाटील उपसरपंच मौजे सावरखेड यांच्या प्रयत्नामुळे हा ताम्रपट वाचण्यास उपलब्ध झाला. हा ताम्रपट बळीराम पिता देवराव पाटील वानखेडे यांच्याकडे होता. परंतु कांही गैरसमजामुळे त्यांनी दिले नाही. चार वर्षांच्या प्रयत्नानंतर हा ताम्रपट उपलब्ध झाला. पोलीस ॲक्शनपूर्वी या गावांत ही परंपरा तहहयात चालू होती. आता ती सरंजामी परंपरा हळूहळू लोप पावत आहे. ज्याच्याकडे उपलब्ध ताम्रपट होता, ते वडीलधारी घराणे होते. आज गढीवर दुसरी त्यांचे भाऊबंद आहेत. मराठवाड्यातील परभणी गॅझीटियरमध्ये शहाण्णव कुळी मराठ्यांची यादी आहे. त्यातील आडनावाचं वानखेडे हे नांव सोमवंशी असा एक त्या गॅझिटियरमध्ये उल्लेख येतो. पूर्वी गांवावरून नांवे आडनावाचे असत. त्याचा हा पुरावा आहे.

सावरखेड ताम्रपटातील भाषा ग्रामीण मराठवाड्यातील बोली भाषा आहे. तालुके इंदूर जिल्हे बिदर ही दोन्ही स्थाने आज मराठवाड्यात नाहीत. या ताम्रपटांत सोमश किंवा सोमवंश व सोमसे हे शब्द सोमवंश सांगणारे मराठी समाजाची कुळी सांगणारे आहेत. काठीकर किंवा काटीकर म्हणजे मूळचे काठी गावचे रहिवाशी असावेत. परंतु स्थानिक लोकांकडे चौकशी करून (सावरखेड तालुके बिलोली) विचारले तर ते परंपरागत माहिती सांगतात. हे गांव शिखर शिंगणापूर परिसरात आहे. आज येथील या समाजातील वानखेडे दुसऱ्या दोन पत्र्यात उल्लेखलेले आज विद्यमान आहेत. वानखेडे आडनांवाचे मराठा समाजातील आड असलेले लोक नांदेड, परभणी जिल्ह्यात पुष्कळ ठिकाणी आहेत. परंतु मूळ हे लोक विदर्भातून येथे वस्तीला आले असावेत. या ताम्रपट पत्रा क्रमांक एकमध्ये आलमगीर दवला बाशा म्हणजे आलमगीर दौला बादशहा नेमका कोण समजणे कठीण आहे. इ.स. १७२४ मध्ये मिर कमरोद्दीन

उल मुल्क या निजामाने मोगल साम्राज्यातून फुटून वेगळे सलतनत (राज्य) कायम केले होते. (१७२४ ते १७४८) यानंतर त्याचा मुलगा सलाबत जंग (इ.स. १७४४ ते १७६२) पर्यंत निजाम होता. या सलाबत जंगास आलमगीर दौला हे दुसरे नाव असावे काय हाही विवादास्पद प्रश्न होऊ शकतो. आलमगीर २ रा बादशहा हा मोगलांच्या वंशात इ.स. १७५२ ते १७५८ काळात होऊन गेला. याला दौला हे नांव होते काय ? तर असे म्हणता येईल की मराठ्यांना प्रतिशह देण्यासाठी निजाम मिर कमरुद्दीन उल-मुल्क याने आम्ही निजाम (व्यवस्था करणारे, किंवा राज्य व्यवस्था पहाणारे) असे भासवून स्वातंत्र्याचा उपभोग घेत असावेत. किंवा स्वतंत्र राज्य म्हणून राहात असावेत, अगर हे स्वतःला बादशहा पद हे लावीत असावेत काय ? असे अनुमान काढता येईल की दिल्ली बादशहाचे व्यवस्थापक त्याचे घराण्याची संबंध म्हणून लोकसमजूत असलेमुळे बादशहा कोरक्याने कोरले आहे. ववशान ववशी दाटुन गेला, तठलेवरुन, करु खावी, हासतक, आस, झीलपत्र, माजरे, रानार, धा, वावर, नवटाक जाव, पूर्वेकडील, उत्तेरकडील, वरलाकडील, दरवजा, भाऊन देणे, पडकुट, मुडा, मुंडभाऊ मानपान, देली श्री पाव, कुकु, सेदुर, मारवतीस, नागरपंचमी, पीराव, जाव असे ग्रामीण बोलीत शब्द येत असल्यामुळे हा ताम्रपट इ.स. १८५० च्या नासिरोद्दीनदौला याच्या काळातील असावा की काय असे वाटते. नासिरोद्दीन दौला याचे नाव आलमगीर दौला होते काय हा एक वादाचा मुद्दा होऊ शकतो. दुसरे पत्रा क्रमांक दोनमध्ये आलमगीर बाशा असे कोरलेमुळे हा ताम्रपट सलाबत जंग निजाम याच्या काळातील असावा. तिसरे विवादास्पद स्थळ म्हणजे ताम्रपटातील ८०१ फसली ९९ हिजरी हा एक कोरक्याचा दोष की अतिपुरातन काळापासून आपली मिराशी आहे असे भासवून स्पष्ट कालाचा निर्देश केला नाही. या ताम्रपटाबद्दल लोकांनी शंका घेऊ नये म्हणून हिंदू लोकास गऊहत्या (गोहत्या) लागेल. मुसलमान ताम्रपट खोटा म्हणतील तर कसम आसे म्हणले आहे.

देशमुख आणि देशपांडे यांचा रुसुम ४०० रुपये याचा उल्लेख ताम्रपटात आहे. ताम्रपट लिहिणेबद्दल २५ रुपये याची नोंद कोरक्याने गावची एकूण जमीन सवि (येथे सविस चाऊर) असा शब्द कोरक्याच्या चुकीने कोरला गेला आहे. गांव गाड्यातील देवता लक्ष्मी म्हणजे गांवची देवी, मारवती किंवा मारोती, श्रीसमर्थ रामदासाने स्थापन केलेले हनुमान ही देवता. गावच्या बलुतेदार व गांव कामगाराची नोंद या ताम्रपटात येऊन गेलेली आहे. पाडे म्हणजे वेशाकर याची नोंद पण लक्षात घेतली पाहिजे.

समुद्रगुप्त पाटील,
पुरातत्व अभ्यासक, नांदेड.

अहिल्याबाई होळकर यांची दोन अप्रकाशित पत्रे

डॉ. वि. ना. हंडियेकर

देवी अहिल्याबाई होळकर यांचे दोन अभिलेख त्यांचे दिवाण विसाजी शामराज यांचे वंशज श्री. सदाशिव दामोदर देशपांडे मु. इन्दूर यांच्याकडे उपलब्ध झाले आहेत. मोडी लिपीतील ही कागदपत्रे अप्रकाशित असून त्यात प्रशासकीय व्यवहार व राजकीय बाबीसंबंधी अहिल्याबाईचे निर्देश लक्षात घेण्यासारखे आहेत.

देवी अहिल्याबाई होळकर यांनी विसाजी शामराज यांना जहागिर दिले ते गाव नटावदा जीरापूर माचलपूर परगणा माळवा प्रदेशात होते. जर पेशव्यांनी दिलेली जहागिर गावे जानेफळ निमसाखर वरकुटे इंदापूर तालुक्यात होते. विसाजी शामराज यांचेबद्दलचा उल्लेख 'महेश्वर दरबारची बातमी पत्रे' खंड १ व २ यात आहे.

पत्र क्र. १ : अहिल्याबाईंनी विसाजी बल्लाळ आणि दिपालपूरचा कमाविसदार जोदा मल्हार यांना एक आदेश दिला आहे. त्रिंबक विसाजी (विश्वनाथ) देशपांडे हे देशी जात असून त्यांना प्रवास खर्चासाठी एक हजार रुपये द्यावेत आणि रसीद घ्यावी असा निर्देश दिला आहे. अहिल्याबाई व देशपांडे कुटुंबाचे संबंध स्नेहपूर्ण असून उपरोक्त रक्कम विसाजीच्या खात्यात नोंद करण्यात यावी. यावरून हिशेब ठेवण्याची दखल लक्षात येते.

पत्र क्र. २ : देवी अहिल्याबाई होळकरने बाळाजीपंत नाना अर्थात नाना फडणवीस यांना लिहिले आहे. हे पत्र इ.स. १७८९-९० च्या सुमाराचे असावे. दिल्लीच्या शाहजादा मिर्झा मुजफ्फर बख्त हा पुण्यास आश्रयास आला होता. इ.स. १७८९ ते १७९५ या काळात त्याचे वास्तव्य पुण्यास राहिले. मराठ्यांच्या मदतीने दिल्लीचे सिंहासन प्राप्त करण्याची त्याची इच्छा होती. तूर्त पुण्याच्या परिसरात त्याला जहागिर देण्याचा नाना फडणविसाचा विचार होता. विसाजी शामराज यांच्या अधिकारातील गावे जहागीर देण्याचा मनसुबा असल्याचे अहिल्याबाईच्या कानी आले. तेव्हा हा राजकीय दृष्टीचा व्यवहार करते समयी आपला सेवक विसाजी शामराज याला नुकसान होऊ नये म्हणून नाना फडणविसास तिने सूचना केली व तशी दक्षता घेतली.

श्री म्हाळसाकांत

पत्र क्र. १ (९ नोव्हेंबर १७९४)

राजश्री विसाजी बल्लाळ व जोद
मल्हार का। दार ता. देपुर गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य
—स्नो अहिल्याबाई होळकर
दंडवत सुर रवमस तीसेन मया व
अलेफ राजश्री त्रींबंक विस्वनाथ
याजला देसी जाताना खर्चास (रुपये १०००)
येक हजार रुपये तूम्हाकडून देवीले असेत तरी
तूम्ही सदर येक हजार रुपये पो। मजकूर येथील
साल मजकुर येवजी मशार नीलेस देऊन पावती घेणे जाणिजे
छ। १५ रंबीलारवर बहुत काये लिहिणे

मोर्तब सुद

"श्री"

पत्र क्र. २

राजश्री बालाजी पंत नाना
गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य-श्री अहिल्याबाई होळकर
दंडवत तीनंती उपरी येथील कुशल जाणोन
स्वकीये लिहीत असीले पाहिजे वीशेष मौजे नींबसर
व मौजे (वर कुहे) पा. इंदापुर हे दोन गाव सरकारातून
पुर्वी पासोन केलासवासी विसाजी सामराज यांजकडे
आहेत. प्रस्तुत (पामार) शाहाजाधा कडे खर्चीचे बेगमीस
देणार तेव्हा दुमाळे गाव वजा होऊनच द्यावयाचा

विचार बहुधा (अस्पष्ट) घडेल परंतु याजकडून (अन माहितपणे) यांचे
गावास उपसर्ग लागू लागल्यास बंदोबस्त
जाला पाहिजे यास्तव हे पत्र आपणास लेखन केले
असे तरी मशार नीले कडील गावास शाहजाद्या
कडील उपसर्ग लागु लागल्यास राजश्री येशवंतराव
गंगाधर व मशार नीले क़डील कारकून आपल्यासी
बोलतील त्या अन्वये बंदोबस्त करून देऊन
कोणे विसी उपसर्ग न लाणे ते करणे पेशजी पासीऩ
मशार नीलेचे (अंगत्यवादजीनलोभ) करीत आला त्या प्रमाणे
पुढेही त्यांचे प्रंत्रावर लोभ करून वाळवणे आपणा कडे
असे रवाना छ २४ रबीलाखर बहुत काये लिहिणे
लोभ असो दीजे हे विनंती.

जागजी येथील पुरातत्त्वीय अवशेष : एक परिचय

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक

बालेघाटच्या पठारावर वसलेले जागजी हे गाव तालुका जिल्हा उस्मानाबादमध्ये आहे. "तगर" या प्राचीन नगराच्या परिसरात धाराशिवपासून ३२ कि.मी. अंतरावर असलेले हे स्थान. येथील श्री महालक्ष्मीदेवीचे मंदिर हे अनेक बाबींमुळे स्वत:चे वेगळे वैशिष्ट्य ठेवते. येथील नागरशैलीच्या शिखरावर स्थापन केलेले देवताचक्र मूर्तिशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात ते बहुधा प्रथमच नोंदवले जात आहे.

"तगर" आताचे तेर या प्रारंभिक, ऐतिहासिक काळापासून महत्त्व प्राप्त झालेल्या नगराच्याविषयी येथे काही नव्याने लिहावे असे नाही. सातवाहनकालीन या सुप्रसिद्ध व्यापारपेठेत पुढेही एक सातत्य लाभले. उत्तरकालात याचा विकास होत होता. इ.स. ९९७ च्या शिलाहार घराण्यातील अपराजित यांच्या लेखात "तगरपूर परमेश्वर" असे बिरुद अपराजिताने स्वत:ला लावून घेतले. इ.स. १०५८ मधील लेखात "कऱ्हाड" शाखेच्या घराण्यातील मारसिंहाने स्वत:ला "तगरपुरवराधीश्वर" ही पदवी रूढ केली. तेर येथील त्रिविक्रम मंदिरातील लक्ष्मीमूर्तीच्या अधिष्ठानावर असलेला कन्नड शिलालेख ११ व्या शतकातील आहे. याच काळात विकसित झालेले "जागजी" हे गाव तेरच्या परिसरात आहे.

जागजी येथील ग्रामस्थांच्या लोकस्मृती सांगतात त्यात या ग्रामनामाची उत्पत्ती, जाकासूर दैत्याच्या नावाशी जोडली जाते. येथील श्रीमहालक्ष्मी मंदिरात परंपरेने म्हटल्या जाणाऱ्या आरतीमध्ये "जाकासूर मर्दूनी ग्राम जागजई झाला" अशी नोंद आहे. या स्थान देवतेचा संबंध कोल्हापूरच्या महालक्ष्मीशी जोडला जातो.

श्री महालक्ष्मी मंदिर

जागजी येथील श्री महालक्ष्मी मंदिर स्थापत्याच्या दृष्टीने लक्षणीय आहे. पश्चिमाभिमुख असलेले हे मंदिर. याचे विधान म्हणजे गाभारा व अर्धमंडप किंवा मुखमंडप असे आहे. एक मीटर उंच अधिष्ठानावर उभारलेले हे मंदिर ४ × ४ मीटरचा चौरस गाभारा

आणि त्यापुढील मुखमंडप. गाभाऱ्याचे वैशिष्ट्य असे की, तो एकूण १६ स्तंभांच्यावर उभा असून त्यापैकी चार स्तंभ पूर्ण आहेत. गाभाऱ्याच्या मधोमध असणारा २ × २ मीटरचा चौथरा, त्यावर चार स्तंभ उभारलेले असून मधोमध असलेल्या अधिष्ठानावर मुख्य मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे स्वतंत्र असा सांधार प्रदक्षिणा पथ उपलब्ध झाला आहे. यावर समतल वितान आहे. पुढील मुखमंडप २.५० × २.५० मीटर आकाराचा आहे. याच्याही पुढे २.५० मीटर अंतरावर एक चौथरा होता. कदाचित हा स्वतंत्र नंदी मंडपासारखा भाग असावा. गर्भगृहावरच विटांनी बांधलेले साधारण १४ मीटर उंचीचे शिखर आहे. विटात बांधलेले हे शिखर त्रिरथपद्धतीचे नागर शिखर आहे. झोडगे येथील शिखराशी याचे विलक्षण साम्य आहे. शिखराची पश्चिमेकडील बाजू कोसळली असून शिखराच्या प्रारंभी असलेली चैत्याकृती नक्षी आहे. ती पट्टीका आणि त्याच्या लगत दोन्ही बाजूंनी लहान लहान शिखराच्या प्रतिकृती आहेत. हे कूटस्तंभ जेथे शेवटी आम्लकाल मिळतात तो भाग आज अस्तित्वात नाही. मंदिराचा जंघाभाग अत्यंत साधा असून कुठलेही विशेष शिल्पांकन त्यावर नाही. या पार्श्वभूमीवर हे शिखर उठून दिसते. हे झाले मूळ मंदिराचे स्वरूप. पण पुढील काळात मंदिरापुढील नंदी मंडप व मुखमंडप कोसळल्यामुळे साधारणपणे बहामनी कालात या मुखमंडपालगत सलग असा ओटा तयार करून त्यावर कमानीयुक्त एक मोठा मंडप विटात बांधला गेला. त्यामुळे मूळ मंदिराचे स्वरूप एकदम लक्षात येत नाही. हा मंडप उभारण्याचे काम "आनंत नेणूदास" नामक व्यक्तीने केले, अशी नोंद या स्थानावर म्हटल्या जाणाऱ्या एका आरतीत आहे. "आनंत नेणूदास मंडप उभारीला..." अशी नोंद मिळते. मंदिरास लावलेल्या द्वारशाखा याही उत्तरकालीन वाटतात. गाभाऱ्यात असलेली द्वारशाखा शैवद्वारपालयुक्त आहे तर पुढील मंडपात असलेली द्वारशाखा वैष्णवीद्वारशाखा आहे.

लक्ष्मीतीर्थ-बारव :

या मंदिराच्या पुढे एक लक्ष्मीतीर्थ म्हणून ओळखली जाणारी बारव आहे. दोन्ही बाजूंनी आत उतरण्यासाठी पायऱ्या असलेली ही बारव. बारव स्थापत्याच्या इतिहासामध्ये नोंद घ्यावी अशी आहे. एकूण २४ × २४ मीटरच्या चौरस क्षेत्रात या बारवेचे बांधकाम करण्यात आले असून एकात एक अशा पाच टप्प्यात ती पूर्ण झाली आहे. पूर्व-पश्चिम भागात आत उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्या सोडता याचा पहिला टप्पा १७ × १७ मीटरचा आहे. शेवटी जेथे अष्टकोनी आकाराची विहीर आहे. तेथे हा आकार ५.७० × ५.७० मी. कमी होतो. याचे एकूण बांधकाम साधारणत: ७.५० मीटर उंचीचे आहे. या बारवेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यास असलेली २४ देवकोष्ट. हे बारवेच्या पूर्व व पश्चिम भागात प्रत्येकी सहा तर उत्तर व दक्षिण भागात अनुक्रमे ७ व ५

आहेत. या बारवेत असलेली मुख्य मूर्ती उत्तराभिमुख ठेवलेली असणार. या बारवेचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्या टप्प्याच्यावर असलेली २.७५ मीटर उंचीची भिंत. या भिंतीतच देवकोष्ट आहे. देवकोष्टांचा आकार साधारणपणे १ × १ मीटरचा आहे. त्यावर १ मीटर उंच शिखरिका आहे. २४ देवकोष्टांच्यावर असलेली ही शिखरे द्रविड; नागर; भूमीजन; व्हराटक शैलीचा काहीसा परिचय देतात. बारवेचे बाह्य अंग पाहता बाहेरून जमिनीच्या वर एक मीटर उंचीची ही भिंत (पीठ) आहे. यावर तीन पट असून सर्वात वरच्या पटावर पुष्प, हंस, कीर्तीमुख आणि मिथुन शिल्पांची उधळणच केली आहे. या पटातील (प्रत्येक शिल्प १६ × २० सें.मी. आकाराचे आहे. सर्वात शेवटी असलेला थर दोन्ही बाजूंनी उतार असलेला आहे. या पीठास ज्याठिकाणी शिखरे आहेत तेथे साधरणपणे १५ सें.मी. उंचीचा हा भाग वर डोकावतो आहे. एकूण या बारवेचा सुंदर परिणाम पाहणाऱ्यास जाणवतो. या बारवेविषयी माहिती देणारा एक शिलालेख येथे उपलब्ध असून प्रारंभी चंद्रसूर्य असलेली ही शिळा (९० × ३५ सें.मी.) दुर्दैवाने वाचता येऊ नये इतकी झिजली आहे. या बारवेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सर्वात शेवटचा टप्पा जेथे सुरू होतो तेथे अष्टकोनी आकारात बांधलेले एक कुंड आहे आणि याच्यावर साधारण एक मीटर उंचीवर उत्तर बाजूला एक मोरी (प्रणाल) दिसते. अनेक देवतांनी युक्त असलेल्या या बारवेतील पाण्याची पातळी नेहमीसाठी समान ठेवता यावी यासाठी कदाचित ही मोरी असावी, ज्यामुळे जास्तीचे पाणी याच पातळीवर कुठे तरी काढून देण्यात आले असावे. बारव स्थापत्यामध्ये सहसा अशी व्यवस्था इतरत्र आढळत नाही.

बारवेतील मूर्ती

अपराजितपृच्छा या ग्रंथात (११ वे शतक) जलकुंडांविषयीची नोंद मिळते. त्यात भद्रक, सुभद्रक, नंद, आणि परिघ असे उपप्रकार सांगितले आहेत. हे कुंड बहुतेक देवालयांच्या समोर आहेत. या सर्वांचा बारकाईने विचार केल्यास जागजी येथील कुंड हे परिघ या संज्ञेत बसेल असे वाटते. या परिघ कुंडात थिट्ट (देवकोष्ट) असतात. त्यात शेषशायी विष्णू, वराह किंवा एकादश रूद्र यांच्या मूर्ती बसवतात. दरवाजाच्या जवळ दुर्वास, नारद, गणेश अशा विविध मूर्ती असतात. इ. वर्णन मिळते. (अपरार्जितपृच्छा ग्रंथ ७४, १.३८) याविषयी डॉ. र. पु. कुलकर्णी यांचा "भारतीय जलसंभरण व्यवस्था की प्रगती" हा लेख मुळात पाहण्याजोगा आहे.

आज जागजी येथील एकूण २४ मूर्तींच्यापैकी बहुसंख्य मूर्ती मूळ स्थानावर नाहीत. यापैकी काही मराठवाडा विद्यापीठाच्या संग्रहालयात हलवण्यात आल्याचे सांगितले गेले. तर काही मूर्ती मूळ स्थानावरून काढून बारवेबाहेर एका चौथऱ्यावर मांडून ठेवल्या

आहेत. यामुळे प्रत्येक मूर्तीचे मूळस्थान तपासून पाहणे शक्य नाही. पण ज्या मूर्ती मुळात बारवेत आहेत त्या अशा (१) बारवेच्या दक्षिण भिंतीस असलेल्या देवकोष्टातील विष्णूमूर्ती (६५ × ५० × १५ से. मी.) हिचा आयुधक्रम दक्षिण करक्रमाने पद्म, शंख, गदा, चक्र असा आहे. ही मूर्ती अपराजित पृच्छा (साधारणत: ११७५ ते १२५० सन) ग्रंथातील मूर्तीलक्षणाप्रमाणे दामोदराची मूर्ती आहे. ती उत्तराभिमुख ठेवली आहे. (२) याच भिंतीत असलेली दुसरी विष्णूमूर्ती माधवाची आहे. (३) दक्षिण भिंतीतील तिसरी विष्णूमूर्ती दामोदराचीच आहे. (४) तर पश्चिम भिंतीस असलेल्या देवकोष्टातील विष्णूमूर्ती काहीशी भंगलेली असून वसुदेवाची आहे. बारवेतील देवकोष्टात असलेल्या पण आज महालक्ष्मीच्या मंदिरात गर्भगृहात ठेवलेली विष्णूमूर्ती (८५ × ४७ × २२ सें. मी.) हृषिकेशाची आहे. अन्य मूर्तीत गरुडारूढ नरसिंहाची (८५ × ५५ × २५सें. मी.) स्थानकमूर्ती आहे. कार्तिकेयाची हंसारूढ मूर्ती सहा तोंडांची आहे. महिषासुर मर्दिनीची (७७ × ५० × २५ सें. मी.) मूर्ती तसेच एक भैरवाचीही मूर्ती आहे. अन्य मूर्तीशिल्पात नागराजाची मूर्ती उल्लेखनीय आहे. कमरेखालील भाग नागाचे वेटोळे असलेला, डोक्यावर सात फण्यांचा नाग, हाती खड्ग व ढाल असलेला हा पुरुष नागराजच आहे. बाजूला अशीच एक स्त्रीप्रतिमा दाखवली आहे. तिच्या हाती ध्वजपताका आहे. याशिवाय अन्य एक लहान प्रतिमा या शिलाखंडावर कोरली आहे. या मूर्तींची निश्चित स्थाने आज दाखवता येत नाहीत. पण या बहुतांश मूर्ती बारवेतील देवकोष्टातच होत्या, हे निश्चित.

श्रीमहालक्ष्मीची मूर्ती

जागजी येथील मंदिराच्या गाभाऱ्यात आज एक हृषिकेशाची मूर्ती मुख्य मूर्तीलगत ठेवलेली आहे. मुळात तेथे एकच श्रीमहालक्ष्मीची मूर्ती ठेवलेली होती. या मूर्तीचे अधिष्ठान व त्यापुढील पादुका पाहिल्या की या बाबी स्पष्ट होतात. मूर्तीशास्त्राच्या अभ्यासकांना आकर्षित करणारी ही श्रीमहालक्ष्मीची मूर्ती (९० × ५५ × ३० से. मी.) आहे. ती बेसाल्टमध्ये घडवली आहे. ती पद्मासनात आहे. तिच्या चार हातात दक्षिणकर क्रमाने तलवार, डमरू, त्रिशूल आणि पानपात्र आहे. पान पात्र असलेल्या हाती नरमुंड घेतले आहे. या पद्मासनस्थ मूर्तीच्या उजव्या मांडीखाली राक्षसाचे शिर आहे. तर डाव्या मांडीखाली एडक्याचे शिर दाखवले आहे. हा रेडा नाही, हे विशेष. मूर्ती वस्त्रालंकारयुक्त असून तिने नरमुंडमाला धारण केली आहे. मूर्तीचा रेखीवपणा, टपोरे डोळे, उन्नत उरोज आणि त्यांचा घोटीवपणा हे एक वैशिष्टय. किर्तीमुखाची नक्षी असलेला करंडक मुकुट असून भालप्रदेशावर पाच नरमुंडांची माला धारण केली आहे. स्थानिक लोक ही श्रीमहालक्ष्मीची मूर्ती म्हणून संबोधतात. कोल्हापूरच्या स्थानाशी या स्थानाचा संबंध दाखवला जातो. कोल्हापूरच्या महालक्ष्मीमूर्तीच्या मस्तकावर शिवलिंग

दर्शविले आहे. चंडीकल्पात महालक्ष्मीचे एक ध्यान " सेवेसैरभ मर्दनीमिह महालक्ष्मीम् " असे सांगितले आहे.

देवताचक्र : आकाशलिंग (?)

महालक्ष्मी मंदिराच्या वर नागर शैलीतील शिखर आहे. तेथे या शिखराचा पूर्वभाग काहीसा कोसळलेला आहे. "या शिखरावर पूर्वी एक चक्र असून ते फिरत होते. मागच्या दोन पिढ्यांपूर्वी ते खाली घसरले आहे." असे गावातील शंकरराव नारायण कुलकर्णी (माजी सरपंच), श्री. सुधाकर प्रल्हाद पाटील (सरपंच), श्री. रामभाऊ अंबादास कुलकर्णी (पुजारी), श्री. बाळासाहेब अंबादास कुलकर्णी इ. नी आत्मविश्वासपूर्वक सांगितले. या मंदिराच्या पुढील ओट्यावर ठेवण्यात आलेले हे चक्र एक मीटर व्यासाचे असून केंद्रस्थानी त्याची कमाल जाडी २० सें. मी. आहे. त्याचा वरील पृष्ठभाग समतल असून खालील बाजूने काहीसे निमुळते आहे. त्यास मधोमध एक खाच आहे. आजही प्रत्यक्षपणे एखाद्या स्तंभावर हे चक्र ठेवले तर स्वत:चा तोल सावरून त्यास फिरते ठेवणे शक्य आहे अशी याची रचना आहे.

या देवताचक्रास पाहिल्यावर मधुसूदन ढाकी यांनी मांडलेली आकाशलिंग ही संकल्पना आठवते. श्री. ढाकी यांनी प्रथमच हा पारिभाषिक शब्द उपयोगात आणला. आकाशलिंग म्हणजे जे उघड्यावरती ठेवलेले आहे, ज्याच्यावरती छप्पर नाही असे लिंग. या कल्पनेने काही मंदिरांच्या शिखरावर, अगदी टोकावर लिंग ठेवलेले असते. याविषयी नोंद " समरांगण सूत्रधार " या ग्रंथात पाहावयास सापडते. श्री. ढाकी यांच्या मते ज्या मंदिरांच्या वर आकाशलिंग आढळते. अशी मंदिरे ओरिसा, हिमालयाचा काही भाग, कर्नाटक आणि पश्चिम आंध्रप्रदेश या भागात आढळतात. अशा मंदिरांच्या वरती एकच शिखर असते. उदा. ओरिसातील गंधरदि येथील सिद्धेश्वराचे इ. स. १० व्या शतकातील मंदिर. आकाशलिंग या संदर्भात अन्यत्र कुठे नोंद आढळत नाही. तसे प्रस्तुत लेखकाच्या पाहण्यात नाही. मौजे जागजी येथे सापडलेले देवताचक्र हे पृष्ठभाग समांतर असलेले आहे. या देवताचक्राच्या मधोमध एक विशेष मूर्ती बहुधा शिवलिंग-किंवा-शिवप्रतिमा असावी. यावरील बहुतांश मूर्ती झिजल्यामुळे याविषयी स्पष्ट सांगता येत नाही. मुख्य चक्रावर एक वर्तुळ कोरलेले असून त्यात चार पुष्पपाकळ्या दिसाव्यात अशा कमलनालाप्रमाणे आठ रेषा दर्शवल्या आहेत. त्या प्रत्येकाच्या टोकावर एक लहान पुष्प दाखवले असून त्यावर मूर्ती आहेत. या चार देवतांच्या जोड्या आहेत आणि दर दोन देवतांच्या मधील भागात किंवा दर दोन पुष्पनालांच्या नंतर असलेल्या जागेत पुन: चार देवतांची जोडपी असावीत. यानंतर असलेल्या वर्तुळपट्टीच्या बाहेर अन्य आठ देवतामूर्ती आहेत. या सर्व मूर्ती पद्मासनात बसलेल्या असून त्यापैकी एक उभी मूर्ती बहुधा सूर्याची असावी. (आकृती पहा)

देवताचक्रावरील मुख्य प्रतिमा शिवाची असून वर्तुळामधील आठ जोड्या म्हणजे अष्टमूर्ती असाव्यात. शैवतंत्रापमाणे शिव, भैरव, श्रीकंठ, सदाशिव, ईश्वर, रुद्र, विष्णू आणि ब्रह्मा या शंकराच्या अष्टमूर्ती होत. कूर्म पुराणांतर्गत खालीलप्रमाणे शिवाच्या अष्टमूर्तींची प्रतिके व परिवार दिला आहे.

[कूर्म पुराण, पूर्वार्ध १०.२६.३० पृष्ठ ३६]

नाव	पत्नी	पुत्र	मूर्त प्रतीक
भव	उमा	शुक्र	जल
सर्प	विकेशी	लोहितांग	मही
ईशान	स्वाहा	मनोजव	वहनी
पशुपती	शिवा	स्कंद	वायु
भीम	दीक्षा	सर्ग	दीक्षित
उग्र	दिशा	संतान	ब्राह्मण
महादेव	रोहिणी	बुध	चंद्र
रुद्र	सुवर्चना	शनि	सूर्य

याविषयीचे विवेचन डॉ. नि. पु. जोशी यांनी आपल्या "भारतीय मूर्तीशास्त्र" या ग्रंथात केले आहे. जागजी येथील देवताचक्रावरील या आठ जोड्या म्हणजे अष्टमूर्ती शिवपत्नीसह आहे, असे वाटते. वर्तुळाबाहेरील मूर्ती कदाचित नवग्रहांच्या असाव्यात. याविषयीचे अन्य मतही असू शकेल. पण हे देवताचक्र म्हणजे आकाशलिंग संकल्पनेतून साकारलेले शिल्प आहे.

एखाद्या शिल्पावर स्वतंत्रपणे अनेक मूर्ती काढण्याची पद्धत मध्ययुगाच्या प्रारंभी रूढ होती. उदा. एका वर्तुळावरील राशीचक्र पट्टन येथे आंध्र प्रदेशात असून ते ११ व्या शतकातील आहे. साधारणपणे याच काळातील दुसरे एक बारा राशींचे चिन्ह शिल्पांकित केलेले चक्र, उत्तरेश्वर मंदिर तेर (जि. उस्मानाबाद) येथे आहे.

जरा वेगळ्या संदर्भात एका वैशिष्ट्यपूर्ण वर्तुळाकृती दगडावर कोरलेले ब्रह्मयंत्र कोलंबी (जि. नांदेड) येथे आहे. अर्थात अशा प्रकारच्या शिल्पावशेषांची ही उदाहरणे झाली. या संदर्भामध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी जमातीपैकी काही ठिकाणी रासक्रीडेचा होणारा पारंपारिक उत्सव याची नोंद करावीशी वाटते. या उत्सवात एक मोठे चक्र (लाकडी) तयार करून ते मलखांबावर चढवतात व दिवसभर फिरते ठेवतात.

जागजी येथील देवताचक्र हे ११ व्या शतकातील असून ते शिखरावर ठेवलेले

होते. पण ते खरोखरीच फिरवता येत होते का? असा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर होकारार्थी देणे योग्य वाटते. मुळात या चक्राची ठेवण आणि घडण करताना या गोष्टीची दक्षता घेतली गेली. परिसरातील जनमानसावर याचा प्रभाव होताच. यातूनच याच पंचक्रोशीत " हिंगळजवाडी " (ता. जि. उस्मानाबाद) येथे १७ व्या शतकाच्या प्रारंभी एका शक्तिपीठाच्या पुढे शिवलिंग स्थापन करण्याचा प्रयोग झाला. आजही येथील शिवपिंड ही स्थानावर केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेममुळे लीलया फिरते. एकसंध दगडात शिवलिंग व योनीभाग घडवून त्यास एक छेद, योनीच्या पीठास दिला गेला. या ठेवलेल्या एका ग्रू (खाच) मुळे प्रथमदर्शनी एकसंघ दिसणारे शिवलिंग हात लावले की फिरते होते. स्थिर शिवाला फिरते करण्याची कल्पना म्हणजे जागजीपासून मिळालेली प्रेरणा होती.

संदर्भ :


१. भारतीय मूर्तीशास्त्र डॉ. नि. पु. जोशी, नागपूर (१९७९)

२. भारतीय पुरातत्त्व-एक समालोचन- प्रा. ह. धी. सांकलिया, मुंबई (१९८९)


३. भारतीय जलसंधारण व्यवस्था की प्रगती —डॉ. र.पु. कुलकर्णी, " दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) " या मासिकाचा (कलकत्ता-डिसेंबर ८९) अंक

४. अपराजितपृच्छा-संपा.-युवनदेवाचार्य-गायकवाड ओरिएंटल सिरीज, पोपटभाई अंबरशंकर मंकड क्र. ११५ (१९५०)

५. समरांगणसूत्रधार-संपा. व्ही. एस. अग्रवाल, गायकवाड ओरिएंटल सिरीज क्र. २५ (१९६६) बरोडा




PLAN OF BARROW AT JAGII TQ. DIST. OSMANABAD




PLAN OF TEMPLE


AT SAGJI TQ DIST. OSMANABAD



FORNT ELEVATION



SECTION ON AA



धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र

डॉ. सौ. मीरा आरोळे

कुरुक्षेत्राला धर्मक्षेत्र असे का म्हटले जाते? ज्या ठिकाणी कौरव-पांडवांचे युद्ध होऊन कित्येक योद्धे स्वर्गवासी झाले त्या क्षेत्राला धर्मक्षेत्र ही संज्ञा कशी प्राप्त झाली? नक्की कोणता धर्म येथे अस्तित्वात होता? वगैरे अनेक प्रश्न उद्‌भवतात. या संदर्भात कित्येक दंतकथा साहित्यात उपलब्ध आहेत. प्राचीन काळी कोणत्याही क्षेत्राचे महत्त्व हे ते क्षेत्र ज्या नदीच्या काठी वसलेले आहे त्यावरून ठरविण्यात येई. कुरुक्षेत्र हे पंचनद्यांमध्ये जिचा समावेश केलेला आहे अशा पवित्र सरस्वती नदीच्या तीरावर वसलेले आहे आणि या नदीमुळेच कुरुक्षेत्राला असामान्य महत्त्व प्राप्त झाले.

कुरुक्षेत्राला धर्मक्षेत्र ही संज्ञा कशी प्राप्त झाली याविषयी वामन पुराणात[१] खालील प्रमाणे कथा आढळते :

कुरु राजा तीर्थयात्रा करत करत कुरुक्षेत्रातील पवित्र अशा द्वैतवनात आला. याठिकाणी सरस्वती नदीमुळे एक मोठा तलाव तयार झालेला होता. ते सरस्वतीचे पाणी पाहून राजा अतिशय प्रसन्न झाला. त्याने तीत स्नान केले. नंतर तो ब्रह्मदेवाने जेथे यज्ञ केलेले होते त्या समन्तपंचक या उत्तरवेदीकडे गेला. सरस्वतीच्या तीरावरील हे ठिकाण अष्ट गुणांनी युक्त अशा अध्यात्मिक संस्कृतीच्या पेरणीस योग्य आहे असे त्याला वाटले. तो रथातून खाली उतरला. त्याने एक सोनेरी नांगर घेतला आणि त्याच्या एका बाजूला शिवाचा नंदी आणि दुसरीकडे यमाचा रेडा जुंपून नांगरणीस सुरुवात केली. त्याने चौदा चौरस मैलांचा परिसर नांगरला तोच तेथे इंद्र आला आणि त्याने विचारले, 'हे तू काय करतोस?' राजा म्हणाला, 'मी तप, सत्य, क्षमा, दया, शौच, दान, योग आणि ब्रह्मचर्य या आठ गुणांनी युक्त असा मार्ग नांगरत आहे.' इंद्राने विचारले, 'या गुणांचे बीज कोठे मिळेल?' आणि उत्तराची वाट न पाहताच हसून तो निघून गेला. राजाने जमीन नांगरणे चालूच ठेवले. तेवढ्यात भगवान विष्णू त्या ठिकाणी आले. त्यांनीही राजाला 'हे तू काय करतोस?' म्हणून विचारले. राजाने उत्तर दिले, 'अष्टांगमहाधर्माची मी नांगरण करतोय.' तेव्हा विष्णूने विचारले, 'याचे

बीज कोठे मिळेल ? ' राजा उत्तरला, 'याचे बीज माझ्या शरीरातच आहे.' विष्णूने राजाजवळ या बीजाची मागणी केली तेव्हा राजाने त्याचा उजवा हात (बीज म्हणून) पुढे केला. विष्णूने त्याच्या सुदर्शन चक्राने त्या हाताचे हजारो तुकडे करून राजाने नांगरलेल्या जमिनीवर टाकले. नंतर राजाने दुसरा हात, मांड्या इत्यादी पुढे केले. विष्णूने त्याचे बारीक बारीक तुकडे करून पुन: नांगरलेल्या जमिनीवर टाकले. शेवटी राजाजवळ फक्त मस्तकच देण्यासाठी शिल्लक राहिले. भगवान विष्णू राजाच्या या त्यागवृत्तीवर अत्यंत प्रसन्न झाले आणि त्यांनी राजाला वर दिला की, "जी भूमी राजाने नांगरली होती ती यापुढे 'धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र' या नावाने ओळखली जाईल. येथील सरस्वती नदीत जो स्नान करील त्याला विलक्षण पुण्यप्राप्ती होईल. तसेच येथे जो यज्ञ करील किंवा धार्मिक ग्रंथाचे वाचन करील त्याला पुण्यप्राप्ती होईल. जे येथे प्राणत्याग करतील त्यांना मुक्ती मिळेल.

वामन पुराणातील या कथेशिवाय वायु, विष्णू, मार्कण्डेय, मत्स्य, अग्नि, नारद, ब्रह्माण्ड आणि भागवत पुराणातूनही कुरुक्षेत्राचा संबंध कुरुशी जोडण्यात आलेला आहे. महाभारताच्या शल्य पर्वातही अशाच आशयाची गोष्ट आलेली आहे. अकराव्या शतकातील अल्बेरूणी हा अरब इतिहास देखील कुरुचा संबंध कुरुक्षेत्राशी असल्याचे सांगतो.[२]

'कुरु' या शब्दाचा अर्थ 'पुरोहित' किंवा 'शिजवलेला भात' असा आहे. याचा संबंध कदाचित् पौरोहित्य करणाऱ्या कुरु या जमातीशी असू शकेल.

महाभारत आणि पुराणातून कुरुक्षेत्राच्या धार्मिक, सांस्कृतिक इतिहासावर फार मोठा प्रकाश पडतो. कुरुक्षेत्रातून वाहणाऱ्या नद्या, तेथील जंगले, आश्रम आणि तेथील विविध संप्रदाय यासंबंधी माहिती आपल्याला यातून मिळते. या भागातून वाहणाऱ्या सरस्वती, आपगा, अरुणा, दृषद्वती, कौशिकी, वैतरणी आणि ओघवती या पवित्र नद्यांचा उल्लेख महाभारत[३] आणि वामन पुराणात[४] येतो. यापैकी बऱ्याचशा नद्या जरी आटून गेलेल्या असल्या तरी त्यांच्या काठावर झालेल्या सांस्कृतिक घडामोडींचा आढावा आपल्याला साहित्यात मिळतो. सरस्वती नदीमुळे कुरुक्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सरस्वती नदी म्हणजे वैदिक ऋषींचे स्फूर्तिस्थान! महाभारत आणि पुराणातून हिचा उल्लेख वेदमाता, वेदगर्भा, श्रुती इत्यादी शब्दांत केलेला आहे. ऋग्वेदात सरस्वतीला सिनीवाली म्हणजे समृद्धीची देवता असे म्हटले आहे. हिच्या आसपासचा प्रदेश हिरवागार आणि समृद्ध आहे. वैदिक ऋषींनी तिच्याकडे समृद्धी, दूध आणि तिच्या काठावर कायम वास्तव्याची मागणी केलेली आढळते. अथर्ववेदात[५] इंद्राने मरुतांना तिच्या काठी बार्ली पेरण्यास मदत केल्याचा उल्लेख आढळतो. ऋग्वेदात[६] सरस्वतीने पाच जमातींना पोसल्याचा उल्लेख आहे. हिच्या काठावर भरत, ययाति, नहुष, पुरु आणि

त्याच्या वंशजांनी राज्य केले. महाभारतातील शल्य पर्वात सरस्वतीच्या पुत्र सारस्वत याने दुष्काळी परिस्थितीत जेव्हा इतर सर्व लोक तिला सोडून गेले तेव्हा तिचा त्याग न करता त्याने वेदांचे रक्षण केल्याचे म्हटले आहे.[६अ]

महाभारतात[७] सरस्वती आणि दृषद्वती यामधील भागाला कुरुक्षेत्र असे म्हटले आहे. हा परिसर १६० मैलांचा असून तेथे ३६० तीर्थे होती. अथर्ववेदात[८] अश्विनांना येथे कमळांनी राज्याभिषेक केल्याचा उल्लेख आहे. आणि सरस्वती नदीत सदैव भरपूर पाणी राहावे म्हणून त्यांची प्रार्थना केलेली आहे. कुरुक्षेत्रातील कमळांच्या ताटव्यांचे वर्णन महाभारतात[९], विष्णू पुराणात[१०] आणि बाणाच्या हर्षचरितातही[११] आलेले आहे. हे कमळांचे ताटवे आज देखील या ठिकाणचे वैशिष्ट्य दाखवतात.

कुरुक्षेत्राच्या चतु:सीमा तरंतुक, अरंतुक, रामह्रद व मचक्रुक अशा दिल्या आहेत. याला उत्तरवेदी, अंतरवेदी, धर्मक्षेत्र व विनशन क्षेत्र अशी दुसरीही नावे आहेत. हे क्षेत्र सरस्वतीच्या दक्षिणेस व दृषद्वतीच्या उत्तरेस आहे असे महाभारतात म्हटले आहे. तैत्तिरीय आरण्यकात[१२] कुरुक्षेत्राच्या मर्यादा दक्षिणेस खांडववन व उत्तरेस तुरघ्न व पश्चिमेस परीणह अशा दिल्या आहेत. बाराव्या शतकातील हेमचंद्राच्या अभिधान चिन्तामणि[१३]मध्ये कुरुक्षेत्राचा परिसर बारा योजने होता असे म्हटले आहे. हॉपकिन्स[१४] यांच्या मते प्रत्येक सीमेवर द्वारपाल यक्ष असावेत. ईशान्येस रत्नयक्ष, वायव्येस अरत्नुक यक्ष, नैर्ऋत्येस कपिल यक्ष तर आग्नेयेस बचक्रुक यक्ष होते. या सीमा जर गृहीत धरल्या तर कुरुक्षेत्राचा परिसर अंदाजे वीस योजने म्हणजे १६० मैल होतो.

येथील पवित्र वने म्हणजे काम्यकवन, द्वैतवन, फलकीवन, अदितिवन, व्यासवन, सूर्यवन, मधुवन, सीतवन ही होत. सरस्वती नदीच्या तीरावर वसिष्ठ आणि विश्वामित्र या ऋषींचे आश्रम होते. येथे कित्येक मैलांवरून विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येत असत. येथील ब्रह्मसर, संनिहितसर, ज्योतिसर, स्थानेसर व कालेसर ही सरोवरे प्रसिद्ध आहेत. तसेच चंद्रकूप, विष्णुकूप, रुद्रकूप व देवीकूप हे चार कूपही प्रसिद्ध आहेत.

कुरुक्षेत्रातच प्रजापतीने सहस्त्र वर्षांचे सत्र केले होते. त्यामुळे या क्षेत्राला प्रजापतीची उत्तर वेदी म्हणत असत. अंबरीष, ययाती इत्यादी राजांनीही येथे अनेक यज्ञ केले. सरस्वती व दृषद्वती यांना देवनद्या आणि त्यांच्यामधील प्रदेशाला ब्रह्मावर्त म्हणत असत. या देशातील आचार हाच सदाचार मानला जाई.[१४]

कुरुक्षेत्राशी निगडित असलेले देव म्हणजे ब्रह्मा, शिव, विष्णु, इंद्र, अग्नि, कार्तिकेय, सूर्य आणि वामन होत. याला ब्रह्मावर्त आणि ब्रह्मक्षेत्र म्हणतात. कारण येथील संनिहितसर मधून ब्रह्मदेवाने सृष्टीची उत्पत्ती केली.[१५] अशाच प्रकारची कथा पृथूदक या तीर्थाबद्दल वामन पुराणात[१६] आलेली आहे. वामन अवतारामध्ये विष्णूचे वास्तव्य कुरुक्षेत्रात होते असे वामन पुराणात[१७] म्हटले आहे. यौधेयांची कार्तिकेयाच्या छापाची नाणी या

भागात बरीच सापडली आहेत. त्यावरून येथे कार्तिकेयाची पूजा अस्तित्वात होती असे दिसते. सूर्याने याठिकाणी आदित्यतीर्थावर यज्ञ करून इतर ग्रहांवर वर्चस्व मिळविले असा उल्लेख महाभारतात[१८] येतो.

शतपथ ब्राह्मणात[१९] पुरुरवा आणि उर्वशीच्या कथेची सांगड कुरुक्षेत्राशी घातलेली आहे. त्यांची वियोगानंतरची भेट कुरुक्षेत्रात होते असा उल्लेख आहे. वेदातील अनेक सूक्ते याठिकाणी तयार झाली. कित्येक यज्ञ येथे झाले, त्यामुळे ही भूमी अत्यंत पवित्र बनलेली आहे. इतकेच नव्हे तर वैदिक मंत्रोच्चारणात देखील एक प्रकारचे खास वैशिष्ट्य कुरुक्षेत्राने निर्माण केलेले आहे. उत्तर वैदिक काळात अध्यात्मिक क्षेत्रात उन्नतावस्थेस पोहोचलेला उद्दालक आरुण येथेच होऊन गेला.

कुरुक्षेत्र हे अध्यात्मिक उन्नतीसाठी एक अद्वितीय ठिकाण होते. इंद्र, विष्णु, विश्वेदेव यांनी येथे मोठे यज्ञ सत्र केले होते. त्यामुळे ही देवभूमीच आहे असे लोक मानू लागले. याठिकाणी अनेकांनी तप केलेले आहे आणि ते फलद्रुपही झालेले आहे. अशाच प्रकारची एक कथा ऐतरेय ब्राह्मणात[२०] आलेली आहे. कवश हा दासीपुत्र होता म्हणून इतर ब्राह्मणांनी त्याला हाकलून दिले आणि वाळवंटात सोडले. परंतु कवशाने सरस्वतीची प्रार्थना केली आणि तेथील वाळवंटात सरस्वती नदी येऊन तिने त्याची तहान भागवली. या भागाला 'परिसरक' असे नाव पडले.

पंचविंश ब्राह्मणातील[२१] इंद्र आणि रुषमा यांच्या कथेमुळे तर कुरुक्षेत्राचे महत्त्व अधिकच द्विगुणीत होते. एकदा इंद्र आणि रुषमा यांची पृथ्वी प्रदक्षिणा कोण अगोदर करतो याविषयी पैज लागली. इंद्र पृथ्वी प्रदक्षिणेसाठी गेला. पण रुषमाने मात्र कुरुक्षेत्रालाच प्रदक्षिणा घातली आणि 'पैज मी जिंकली' असा दावा केला. शेवटी दोघेही देवांकडे न्यायनिवाड्यासाठी गेले. देवांनी सांगितले की, 'कुरुक्षेत्र हे प्रजापतीच्या वेदी इतकेच महान् आहे. त्यामुळे कुरुक्षेत्राला प्रदक्षिणा घातली म्हणजे पृथ्वी प्रदक्षिणेचे श्रेय मिळेल.'

कुरुक्षेत्रातच विष्णूने मधु आणि कैटभ या राक्षसांना ठार मारले होते.[२२] विष्णूच्या नरसिंह अवतारात त्याने कृतशौच या ठिकाणी हिरण्यकश्यपूला मारले असल्याचे महाभारतात[२३] म्हटले आहे.

कुरुक्षेत्रातील व्यासस्थली (कर्नाल जिल्ह्यातील बस्थली) येथे वेदांचे संग्राहक आणि पुराणांचे लेखक व्यास रहात होते. यांच्या भेटीसाठी कश्यप, जमदग्नि, भारद्वाज, गौतम, वसिष्ठ, जैमिनी, धौम्य, मार्कण्डेय आणि वाल्मिकी हे नऊ ऋषी आले असल्याचा उल्लेख ब्रह्मपुराणात[२४] आढळतो.

सूर्य ग्रहणाच्या वेळी कुरुक्षेत्रातील तीर्थात स्नान करणे अत्यंत पवित्र असल्याचे महाभारत, मस्त्य, पद्म आणि वामन पुराणात सांगितले आहे. सांप्रतही सूर्यग्रहण प्रसंगी येथे मोठी यात्रा भरते. या स्नानामुळे शंभर अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य लाभते असे

महाभारतात[२५] म्हटले आहे.

या सर्व दंतकथा असल्या तरी या सर्वांमधून कुरुक्षेत्राला फार मोठे मानाचे स्थान दिलेले आहे. लोक या ठिकाणी श्रद्धेने तीर्थस्नानासाठी जात असत आणि पुण्यप्राप्तीच्या समाधानाने परतत असत.

कुरुक्षेत्राची महती सांगताना महाभारतात[२६] असे म्हटले आहे की, 'मी कुरुक्षेत्रात जाईन, मी कुरुक्षेत्रात राहीन असे नेहमी बोलणारा सुद्धा पापांपासून मुक्त होतो. इतकेच नव्हे तर नुसत्या कुरुक्षेत्राच्या वाऱ्याबरोबर आलेल्या धुळीने सुद्धा मुक्ती मिळते.'[२७] नारद पुराणात[२८] असा उल्लेख आहे की, 'ग्रह, नक्षत्र, तारे यांना काही काळानंतर आकाशातून खाली पडण्याची भीती असते पण कुरुक्षेत्रावर देह ठेवणारास पुनर्जन्माची भीती नाही. येथे युद्धात जो मरण पावतो त्याला स्वर्गप्राप्ती होते. यामुळेच भारतीय युद्धासाठी ही भूमी निश्चित केली गेली.

महाभारतात द्रोणाचार्यांच्या मृत्यूनंतर कौरवांच्या सैन्याचा सेनापती कर्ण बनतो. आणि त्याच्या रथाचे सारथ्य शल्य करतो. त्यावेळी पंचनद्यांचा प्रदेश असलेल्या मद्र देशाची आणि त्यांच्या संस्कृतीची कर्ण अतिशय निर्भत्सना करतो. कै. डॉ. वासुदेव शरण अग्रवाल यांच्या मते बाल्टीक येथील ग्रीकांनी कुरुक्षेत्र आणि त्याभोवतालचा भाग त्यावेळी पादाक्रांत केला होता. त्यामुळे तेथील आर्यसंस्कृतीचा पूर्णपणे ऱ्हास झाला होता. कर्णाने केलेली निंदा म्हणजे इंडो-ग्रीक किंवा यवनांची निंदा होय. धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रात अधर्माचे प्राबल्य झाल्यामुळे तेथे आर्यांनी एकाहून अधिक दिवस राहणे योग्य नव्हे असे लोक मानू लागले.

पञ्चनद्यो वहन्त्येता यत्र नि:सृत्य पर्वतात्।
आरट्टा नाम बाह्लिका न त्वेष्वार्योद्वहं वसेत्॥

कर्णपर्व. ३०-४३.

इतकेच नव्हे तर आख्यक पर्वात (१२९.१०) असे म्हटले आहे की, कुरुक्षेत्रात दिवसा जाऊन लगेच परत फिरावे, रात्री तेथे राहू नये. इसवी सनपूर्व दुसऱ्या शतकात केवळ तीर्थस्नानासाठी तेथे जाऊन परतण्याची प्रथा सुरू झाली.

बुद्धपूर्व काळात कुरुक्षेत्र हे अेक महाजनपद होते. इ.स. पू. ३२२ पासून इ.स.पू. १८५ पर्यंत हा प्रदेश मौर्य साम्राज्याचा एक भाग होता. इसवी सनाच्या पाचव्या शतकात तो गुप्त साम्राज्यात गेला. सम्राट हर्षवर्धनाच्या काळापर्यंत हे क्षेत्र सांस्कृतिक व सामाजिक दृष्टीने उन्नतीच्या शिखरावर होते. सातव्या शतकात भारतात आलेल्या ह्युएनत्संगने याला 'सौख्यभूमी' म्हटले आहे. त्यानंतरचा याचा इतिहास परकीय आक्रमणे व त्यामुळे झालेला विध्वंस यांच्या वर्णनांनी भरलेला आहे. थानेश्वर, पानिपत, तरावडी, कैथल, कर्नाळ इत्यादी इतिहासप्रसिद्ध रणक्षेत्रे याच प्रदेशात आहेत.

संदर्भ वाङ्मय

१. वामन पुराण. २३.१२ - ३३.
महाभारत, शल्य पर्व. ९.५२.१ - २०.

२. Al-Bruni's India, Sachau, B.C. (ed) 1964. II. P.147.

३. महाभारत आरण्यक पर्व.

४. वामन पुराण. २३.१३.

५. अथर्ववेद. ६.३०.१.

६. ऋग्वेद. ६.६१.१२.

६अ. महाभारत शल्य पर्व. ९.५०.५२.

७. आरण्यक पर्व ३.८३.४.

८. अथर्ववेद. ३.२२.४.

९. महाभारत. १.२०७.४७ - ८

१०. विष्णु पुराण. ४.५.

११. हर्षचरित. ३.९४.

१२. तैत्तिरीय आरण्यक. ५.१.१.
देवा वै सत्रमासत। -- तेषां कुरुक्षेत्रे वेदिरासीत्।
तस्यै खाण्डवो दक्षिणार्धं आसीत्। तूर्घ्नमुत्तरार्धः।
परीणज्ज घनार्धः। भरवः उत्कटः॥

१३. हेमचंद्र, अभिधानचिन्तामणि (भावनगर आवृत्ती) पृ. ३७९.

१४. मनुस्मृति. २.१७.१८

१५. नारद पुराण. ६४.१३, वामन पु. २२.१७ च्या पुढे.

१६. वामन पुराण. २३.४४.

१७. वामन पुराण. १५.६५.७८.

१८. महाभारत. ९.४८.१६ - १८.

१९. शतपथ ब्राह्मण ११.५.१.४.

२०. ऐतरेय ब्राह्मण. ८.१.

२१. पंचविंश ब्राह्मण. २५.१३.३.

२२. महाभारत शल्यपर्व. ९.४८.२१.

२३. महाभारत. ३.१००.२०.

२४. ब्रह्म पुराण. २६.६ च्या पुढे.

२५. महाभारत. ३.८१.१६७
२६. महाभारत. ३.८१.१७६.
कुरुक्षेत्रे गमिष्यामि कुरुक्षेत्रे वसाम्यहम्।
य एवं सततं ब्रूयात् सर्व पापै: प्रमुच्यते॥ ३.८१.१७६.
२७. महाभारत. ३.८१.१७४.
पांसवोऽपि कुरुक्षेत्रे वायुना समुदीरिता:।
अपि दुष्कृतकर्माणं नयन्ति परमां गतिम्॥ ३.८१.१७४.
२८. नारद पुराण. २.६४.२३-२४.
मराठी विश्वकोश, खंड ४ पृ. १०१.
भारतीय संस्कृतिकोश खंड २, पृ. ४२५.
२९. Datta, V. N. and Phadke, H. A.
History of Kurukshetra, kurukshetra 1985.
Bharadwaj, O. P. Ancient Kurukshetra,
New Delhi, 1991

पेशवे थोरले बाजीराव यांचे शेती संरक्षणविषयक धोरण

प्रा. एस. ए. पाटील

प्रस्तुत निबंधात मराठ्यांच्या आर्थिक इतिहासाचे एक अंग म्हणून पेशवे थोरले बाजीराव यांनी शेतकऱ्यांना दिलेले संरक्षणविषयक धोरण वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पेशव्यांपर्यंतच्या मराठी राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीच्या काळात कर्जपुरवठा, तगाई व शेतसाऱ्यात सूट देऊन आर्थिक मदत केल्याचे दिसून येते.

बाजीरावाच्या काळात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेती व्यवसायाशी संपूर्णपणे निगडीत झाले होते. शेती व्यवसाय हाच जीवनाचा एकमेव मार्ग होता. शेतीच्या उत्पादनावरच गावचे अधिकारी, मिरासदार, बलुतेदार, उपरे यांचे जीवन अवलंबून होते.

सतराव्या व अठराव्या शतकात महाराष्ट्रात विविध राजकीय घडामोडी घडत होत्या आणि स्वाभाविकच त्याचे पडसाद शेतकऱ्यांच्या जीवनावर आणि व्यवसायावर पडत होते. पावसाची अनिश्चितता, सतत होणारी युद्धे, आर्थिक मदतीचा अभाव इ. कारणांमुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय आणि शेतकरी हे दोन्ही मागासलेल्या अवस्थेत होते.

पेशवे थोरले बाजीराव यांनी शेतकऱ्यांना संरक्षण देऊन त्यांची स्थिती सुधारल्याचे अनेक दाखले वाचावयास मिळतात. बाजीरावाच्या काळी शेती हाच प्रमुख धंदा होता. इतर उद्योगधंदे लहान प्रमाणावर चालू होते. शेती पुष्कळच चांगल्या स्थितीत असावी असे दिसते. इतर उद्योगधंदे कमी प्रमाणात असल्यामुळे कराचा बोजा प्रामुख्याने शेतीवरच होता. बाजीरावाच्या काळात सरकारी वसुलाच्या बाबी पुष्कळ असल्या तरी त्या सर्वात जमीन बाब ही मुख्य होती. जमिनीच्या प्रतीप्रमाणे तिची अव्वल, दुय्यम व सीम अशी प्रतबंदी केली जात असे. ही प्रतबंदी जिराईत जमिनीपुरती होती. त्याखेरीज बागाईत जमिनीची पाटस्थळ व मोटस्थळ अशी वर्गवारी पाडलेली होती व त्यानुसार वसूल ठरविला जाई. इ.स. १७२८ मध्ये पुणे प्रांतातील करेपठार तालुक्यातील चावली गावाच्या शेतकऱ्यांना बागाईत अधिक लागवडीखाली यावी म्हणून

बाजीरावाने प्रोत्साहन दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून वाचावयास मिळते. नव्या विहिरीवरील बागाईत वाढविण्यासाठी चार वर्षांकरिता शेतसारा सूट देण्यात आला. आणि पाचव्या वर्षी ह्या विहिरीवर एक मोट चालविल्यास वर्षाला एक होन आणि दोन मोटा चालविल्यास वर्षाला दीड होन शेतसारा घेण्याचा कौल सादर केला होता.[१]

शेतीस उत्तेजन देण्याचे अनेक प्रयत्न बाजीराव पेशव्यांनी केले. प्रत्येक गावात अनेक पड जमिनी असत. नावाला शेतसारा घेऊन अशा जमिनी लागवडीत आणण्यासाठी बाजीरावाने अनेक प्रयत्न केलेत असे दिसते. अशा संबंधाचे अनेक आदेश पेशवा रोजकिर्दीत सापडतात. जमिनीत नवीन लागण करतांना काही मुदतीपर्यंत शेतसारा वसुलीची माफी दिली जात होती. पड जमिनीची नवीन लावणी करतांना रयतेकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष दिले जाई. पड जमीन लावणीस घेताच तिच्यात एकदम उत्कृष्ट उत्पन्न येणे शक्य नसे. तिची सुधारणा हळूहळू होत असे व त्याच प्रमाणात तिचे उत्पन्न वाढत असे ही बाब लक्षात घेऊन पेशवे थोरले बाजीरावाने ऑक्टोबर १७२२ मध्ये सुपे येथील सातभाई सेरे याची वाडी वगैरे पड जमिनी शेती करावयास दिली होती.[२] येथील जमिनीची लावणी पहिल्या वर्षी दर बिघा दोन आणे, दुसऱ्या वर्षी चार आणे, तिसऱ्या वर्षी सहा आणे आणि चौथ्या वर्षी दर बिघा आठ आणे याप्रमाणे चार वर्षासाठी चढत्या क्रमाने वसुलीसाठी दिली होती.

थोरल्या बाजीराव पेशव्यांनी नव्या कुळांना जुन्या कुळांपेक्षा जास्त सवलती दिल्याचे दाखले कागदपत्रातून आढळतात. पड जमीन लवकर लागवडीत आणण्यासाठी बाजीरावाने उत्तेजन म्हणून काही सवलती दिल्या होत्या. इ. स. १७२५ मध्ये शाहापूर येथील जुन्या कुळांना रु. २०१ खंडणी पाच वर्षासाठी उगवणी करिता नेमून दिली होती आणि नवीन कुळे येतील तर त्यांना मात्र पुढील वर्षापासून तीन वर्षापर्यंत सारा माफ केला होता व तीन वर्षे झाल्यावर योग्य ती खंडणी घ्यावी असाही आदेश दिलेला होता. त्यांनी जमिनीची लागवड करून उगवणी केल्यावर पहिल्या वर्षी एक, दुसऱ्या वर्षी दोन आणि तिसऱ्या वर्षी तीन असा रुपये बारा करार केला म्हणजेच पहिल्या वर्षी दोन, दुसरे वर्षी चार आणि तिसरे वर्षी सहा असा एकूण रुपये बारा उगवणीसाठी करार केला होता असे आढळून येते.[३]

शत्रूची धाड पडली किंवा धामधुमीचा प्रसंग निर्माण झाला म्हणजे शेतकऱ्यांच्या हाती काही पिक लागत नसे. शत्रूचे तंबू ज्या ठिकाणी ठोकले असतील तेथे तर सारी जनावरे, घोडी पिकात चरावयास सोडली जात आणि सारे पिक उध्वस्त होई. पिके जाळण्याचेही प्रकार घडत. धामधुमीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असता त्या नुकसानी पुरतेच शेतकऱ्यांना साऱ्याची माफी देण्याची दक्षता पेशवे सरकार घेत असे. किंवा मुलुखाची आबादानी करण्याविषयी कौल दिला जात असे. इ.स. १७२९ च्या सुमारास धामधुमीमुळे इंदापूर परगणा उद्ध्वस्त झाला होता. त्यावेळी सरकारचा

महसूल देण्याची कुवत शेतकऱ्यांच्या अंगी राहिली नव्हती. म्हणून पेशवे थोरले बाजीराव यांनी जिवनराव शंकर यास परगण्याची लागवड करण्याचा आदेश दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून आढळून येते.[४]

धामधुमीमुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्यास पेशव्यांनी शेतकऱ्यांना शक्य तेवढी आर्थिक मदतही केली होती. इ.स. १७२८ च्या सुमारास हुंकेरी परगण्यात मराठा सरदारांच्या आपसातील लढायांमुळे तमाम परगण्याची नासधूस होऊन रयतेला नापिकामुळे दुष्काळाचा जबरदस्त तडाखा बसला त्यावेळी पेशवे सरकारने शेतीच्या लागवडीसाठी व उगवणीसाठी रु. २५०० ची जमाबंदीत सूट दिल्याचे दिसते आणि तेथील रयतेला या आपत्तीतून वाचविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.[५] धामधुमीमुळे रयत परागंदा झाली म्हणजे त्यामुळे शेतजमिनीची लावणी होत नसे. अशावेळी पेशवे सरकार शेतकऱ्यांना लावणी करण्यासंबंधी अभयपत्र देत असे आणि जमीन पडीक राहणार नाही याची काळजी घेतली जात असे. थोरल्या बाजीराव पेशव्यांनी अशा प्रसंगी शेतकऱ्यांना दर बिघा वसुलीत काही सवलत दिल्याचे कागदपत्रातून दिसून येते. कर्यात कासीगावातील रेठरे गावावर शत्रूच्या धाडी पडल्यामुळे तेथील रयत परागंदा झाली होती. त्यावेळी बाजीराव पेशव्यांनी शेतकऱ्यांच्या विनंती अर्जावरून जमिनीची लागवड करण्याचे अभयपत्र दिले होते.[६] इनाम जमीन सैन्याच्या हालचालीमुळे किंवा धामधुमीमुळे बरेच दिवस खराब पडलेली असतांना अशा वेळी थोरल्या बाजीराव पेशव्यांनी गावाची लागवड करण्याविषयी माळेगांऊच्या पद्मसिंग बापाजी देशमुखास अभयपत्र दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून आढळून येते.[७] त्याचा तपशील खालीलप्रमाणे वाचावयास मिळतो,

" ....अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास नीधी राजमान्य राजश्री बाजीराव पंडीतराव प्रधान ता। मोकदमान मौजे माळेगाऊ उर्फ पा। सुपे सुमासमान सलासीमया व अलफ दिल्हे अभयपत्र अैसिजे पद्मसिंग बीन बापाजी कोट देशमुख पा। मजकूर याणी विदित केले की मौजे मजकूर स्वराज्य व मोगलाई दुतर्फा पूर्वीपासून ईनाम आपणाकडे आहे त्यास बहूत दिवस खराबा पडीले आहे तरी कृपाळू होऊन अभयपत्र सादर होईल तरी गावाची लावणी करून मशूर केले जाईल म्हणून त्याजवरून मनास आणून-----तुम्हास अभयेपत्र सादर केले असे तरी कोबेविसी -----"

दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीची उपाययोजना म्हणून आर्थिक स्वरुपात मदत दिल्याची काही उदाहरणे ऐतिहासिक कागदपत्रातून वाचावयास मिळतात. थोरले बाजीराव पेशवे यांच्या काळात कर्नाटकातील खेडवाडी तालुक्यात भयानक दुष्काळ पडून तमाम मुलूख वैराण झाला होता. तेव्हा तेथील शेतकऱ्यांना कौल देण्यात आला होता आणि पुनर्वसन करून ज्याच्याजवळ बैल नसेल त्याला बैल घेण्यासाठी व ज्याला पोटास धान्य नसेल त्याला धान्य देऊन राहण्यासाठी घरे

बांधून दिली होती.[८]

इ.स. १७२५-३१ च्या सुमारास नेर परगण्यात शत्रूच्या धाडी पडून पिकांची खूप नासाडी झाली होती. तसेच उदाजी पवार व गायकवाड यांच्यातील युद्धामुळे परगण्याचे अतोनात नुकसान झाले असता पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यानेही परगण्याची आबादानी करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.[९]

शेतीवरील कर हे जरी तत्कालीन पेशवे सरकारचे मुख्य उत्पन्न असले तरी शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती पाहून महसूल ठरविला जात असे. एखादे वेळी महसूल ठरविल्यानंतरही जर एखादा शेतकरी किंवा कूळ महसूल देण्यास असमर्थ असल्याचे सिद्ध झाल्यास त्यावेळी त्याला महसूल माफ केला जात असे आणि प्रत्येक गावी वतनदार व इनाम जमीन जितकी असेल तेवढी सोडून इतर जमिनीची मोजणी केली जाई आणि नंतर खंडणी ठरविण्यात येत असे.

काही कारणामुळे जमिनीचा कसदारपणा कमी होऊन शेतकऱ्याचे नुकसान होत असे. परिणामी सरकारचे उत्पन्न कमी येत असे. अशा शेतकऱ्यांना संरक्षण देऊन शेतीचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करण्याचे धोरण पेशवे बाजीरावाने स्वीकारले होते. हे पुढील उदाहरणावरून दिसून येईल- " ..... मौजे कठापूर गांव सालमजकूरी येथे रबीच्या वावरात कर्डी पेरतात त्यास कर्डी न पेरणे. गहूं हरभरे पेरणे, रबी पिकत नाही म्हणून दहशत घेतली तर पीक रबीचे होईल त्याचा महसूल घेतला जाईल पीक कम जाले तर सिवार पाहून पिकाप्रो। वसूल घेऊ .... "[१०]

शेतकऱ्यांना शेतीव्यवसायात शक्य त्या प्रमाणात सवलती व साऱ्यात सूट देण्याचे धोरण पेशवे बाजीरावाने स्वीकारले होते. पुणे प्रांतातील हवेली तालुक्यात दिघी गावातील शेतकऱ्यांना दुष्काळाचा इ.स. १७२६ मध्ये जबरदस्त तडाखा बसला. त्यावेळी पेशव्यांचा अधिकारी संभाजी पवाराने पुढील वर्षाच्या लागवडीचा विचार करून सरकारी वसुलात कमी करून साऱ्यात सूट दिली आणि शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे दिसून येते.[११] तसेच बाजीरावाच्या कारकीर्दीत का। पुणे मुजेरी येथील शेतकऱ्यांना दुष्काळाचा तडाखा बसला त्यावेळी पेशव्यांनी शेतकऱ्यांना अभयपत्र दिले आणि १५२६ रुपये खंडणी ठरवून दिली व पुढील वर्षाच्या लागवडीस प्रोत्साहन दिले होते.[१२]

जमिनीचे क्षेत्र जास्तीत जास्त प्रमाणात बागाईत व्हावे यासाठी पेशवे थोरले बाजीरावाने पाटबंधाऱ्याच्या योजनांनाही उत्तेजन दिले. अर्थात शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या कार्याकडे अगदी प्राचीन काळापासून राजे लोकांनी लक्ष दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून आढळते. शेतीला योग्य पाणीपुरवठा व्हावा हाच एक शेती सुधारण्याचा मार्ग त्या काळात उपलब्ध होता. बांध घालणे, कालवे खोदणे व त्याची देखभाल करणे ही सामान्यत: गावच्या लोकांची जबाबदारी मानली जात असे. कालवे-बंधारे जरी गावकऱ्यांनी बांधले तरी त्यावर सत्ता मात्र सरकारचीच असे. कारण पाणी ही

निसर्गाची देणगी होती. त्यामुळे त्यावर मालकी पेशवे सरकारची असे. तथापि त्याला पेशव्यांनी पूर्णपणे संरक्षण देऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे धोरण अवलंबिले होते. राजापूर तालुक्यातील गोठणे गांव परमहंस बाबा यांना इनाम दिलेले होते. गावालगत एक खारट पाण्याचा ओहोळ वाहत होता. तो बांधून पिकपाणी घ्यावे असा आदेश पेशवा बाजीरावाने कृष्णभट देसाई यांना दिला होता आणि बांध बांधल्यापासून वीस वर्षेपर्यंत महसूल माफ करून पुढे ठरवून देण्यासंबंधीचा करार करून दिल्याचे दिसून येते.[१३]

अशा प्रकारे शेतीला उत्तेजन देण्याचे धोरण बाजीराव पेशव्यांनी स्वीकारलेले होते. शेती सुधारण्यासाठी ठिकठिकाणी विहिरी बांधणे व बंधारे बांधणे ही कामे देखील पेशव्यांच्या कारकीर्दीत सरकारी खर्चाने केली जात होती. बाजीराव पेशव्यांनी स्वत: मोठमोठे बागबगीचे लावून शेतीला उत्तेजन दिले होते. यासाठी त्यांनी रामजी बाबा याला गोविंद कृष्ण यांच्याकडे पाठवून त्याच्याकडून ठाणे, सुपे येथे आंब्याच्या झाडांची लावणी करण्यासाठी झाडे मागितली होती.[१४]

अशा प्रकारे पेशवे थोरले बाजीरावाने शेतकऱ्यांना अभयपत्रे देऊन, शेतसाऱ्यात सवलत देऊन तर काही वेळा सूट देऊन आर्थिक मदत केली. शेती संरक्षणाचे धोरण स्वीकारून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे पर्यायाने पेशवे सरकारची आर्थिक स्थिती सुधारण्याचे धोरण स्वीकारले होते.

संदर्भ टीपा

(१) पे.द.खं.२२, ले. २८ पृ. १७, भा. इ. सं. मं. त्रै. व. १५, अं. २, पृ. ६८.
(२) भा. इ. सं. मं. त्रै. व. १५, अं. २, पृ. ६७.
(३) भा. इ. सं. मं. त्रै. व. १५, अं. २, पृ. ७०
(४) अप्रकाशित शा. द., द. क्र. ३९, पु. क्र. ५, ले. क्र. ५६०००.
(५) शि. च. सा. खं. १२, ले. ६५.
(६) अप्रकाशित सं. नि. का. रू. नं. १, पु. क्र. १, ले. क्र. ५८.
(७) अप्रकाशित सं. नि. का. रू. नं. १, पु. क्र. १, ले. क्र. ५७.
(८) पे. द. खं. १७, ले. ८०.
(९) अप्रकाशित सं. नि. का. द. क्र. ३, पु. क्र. १, ले. क्र. १४२२.
(१०) भा. इ. सं. मं. त्रै. व. १५, अं. २, पृ. ६७.
(११) पे. द. खं. ३१, ले. १२५.
(१२) पुणे न. सं. वृत्त खं. २, पृ. १२०.
(१३) म. इ. सा. खं. ३, ले. २५९.
(१४) भा. इ. सं. मं. त्रै. व. १५, अं. २, पृ. ६७.

नागपूर राज्यातील विमुक्त जाती

डॉ. प्रभाकर गद्रे

महाराष्ट्र शासनाने १३ जातींना विमुक्त जाती घोषित केले आहेत.[१] त्यापैकी सहा जाती नागपूरकर भोसल्यांच्या राज्यात आढळत होत्या.[१] ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारने १७७३ मध्ये या जातीची ' गुन्हेगारी जाती ' या शब्दात दखल घेतली. या जाती-जमातीचे लोक गुन्हे करणे आपला धर्म मानतात व धार्मिक निष्ठेने गुन्हे करतात. यामुळे समाज आणि शासन या जातींना गुन्हेगार मानून त्याचा संपर्क टाळण्याचा प्रयत्न करू लागले. १७९३ मध्ये गुन्हेगारी जमाती संबंधीच्या कायद्यात सोळाव्या नियमाप्रमाणे व्यक्तिगतरित्या किंवा गटाने केलेल्या गुन्ह्यांना शासन करण्याची तरतूद करण्यात आली.[२]

इंग्रज सरकारच्या या दृष्टिकोनामुळे या काळातील इंग्रजी साधनेही दूषित झाली आहेत. पण काटेकोरपणे त्यांचे निरीक्षण केल्यास व्यक्तिगत गुन्ह्यासाठी संपूर्ण समाजाला गुन्हेगार ठरविण्यात चूक झाली आहे असे आढळून येते. नागपूर येथील इंग्रजी रेसिडेन्ट रिचर्ड जेंकिन्स याने विमुक्त जातीबद्दल पुढील माहिती दिली आहे.

पारधी -

ईशान्य छत्तीसगडमध्ये यांचे मूळ निवासस्थान असून ते अधून मधून खेड्यात लाकूड, जंगलातील फळे व तट्टी (बांबूच्या जाळीचा पडदा) विकावयास येतात. त्यांच्यावर नरभक्षणाचा आरोप नाही. त्यांची एक गुप्त भाषा असून ती स्थानिक रहिवाशांना कळत नाही.[३] परभणी जिल्ह्यात सेलू येथे चित्तेपारधी राहत असून ते पूर्वी लहान वाघ धरून राजा-महाराजांना विकत.[४] अशा प्रकारचे प्राणी नागपूरकर भोसले खरेदी करीत. दुसऱ्या रघुजी भोसले याने अशा आठ चित्ता गाड्या शिकारीला नेल्याचा उल्लेख आहे.[५]

कंजड -

दरोडा आणि चोरी हे कंजडाचे सामान्य व्यवसाय असले तरी धान्य वाहतुकीसाठी

पशु भाड्याने देणे, गर्दभपालन करणे, हातगिरण्या व हातमाग दुरुस्त करणे, दोरखंडे वळणे हेही त्यांचे व्यवसाय आहेत. वर्धा ते नागपूर दरम्यानच्या जंगलात कंजडांची पाले आहेत. तेथे ते पावसाळ्यात राहतात. बाकीच्या काळात ते आपली गाढवे, चटया आणि बास-बल्ली घेऊन हिंडत असतात. त्यांना शेतीसाठी पडीक जमीन व तकावी देऊन त्यांना स्थिर करण्याचे सर्व प्रयत्न फसले आहेत. गुरेचोरी आणि डाका घालण्याची सवय असलेली कंजडांसारखी दुसरी जमात नाही. त्यांची संख्या २०० पेक्षा जास्त नाही. ते रांगडी किंवा हिंदी भाषेची माळवी बोली बोलतात. त्यांच्यापैकी कित्येकांना हद्दपार करण्यात आले आहे.[६]

कैकाडी -

हे प्रत्येक जिल्ह्यात आढळतात आणि आपला चोरीचा धंदा अभिमानाने सांगतात. घरफोडी करण्यात आणि उचलेगिरीत ते विशेष प्रविण आहेत. चटया आणि टोपल्या विणणे, हातगिरण्या दुरुस्त करणे, खालच्या जातींना भाड्याची गाढवे देणे हे त्यांचे व्यवसाय आहेत. त्यांची भाषा म्हणजे मराठी व तेलगुचे मिश्रण आहे. कैकाडी स्त्रिया सर्व जातीच्या लोकांना भविष्य सांगण्याचा व्यवसाय करतात.[७] कैकाडी जातीचा उल्लेख दामाजीपंत मंगळवेढेकर यांच्या काळातील एका महजरात आढळतो. महारानी कोणत्या लोकांपासून कोणते हक्क वसूल करावे याची एक यादी आहे. त्यात त्यांनी कैकाडी लोकांपासून प्रत्येक लग्नास सव्वा दोन रूपये आणि मर्तिकाच्या प्रत्येक मढ्याबद्दल साडेतीन रुपये वसूल करावे असे म्हटले आहे.[८]

रिचर्ड जेंकिन्स याचा मराठी एजन्ट विनायक अनंत औरंगाबादकर याने पूर्व विदर्भातील विवाहाबद्दल १८२३ साली काही टिपणे लिहिली आहेत. त्यापैकी भाटाबद्दलचे टिपण पुढीलप्रमाणे[९]— "झाडे सोनार याहाचे भाटाचे घर पोवतीत ६ पालान्दूर २, वेल २, नागपूर २ ऐसे घर. पैकी तपशील सोनाराचे भाट जे पोवनीत आहेत तेच होयेत. बापू १, कृष्णा २, बापू ३, कोदू ४, लक्ष्मण ५ व मुकुन्दा ६. माळव्याचे भाट, पैकी घर च्यार. पालान्दूरामध्ये बगा १, महादू २; वेळ्याचे घराचे नांव बधु १, २ दुसऱ्याचे नाव नाही. पारशिवनीत भामरू, त्याचे मायेचे नाव मसनाई २, दुसऱ्याचे नाव नाही. नागपुरात घर दोन २, त्याचे नाव नाही. पोट जात एकच नाही[१०] परंतु एका एका जातीचा वशसे अमुधा (?) आहे. या घरांसिवाय आणिक भाटाचे घर चंद्रपुरापासून वरधेचे तिराचे अलीकडे देवगड, सिवणी, छेपारा, वैरागड, लांजीपासून कोन्ही माहित नाही. या भाटास ज्या जातीचे जे भाट आहेत त्याहास त्या जातीचे कुळ दिसया मात्र ठाऊक असतात. तिसरे वर्सी येकाचे घरास जावे म्हणजे तो जसा असला तसा रुपया अव्हने, पांघरुन, चिरगुट देतो. लग्न प्रयोजेनात भाटाची अटक नाही. जे ज्याहाचे भाट आहेत ते त्या जातीचे हातचे खातात. माल्याचे भाट सोनाराचे

हातचे खात नाहीत. असच तेही याहाचे हातचे खात नाही. सोनार अगर माली बारी हे भाटाचे हातचे खात नाही व सर्वे भाट जात येकच, याची सोयरीक होती व येकमेकाचा जातही आहेत. भिवगडचे सोना(रा)चे घरी भाट जात नाही.''

छप्पर बंद -

हे लोक आपला छप्पर दुरुस्तीचा व्यवसाय करून राहत असत. राजकुटुंबातील भांडणात कधीकधी त्यांना मार खावा लागे व कैद भोगावी लागे.[११]

नागपूरचे राजकारण व समाजस्थितीवर प्रकाश पाडणाऱ्या बातमीपत्राचा एक खंड गोविंद सखाराम सरदेसाई यांनी व दोन खंड त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी संपादित, प्रकाशित केले आहेत. तेथे अनेक गुन्हेगारांचा जातीनामासह उल्लेख आहे. तसेच पेशवा दफ्तरातील शेकडो मराठी व पर्शियन बातमीपत्रे माझ्या संग्रहात आहेत पण दोन्हीत विमुक्त जातीपैकी कोणत्याही जातीच्या माणसाचा गुन्हेगार म्हणून उल्लेख नाही. खुद्द जेंकिन्स याने लहान मुलांना गुन्हेगारी शिकविण्याच्या प्रथेत कोणत्याही जातीनामाचा उल्लेख केला नाही.[१२] कैकाडी लोकांना मात्र त्याने जन्मजात चोर म्हटले आहे. पण १८२७ साली नागपुरातील ८९ कैकाडी लोकांपैकी फक्त ४ तुरुंगात होते[१३] ही वस्तुस्थिती त्याची जात निर्दोष असल्याचाच पुरावा आहे.

बंजारा -

या जातीत गोर बंजारा, लंबाडा (लबारा), लभाणी, चरण बंजारा, लमाण, मथुरा लमाण, कंचकीवाले बंजारा, लमाण बंजारा, लमाण (लमाणी) लबान, धाखे (धालीया), धाडी (धारी), सिगारी, नावी बंजारा, जोगी बंजारा, बजारी या एकूण १६ पोटजाती आहेत.[१४] ते विदर्भातील यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलढाणा, इ. जिल्ह्यात राहतात.[१५] मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी दोन्ही बाजूने भाग घेतला. त्यामुळे दोन्ही बाजूंचा आश्रय गमावला.[१६] अठराव्या शतकात प्रारंभी त्यांनी वऱ्हाडात गढ्या बांधून स्थायीक होण्याचा प्रयत्न केला पण सरलष्करादी काही मराठ्यांनी त्याला विरोध केला[१७] त्यामुळे नागपूरकर भोसल्यांचा आश्रय करून त्याच्या विविध मोहिमात त्यांनी भाग घेतला.[१८] १७७० च्या सुमारास त्यांनी बस्तर राज्यातील गोंड लोकांशी वस्तुविनिमयाच्या स्तरावरील व्यापार सुरू केला.[१९] १७९५ पर्यंत वैरागड हे वंजारी व्यापाराचे मोठे केंद्र झाले होते व तेथे वंजाऱ्याचे मोठाले तांडे आढळत.[२०] तेथे ते साखर आणि वऱ्हाडी कापसाच्या मोबदल्यात मीठ व नारळ मिळवीत. या व्यापारामुळे बस्तर मधील गोंड लोकात 'संस्कृती'चा प्रसार झाला असे कॅप्टन ब्लंटचे म्हणणे आहे.[२१] अशा तऱ्हेने गोंड लोकांच्या वन्य फल संग्रहणाच्या अर्थव्यवस्थेत वस्तु-विनिमयाच्या अर्थव्यवस्थेचा प्रवेश करण्याचे श्रेय बंजारा समाजाला आहे.

संदर्भ टीपा

१. मांडे, प्रभाकर, गावगाड्याबाहेर पृ. ३१८-३२०.
२. कित्ता पृ. २५५
३. जेंकिन्स, रिचर्ड. रिपोर्ट ऑन द टेरिटोरीज ऑफ द राजा ऑफ नागपूर सबमिटेड टू द सुप्रिम गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, खंड १, पृ. १८.
४. मांडे, पृ. १५०
५. शेजवलकर त्र्य. श. नागपूर अफेयर्स खंड १ पृ. ले. २९८ खंड २ पृ. १७४ ले. ३.५
६. जेंकिन्स खंड १ पृ. २२
७. कित्ता
८. इति. खंड चंतुसं पृ. ६२
९. औरंगाबादकर विनायक अनंत, पूर्व विवाहातील विवाह १८२३ पृ. १७ (अप्रकाशित मायक्रोफिल्म प्रतीची टंकलिखित नक्कल)
१०. भाटांच्या यजमानांची जात एकच नाही
११. नागपूर अखबार (अप्रकाशित) १२ जून १८१५
१२. जेकिन्स खंड २ पृ. २५
१३. कित्ता पृ. २५-२६
१४. मांडे, पृ. ३१९
१५. कर्वे इरावती, महाराष्ट्र लँड अँड पिपल पृ. ३९
१६. गद्रे प्रभाकर 'लोकमत' दिनांक २४ डिसें. १९८९. साहित्य जत्रा
१७. वैद्य, शं. ल. वैद्य दफ्तरातील निवडलेले कागद खंड ४, २२ मार्च १७४६.
१८. अर्ली युरोपीयन ट्रॅव्हलर्स इन नागपूर टेरीटोरी पृ. १२७-३०
१९. कित्ता पृ. १५१-१५३
२०. कित्ता पृ. १३९-४०
२१. कित्ता पृ. १५३

दख्खनमधील बृहदश्मयुगीन संस्कृतीतील अन्न, वस्त्र आणि निवारा

डॉ. ग. का. मांने

मानवी जीवनाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या होत. आरंभापासूनच मानवाने आपल्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी अथक प्रयत्न करून स्थायीत्व प्राप्त केले. बृहदश्मयुगीन संस्कृतीतील लोकांनी स्थायीकरणाच्या प्रक्रियेला बऱ्याच अंशी पूर्णत्व आणले होते. या संदर्भात आपल्याला त्या काळातील मिळालेले पुरावे व त्याआधारे त्याची अन्न, वस्त्र आणि गृहरचनेसंबंधी विवेचन करून त्या संस्कृतीच्या जीवनमापनावर काही अंशी प्रकाश टाकता येतो. त्यासाठी क्रमवार माहिती देणे आवश्यक ठरते.

अन्न : नवाश्मयुग मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या काळात मानव अन्न संचयाच्या अवस्थेपासून अन्नोत्पादन करण्याच्या क्षमतेला पोहचला. यासाठी त्याने शेतीला उपयुक्त अशा जनावरांना पाळण्यास सुरुवात केली. या संस्कृतीचे पुरावे महाराष्ट्रात तुरळक स्वरुपात उपलब्ध झाले आहेत तर कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीबरोबर नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष ब्रह्मगिरी, म्हस्की, हल्लूर, केसरपल्ली येथे मिळाले. पिकालिहल, उटलूर, पलवाई, कुपगल येथील राखेच्या टेकड्यांमधील (Ash-mound) मिळालेल्या पुराव्यावरून हे लोक पाळीव जनावरांचे मोठमोठे कळप सांभाळीत असत असे दिसते. त्यांच्या भटक्या जीवनात अजून तरी स्थैर्यता प्राप्त झाली नव्हती. हे लोक थोड्या प्रमाणात शेती व उरलेला वेळ शिकारीसाठी घालीत.

नवाश्मयुगीन टेकडांच्या उतारावर व पायथ्याशी राहणारे लोक आता नदीच्या जवळपास सपाट जागेवर स्थायीक होऊ लागले. ही प्रक्रिया ताम्रपाषाणयुगात घडून आली. वसती जवळचा प्रदेश शेतीखाली आणला गेला. त्यांच्या आहाराविषयी सखोल माहिती उपलब्ध नसली तरी उपलब्ध पुराव्यांच्या आधारे काही प्रमाणात चित्र रेखाटता येते.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन लोक पाळीव प्राण्यांच्या साहाय्याने शेती करीत. वन्य प्राण्यांची शिकार करून त्यांचे मांस खात होते. नेवासा येथे म्हैस, मेंढी/बकरा,

डुक्कर, घोडा/गाढव, जंगली प्राण्यात लहान मांजर, तीन प्रकारची हरणे, नीलगाय, हरीण, सांबर व पाळीव पक्ष्यांची हाडे सापडली. यापैकी जंगली प्राण्यांचे मांससुद्धा आहारासाठी उपयोगात आणले जात असावे. म्हशी व गुरांचा उपयोग शेतीसाठी तसेच दुधदुभत्यासाठी होत असावा. त्यांच्या जोडीला हे लोक मत्स्याहाराचाही वापर करीत होते. त्यांचा प्रत्यय नेवाश्याला सापडलेल्या तांब्याच्या गळावरून येतो.[१] याशिवाय खापरावर काही प्राण्यांचे चित्रण केलेले आढळून आले. त्यात हरीण (नेवासा, दायमाबाद), मासे (सावळदे, दायमाबाद), मोरासारखे प्राणी, वाघ (नेवासा), कुत्रा, बकरा, बैल (नेवासा) यांचा समावेश होता. दायमाबाद येथील कालखंड तीनच्या मृद्‌भांड्यावर (Buff and cream) वाघाने म्हशीवर हल्ला केल्याचे चितारले आहे. यातील वाघ सोडल्यास इतर जंगली प्राण्यांची शिकार आणि मासेमारी होत असावी हे मानावयास हरकत नाही. याशिवाय इनामगाव येथे गाडीस जुंपलेले बैल चिन्हाद्वारे एका मृद्‌भांड्यावर कोरलेले आहे.[२]

इनामगाव येथे मालवा काळातील घरात धान्य साठविण्यासाठी कोठ्या आढळून आल्या. तसेच पूर्व जोर्वेच्या काळात येथील लोक जव, गहू, जवस, उडीद, पिकवीत होते. लहरी पावसावर अवलंबून न राहता व पाणी पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे जास्त पीक काढण्याच्या उद्देशाने नदीवर बांध घालून कालव्याच्या सहाय्याने दोन पिके काढल्याचा पुरावा इनामगाव येथे मिळाला आहे. भारतीय संदर्भात कालव्याच्या द्वारे शेती करण्याचा प्रयोग प्रथमच होत आहे हे येथे मुद्दाम नमूद करणे आवश्यक आहे. येथे अन्नधान्याबरोबर मिळालेल्या इतर पुराव्यावरून आहारात बकरा, मेंढी, म्हैस, डुक्कर, गाय आणि घोड्याच्या मांसाचा उपयोग केला.जात असल्याचा पुरावा मिळाला आहे. वरील प्राण्यांची हाडे तीक्ष्ण शस्त्राने तोडल्याचा तसेच जळक्या हाडांचा पुरावा यादृष्टीने बोलका आहे.

उत्तर-जोर्वेच्या काळात पावसाचे प्रमाण कमी होऊन कालवा निरूपयोगी ठरला. त्यामुळे जवाबरोबर कमी पावसात पिकणाऱ्या बाजरीचाही पुरावा आढळला. तसेच प्राणी पाळण्याचे प्रमाण पूर्व-जोर्वेच्या तुलनेत वाढले.

कर्नाटक आणि आंध्र येथील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा विचार करताना आपल्याला असे आढळून येते की ही संस्कृती काही ठिकाणी नवाश्मयुगानंतर तर काही ठिकाणी नवाश्मयुगीन संस्कृती सोबत नांदत होती असे पुराव्यावरून आढळून आले. आहार पद्धतीविषयी फारशी माहिती उपलब्ध नसल्यामुळे तूर्त एवढेच म्हणता येईल की, हे लोक प्रामुख्याने रागी आणि हुलगे (Dolichos biflorus) पिकवित होते.

महाराष्ट्रात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीनंतर (विदर्भात नवाश्मयुगानंतर) तर आंध्र आणि कर्नाटकात नवाश्म-ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीनंतर लोह वापरणाऱ्या एका नवीन

संस्कृतीचा उदय झाला. हा प्रगतीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा मानायला हरकत नाही. कर्नाटक आणि आंध्रमध्ये ताम्रपाषाणयुगीन संस्कृती आणि बृहदश्मयुगीन संस्कृतीची बरेचदा संक्रमणव्यवस्था आढळून येते. काळाच्या दृष्टीने मात्र (कर्नाटक इ.स. पू. १००० तर आंध्र इ.स. पू. ७००) यांच्या प्राचीनतेत लक्षणीय फरक आहे यात शंकाच नाही.

आतापर्यंत उत्खननात सापडलेल्या प्राण्यांच्या अवशेषांची पुढीलप्रमाणे वर्गवारी करता येते. (१) पाळीव प्राणी (२) वन्य प्राणी आणि (३) जलचर प्राणी.

यापैकी पाळीव प्राण्यात घोडा, कुत्रा, म्हैस, बैल, गाय, बकरा, डुक्कर व कोंबडा, वन्य प्राण्यात सांबर,चितळ, हरिण, रानडुक्कर यांचा समावेश होता. तिसऱ्या प्रकारात मासे, कासव व कालव यांचा समावेश होता. एकंदर उपलब्ध झालेल्या हाडावरून, त्यांचे वर्गीकरण करून या पशूंच्या संभाव्य उपयोगाची चर्चा करण्यात आली आहे.

(१) पाळीव प्राणी-(अ) नांगरट, (ब) वाहतूक आणि (क) आहार.
(२) वन्य प्राणी-यांची शिकार उघडच-आहारात यांच्या मासाचा अंतर्भाव असल्याने मासांशनाच्या उद्देशाने केली आहे.

पाळीव प्राणी- (१) बैल व गाय : या प्राण्यांचे अवशेष इतर प्राण्यांच्या प्रमाणात जास्त उपलब्ध झाले आहेत. टाकळघाट, नैकुंड, बोरगाव, भागीमाहिरी येथे एकंदर हाडापैकी अनुक्रमे ६३.८८%, ७०.७%, ५४.४%, ६१.८% ही गाईबैलांची होती.[३] उत्तर कर्नाटकात अं. सुंदर यांना बृहदश्मयुगाशी संबंधित असलेले बैल आणि गायीचे रंगकाम केलेले चित्र सापडले.[४] बैलाचा उपयोग नांगरटीसाठी केला जात असावा, तसेच वाहतुकीसाठी सुद्धा त्याचा उपयोग करीत असावेत. गायीचा उपयोग दुधदुभत्यासाठी व नांगरटीसाठी करीत असावेत. आजही आदिवासी जमातीत वांझ गाय नांगरटीसाठी उपयोगात आणतात.

या व्यतिरिक्त यांचा उपयोग आहारासाठी केला जात होता. बऱ्याच हाडावर तेज धार असलेल्या शस्त्रांनी कापल्याच्या खुणा आढळल्या. काही हाडे जळालेल्या अवस्थेत आढळून आली. शिवाय लांब हाडापासून हत्यारेही बनवित असावेत.

आजही बऱ्याच आदिवासी व मागासलेल्या जमातीत गुरांचे मास खातात हे इथे नमूद करणे आवश्यक आहे.

(२) मेंढी/बकरा : या वर्गातील प्राणी तिबेट आणि दक्षिणपूर्व आशियातून आले असावेत. हे दुधासाठी तसेच त्यांच्या मासासाठी उपयोगी आणले जात असावेत. हाडांचे पुरावे महाराष्ट्रात पवनार, टाकळघाट, नैकुंड, कर्नाटकात मस्की आणि हल्लूर येथे सापडले.[५] पैकी पवनार येथे पहिल्या लोकवसतीच्या काळात या प्राण्यांची हाडे जळालेल्या अवस्थेत आढळली. नैकुंड येथील पुरावा बोलका आहे. येथील हाडांचे

परीक्षण केले असता असे आढळून आले की, या प्राण्यांना कोवळ्या वयात म्हणजेच २-३ वर्षाचे असताना मारून त्याचे मास खात असत. उत्खननातील हाडात बकऱ्याचे प्रमाण टाकळघाट १४.९६%, नैकुंड ९.६%, बोरगाव १२.६७ आणि भागीमाहिरी १६.२% इतके होते तर मेंढीचे प्रमाण बकऱ्याच्या तुलनेत कमी होते. ते टाकळघाट ३.१०% बोरगाव २.८९% भागीमाहिरी येथे ४.०१% इतके होते.

एकंदर प्राण्यांमध्ये गुरांच्या खालोखाल मेंढी/बकरा पाळीत होते.[६] कर्नाटक किंवा आंध्रात अशा प्रकारचा अभ्यास न झाल्याने प्राण्यांची टक्केवारी काढणे शक्य नाही.

(३) घोडा : भारतात सर्वप्रथम घोड्याचे अवशेष राजस्थानातील बागोर येथे इ. स. पू. ४५०० च्या सुमारास आढळले.[७] तसेच इनामगावच्या ताम्रपाषाणयुगीन लोकांनी या प्राण्याचा वापर केल्याचे आढळले.[८] ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात मात्र बृहदश्मीय लोकांनी घोड्याचा वापर करायला सुरुवात केली.

बृहदश्मयुगीन संस्कृतीत घोड्याचे अनन्य साधारण महत्त्व होते. घोड्याचा उपयोग वाहतुकीचे साधन तसेच शिकार करण्यासाठी याचा वापर केला जात असावा. हिराई बेनकल (कर्नाटक) येथे प्राप्त झालेल्या चित्रावरून घोडा शिकारीसाठी वापरल्याचे चितारले आहे.[९] तसेच मेंढ्या पाळण्यासाठी, दोन टोळ्यातील युद्ध प्रसंगी या प्राण्यांचा उपयोग करीत असावेत. उत्खननात घोड्याचे अवशेष कमी संख्येने मिळाले.[१०] (टाकळघाट ०.३४% नैकुंड ४.०%, बोरगाव १.२८% आणि भागामाहिरी १.२३%) तसेच अनेक उत्खननात घोड्याचा अलंकार त्यात रिकाब, लगाम सापडले. घोड्याच्या मासाचा आहारात समावेश होता किंवा नाही याबद्दल निश्चित मत व्यक्त करणे कठीण आहे. माहुरझरी येथील दफनात प्राप्त झालेल्या घोड्याच्या हाडावरून आपल्याला तूर्त अनुमान काढता येते की, त्यावर कापण्याच्या खुणा ह्या मृतव्यक्तीबरोबर बळी देण्यासाठी घोड्याला बळी दिल्याच्या असाव्यात.

आतापर्यंतचा सर्व पुरावा दफनातील आहे. त्याला धार्मिक कारणच सबळ होईल. एरवी घोडा व इतर प्राण्यांचे प्रमाण अगदी व्यस्त दिसते. त्यामुळे नेहमीच्या आहारात घोडा असणे कठीण.

घोड्याच्या अवशेषांचा संदर्भ बघता दफनातील धार्मिक समजुती त्यांच्याशी गुंतलेल्या असाव्यात. मृताला परलोकाचा मार्गदर्शक म्हणून कदाचित घोड्याला पुरत असावेत. या संदर्भात बस्तर आणि चंद्रपूर (गडचिरोली जिल्हा) जिल्ह्यातील माडिया गोंड घोड्यांच्या मूर्तीची पूजा करतात. त्यांच्यात काही बृहदश्मीय प्रथा (शिलास्तंभ, रासयुक्त दफन) अद्यापि प्रचलित आहेत. घोड्याची पूजा करण्याची प्रथा कदाचित बृहदश्म काळापासून चालत आली असावी.

(४) म्हैस : म्हशीचा पुरावा भारतात सर्वप्रथम मोहेन्जोदरोच्या स्तरात

आढळला.[११] त्यानंतर दायमाबाद येथील एका मृद्भांड्यावर वाघ म्हशीची शिकार करीत असल्याचे चित्र रंगविलेले आहे.[१२] नंतर म्हशीचा पुरावा बृहदश्मयुगीन संस्कृतीतील टाकळघाट, नैकुंड, बोरगाव, भागीमाहिरी (महाराष्ट्र)[१३] मस्की (कर्नाटक) त प्राप्त झाला.[१४] म्हशीचे एकंदर प्राण्यातील प्रमाण (टाकळघाट ६.९८ % नैकुंड २.६ % बोरगाव १.९८ % भागीमाहिरी ३.१ %) आहे. टाकळघाटचा पुरावा सोडला तर इतरत्र म्हशीचे प्रमाण अल्पच आहे. या प्राण्यांचा उपयोग दुधदुभत्यासाठी आणि कदाचित नांगरटीसाठी केला जात असावा. कारण आदिवासी भागात आज सुद्धा (बस्तरचे माडिया गोंड, चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील राजगोंड, माडिया गोंड आणि प्रधान) नांगरणीसाठी याचा उपयोग करतात. रेडा बैलाच्या तुलनेने नांगरणीसाठी अधिक मजबूत आणि जास्त वर्षे उपयोगी येणारा प्राणी समजला जातो. या प्राण्यांच्या मासाचा समावेश आहारात होता किंवा नाही याबद्दल स्पष्ट पुरावा उपलब्ध झाला नाही.

(५) कुत्रा : हा प्राण्यापैकी सगळ्यात आधी माणसाळलेला प्राणी होय. नैकुंड येथील उत्खननात पाळीव कुत्र्याचे अवशेष सापडले.[१५] याचा उपयोग शिकारीसाठी तसेच मेंढ्यांचा/शेळ्यांचा कळप राखण्यासाठी करीत असावेत. याशिवाय घर राखण्यासाठी त्यांचा उपयोग होत असावा.

(६) डुक्कर : ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीत प्रभास पाटण आणि नावडाटोली येथे डुकराचे अवशेष आढळले. त्यांच्या हाडावरून त्यांचे वय अंदाजे १ ते २ वर्षांचे. असावे. दक्षिणेत डुक्कराचे अवशेष सापडले परंतु बऱ्याच उशीरा, दक्षिणेस हा प्राणी मध्यभारत आणि पश्चिम महाराष्ट्राच्या मार्गाने गेला असावा.[१६] हा जरी वन्य प्राणी असला तरी पाळीव डुक्कराचे अवशेष नैकुंड येथे प्राप्त झाले. पवनार येथे बृहदश्मीय सत्रकालीन वसतिस्थानात डुक्कराचे अवशेष सापडले.[१७] या प्राण्यांच्या हाडावरून असे अनुमान काढता येते की, याचा समावेश आहारात केला गेला असावा.

वन्यप्राणी

(१) सांबर : हा जंगली प्राणी असून त्याची शिकार केली जात होती. शिंगापासून हत्यारे बनविता येत असल्याने तसा उपयोगही अनपेक्षित नाही. टाकळघाट येथे एक शिंग सापडले.[१८] पण त्याचा उपयोग हत्यारासाठी केला गेला किंवा नाही ते स्पष्ट होऊ शकले नाही.

(२) हरीण : उत्तर कर्नाटकातील एका बृहदश्मीय चित्रात घोड्यावरून हरिणाची शिकार करीत असल्याचे दृश्य चितारलेले आहे. यापूर्वीसुद्धा ताम्रपाषाणयुगीन मृद्भांड्यांवर हरिणाचे चित्र रेखाटलेले आढळले.[१९] बृहदश्मात इतर जंगली प्राण्यांबरोबर हरिणाचीही शिकार होत असावी.

(३) चितळ : या प्राण्याचे अवशेष नैकुंड येथील उत्खननात प्राप्त झाले.[२०]

याचाही समावेश आहारात केला जात असावा.

जलचर प्राणी

मासे : माशाच्या हाडांचा प्रत्यक्ष पुरावा मिळाला नसला तरी मासे मारण्याचे गळ अनेक बृहदश्मीय उत्खननात आढळून आले.[२१] तसेच मासे पकडण्यासाठी जे जाळं वापरत असत ते पाण्यात बुडून राहावे म्हणून मातीच्या चकत्या लावीत. अशा प्रकारच्या चकत्या पवनार, टाकळघाट येथे सापडल्या.[२२] मच्छीमारी हाही बृहदश्मीय संस्कृतीचा जोड व्यवसाय असावा.

कालव : बृहदश्मीय लोक शंख व शिंपल्यातील कालव खात असावेत. अनेक बृहदश्मीय स्थळात शंख आणि शिंपले मिळाले.[२३]

इतर प्रकारचे प्राणी, पक्षी

(१) कोंबडा : टाकळघाट, नैकुंड येथे कोंबड्याचे अवशेष सापडले.[२४] कर्नाटकातील हल्लूर या ठिकाणीही त्याची नोंद करण्यात आली.[२५] टाकळघाट येथे कोंबड्याची हाडे जळालेल्या अवस्थेत आढळली. यावरून कोंबडा भाजून खात असावेत. या संदर्भात आदिवासी लोकात अजून सुद्धा पक्षी भाजून खाण्याची पद्धत आहे. यावरून वरील अनुमानास आधार मिळतो.

(२) उंदीर : बृहदश्मीय लोक उंदीर खात असावेत. याचा पुरावा टाकळघाट येथील उंदरांच्या हाडाच्या अवशेषावरून स्पष्ट मिळतो.[२६] आजही गोंड पांढरे आणि काळे उंदीर चवीने खातात हे उल्लेखनीय आहे. याव्यतिरिक्त कासव, मोर इ. प्राण्यांचा सुद्धा आहारात समावेश होता.[२७]

उत्खननात सापडलेल्या प्राण्यांच्या अवशेषाव्यतिरिक्त धान्यांचे पुरावे बृहदश्मीय स्थळात सापडले की काय, याचा शोध घेणे आवश्यक ठरते. त्याशिवाय त्यांच्या अन्नविषयक सवयींवर प्रकाश पडणार नाही. या ठिकाणी हेही नमूद केले पाहिजे की, दफनांच्या तुलनेत वस्तीस्थानांचे प्रमाण अल्प आहे आणि जिथे उत्खनने झाली त्या ठिकाणी धान्यांच्या पुराव्यासाठी नव्या तंत्राचा वापर फार थोड्या ठिकाणी झाला. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात अन्नासंबंधीचा पुरावा उपलब्ध होऊ शकला नाही तरी ज्या ठिकाणी पुरावे सापडले त्यांचा परामर्श घेण्यात आला आहे.

हुन्नूर येथील नवाश्म-ताम्रयुगीन आणि लोहयुगाच्या (बृहदश्मयुगीन) संस्कृतीच्या संक्रमणावस्थेत लोखंडाच्या बाणाच्या शीर्षासोबत जळालेले धान्य मिळाले.[२८] तर कर्नुल जिल्ह्यात गज्जलकोंडा येथे एका दगडाच्या राशीत (cairn-burial) काही मृद्भांडी सापडली. त्यात धान्य आढळून आले.[२९] महाराष्ट्रातील नैकुंड येथील उत्खननात गहू, उडीद, बोराचे फळ (Indian jujube) बृहदश्मीय मानवाच्या आहारात आले असल्याचे

दिसते.[३०]

आजही दख्खनच्या परिसरात मुख्य अन्न तांदूळ आणि रागी आहेत. विदर्भ (गडचरोली, चंद्रपूर आणि भंडारा जिल्हे वगळून) आणि पश्चिम महाराष्ट्रात मात्र गव्हाचे पीक घेतले जाते. या संदर्भात नैकुंड येथील गव्हाचा पुरावा महत्त्वाचा वाटतो.

या व्यतिरिक्त घरात सापडलेल्या पुराव्यांचा या संदर्भात उल्लेख करावा लागेल. स्वयंपाक करण्यासाठी चुलीचा वापर करीत असत. अशा चुली पवनार, नैकुंड आणि पेद्दाबंकूरला आढळल्या.[३१] पवनार येथील सापडलेल्या चुलीत (व्यास २५ से. मी.) कोळसे आढळले. त्यामुळे जाळण्यासाठी लाकूड आणि कोळशाचा उपयोग करीत असावेत असेही अनुमान करता येते. नैकुंड येथील चुलीजवळ दोन चपट दगड ठेवले होते. त्यांचा उपयोग पाट्यासारखा केला जात असावा. या शिवाय खुर असलेला पाटा बोरगाव येथे सापडला.[३२] या व्यतिरिक्त कणाश्म किंवा सोपस्टोन पासून तयार केलेले बत्ते कर्नाटकात ब्रह्मगिरी व मस्की आणि महाराष्ट्रात जुनापाणी, माहुरझरी, येथे प्राप्त झाले.[३३] माहुरझरी येथे अलिकडे झालेल्या उत्खननात दोन वरवंट्या सारख्या सुबक व आकर्षक दगडी वस्तू प्राप्त झाल्या. पाटा व वरवंट्याच्या सहाय्याने धान्याचे पीठ करीत तर बत्त्याच्या आधारे धान्य भरडीत. यावरून त्यांच्या अन्नविषयक रुचीसंबंधी कल्पना येते. याशिवाय मस्की येथे दगडाचा चेंडू सापडला. कदाचित त्याचा उपयोग शिकार करण्यासाठी केला जात असावा. अशाच प्रकारचे गोफणीतून मारण्याचे दगड ताम्रपाषाणयुगीन संदर्भात प्राप्त झाले.[३४]

कृषीच्या अवजाराचा अभ्यास केला तर त्यावरून त्यांच्या शेतीची कल्पना येईल. कृषीसाठी वापरली जाणारी हत्यारे ही मजबूत बनावटीची होती. ती तशी मुद्दामच घडविण्याचा हेतू कठीण जमीन नांगरणे हा असावा. या संदर्भात ब्रह्मगिरी येथील रोमन फाळांचा उल्लेख करावा लागेल.[३५] महाराष्ट्रातील माहुरझरी आणि नैकुंड येथे शेतीसंबंधीची अवजारे सापडली.[३६]महाराष्ट्रातील माहुरझरी येथे खुरपी, कुदळ तर नैकुंड येथे कुदळ आणि वाकस सापडले. याशिवाय अनेक बृहदश्मीय स्थळी पिक कापण्यासाठी कोयते सापडले.

परंतु खऱ्या अर्थाने शेतीला सुरुवात झाली नव्हती. आजच्या आदिवासींप्रमाणे एकदा उत्पन्न घेतल्यानंतर दुसऱ्यांदा त्या जमिनीत न पेरता नवीन जमिनीचा (shifting cultivation) वापर केला जात असावा. उत्खननात सापडलेल्या अवजारांचा अभ्यास केला तर एकंदर मिळालेल्या अवजारा/हत्यारापैकी शेतीशी संबंधित असलेल्या अवजाराचे प्रमाण कमी आहे. बोरगाव येथे प्राप्त झालेल्या ४४ वस्तूपैकी १ कोयता आणि ५ कुदळी आहेत (१३%) परंतु शस्त्राचे प्रमाण ७७% आढळले. तर ब्रह्मगिरी येथील वर्तुळात २७ वस्तूंची नोंद करण्यात आली. त्यात २ कोयते आणि अश्मपेटी वर्तुळात

१० वस्तू सापडल्या ज्या कृषिशी संबंधित नाहीत. मस्की येथील उत्खननात ३० वस्तू सापडल्या. त्यापैकी एक पूर्ण कोयता व दोन कोयत्यांचे तुकडे सापडले तर विदर्भातील टाकळघाट येथे १०२ लोहांच्या वस्तूंपैकी २७ वाकस आहेत व उरलेली शस्त्रे व इतर वस्तू आहेत. तामिळनाडूमधील सन्नूर येथील उत्खननात एकंदर १२१ वस्तूंची नोंद करण्यात आली. त्यापैकी एक कोयता आहे.[३७]

याशिवाय स्थिर, जीवनाला आवश्यक अशा शेतीसाठी प्राण्यांचे प्रमाण कमी प्रमाणात आढळते. पुढील तक्त्यावरून हे लोक कसे भटके होते, (लांबाड्याप्रमाणे ५-६ महिने भटके जीवन व नंतर स्वगृही परत येणे) त्याचे चित्र होते.

	टाकळघाट	नैकुंड	बोरगाव	भागीमाहिरी
गुरे	६३.८८%	७०.७%	५४.४%	६१.८%
म्हैस	६.९८%	२.६%	१.९८%	३.१%
बकरा	१४.९६%	९.६%	१३.६७%	१६.२%
मेंढी	३.१०%	-	२.८९%	४.०१%
डुक्कर	६.३३%	३.८९%	२.२७%	३.०४%
घोडा	०.३४%	४.०%	१.२८%	१.२३%

यावरून असे अनुमान काढता येते की गुरे आणि मेंढ्या-बकऱ्यांचे प्रमाण जास्त होते. इतरत्र अशा प्रकारचे सखोल वृत्तान्त (या संदर्भात वर्गवारीच्या दृष्टीने) नसल्यामुळे विदर्भाबाहेरील प्रदेशाचे चित्र स्पष्ट होत नाही.

या सर्व पुराव्यावरून स्पष्ट होते की, अजूनही बृहदश्मयुगीन संस्कृतीचे लोक शेती व्यवसायात स्थिर झाले नव्हते.

वस्त्र

बृहदश्मीय स्थळात (दफन आणि वसतीस्थान) वस्त्रासंबंधीचा प्रत्यक्ष पुरावा प्राप्त झाला नाही तरी अप्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे अनुमान काढता येते की, हे लोक वस्त्राचा वापर करीत होते. सूत कातणे व त्याचे वस्त्र तयार करणे हा त्यांचा जोड व्यवसाय असावा.

दख्खनच्या व्यतिरिक्त कापसासंबंधीचे काही पुरावे प्राप्त झालेत. रि[३८]यांना

आदिचनल्लूर येथे कुंभात ठेवलेल्या काश्याच्या वस्तूबरोबर कापड ठेवल्याचा पुरावा आढळून आला. काश्यांच्या पात्रात तांदूळ आणि बाजरी आढळून आली व त्यावर कापडाचे ठसे उमटलेले होते. कदाचित तांदूळ आणि बाजरी एकमेकात मिसळू नये म्हणून कापडाचा उपयोग केला असावा. अशा प्रकारचे ठसे अनेक काश्यांच्या पात्रावर आढळून आले. हा पुरावा बृहदश्मीय संस्कृतीच्या कालखंडातील आहे.

ब्रिक्स[३९] यांनी या विधानाला पुस्ती जोडली. त्यांना निलगिरी येथे काशाचा वाडगा आणि लोखंडाच्या वस्त्याऱ्यावर धाग्याचे ठसे आढळले. कदाचित वस्त्याऱ्याला आणि वाडग्याला गुंडाळण्यासाठी कापडाचा उपयोग करीत असावेत

बृहदश्मीय लोक कापडाचा वापर करीत होते या विधानाला या व्यतिरिक्त काही अवशेषांच्या आधारे दुजोरा मिळतो. विदर्भातील जुनापाणी, माहुरझरी, टाकळघाट, खापा आणि पवनार याठिकाणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही पुरावा आढळला नाही परंतु पवनार व टाकळघाट येथे सूत कातण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चकत्या मिळाल्या. त्यांना लाकडी दांडा लावत असावेत. अशा प्रकारच्या टकळ्या आजही सूत कातण्यासाठी आदिवासी भागात आढळून येतात.

यावरून बृहदश्मीय संस्कृतीच्या लोकांना सूत कातण्याची व वस्त्रे विणण्याची कला अवगत होती, ही एक महत्त्वाची बाब नमूद केली पाहिजे. प्रामुख्याने हे लोक आपल्या घरातच सूत कातत असत. हा एक प्रकारचा जोड व्यवसाय होता. दख्खनमध्ये केवळ विदर्भातच कापूस पिकतो हेही या संदर्भात उल्लेखनीय आहे.

गृहरचना

बृहदश्मीय गृहरचनेसंबंधी विवेचन करताना वसतीस्थाने कुठे कुठे आढळली आहेत त्यांचा विचार करणे अगत्याचे ठरते. प्रामुख्याने महाराष्ट्रात टाकळघाट, नैकुंड, खैरवाडा, भागीमाहिरी (उत्खननात आढळून आले) आणि काहालि-रामटेक (समन्वेषणात) या ठिकाणी बृहद्श्मीय वसतीस्थाने आढळून आली.[४०]

कर्नाटकात अनेक बृहदश्मीय स्थळांचा शोध लागला. त्यात बेळगाव जिल्ह्यातील कालखंबा आणि मुचांडी; गुलबर्गा जिल्ह्यातील राखमगेरी, तांब्बीडी आणि विनुहुथीजा; धारवाड जिल्ह्यातील हल्लूर (उत्खनीत स्थळ) आणि सोमेश्वर टेकडीच्या पायथ्याशी गौडगेरी भागात; रायचूर जिल्ह्यात मस्की; चित्तलदुर्ग जिल्ह्यात ब्रह्मगिरी (उत्खनीत स्थळे) आणि इतर स्थळांचा समावेश आहे.[४१] तसेच आंध्र प्रदेशात केसरपल्ली आणि पेद्दबंकूर व अनेक वसतीस्थानाचा शोध लावला.[४२]

ताम्रपाषाण संस्कृतीप्रमाणे या काळात दफन वसतीस्थानात न पुरता वसतीस्थानापासून दूर, एकतर दफन आणि वसतीस्थानाच्या मध्यभागी नाला किंवा नदी आड असलेल्या ठिकाणी करीत असत. यामागे त्यांच्या धार्मिक कल्पना अंतर्भूत

असाव्यात.

बृहदश्मीय स्थळांच्या एकंदर वर्गवारी वरून असे लक्षात येते की, बृहदश्मीय स्थळांची संख्या १११६ (दक्षिणेतील) असून ३१ स्थळे ही वसतीस्थान म्हणून नोंदविण्यात आली.[४३] परंतु यापैकी २२ स्थळे ही दफन आणि वसती व ९ स्थळे ही केवळ वसतीची आहेत. बृहदश्मीय दफन स्थळाच्या तुलनेत यांचे प्रमाण २.७५% इतके आहे. या प्रमाणावरून तरी असे अनुमान काढता येते की, बृहदश्मांची दफन स्थळे वेगवेगळी असली तरी त्यांचे वसतीस्थान अनेक वर्गाचे एकच असावे. एकाच वसतीस्थानात राहून आपापल्या दफनभूमीतच त्या त्या व्यक्तीचे दफन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सांस्कृतिकदृष्टया एकाच वर्गाचे असले तरी दफनाच्या पद्धतीत वेगळेपणा जाणवतो. वसतीस्थानाच्या व्याप्तीविषयी फारशी माहिती नसली तरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे टाकळघाट येथील वसाहतीची व्याप्ती २२५०० चौ. मीटर; नैकुंड १,००,००० चौ. मीटर; भागीमाहिरी ८२,००० चौ. मीटर आणि खैरवाडा १,०७,००० चौ. मीटर आहे.[४४] तसेच विदर्भातील नागपूर क्षेत्रातील दोन बृहदश्मीय स्थळातील अंतर हे १५ कि. मी. पेक्षा जास्त नाही. यावरून त्यांचा सतत सांस्कृतिकदृष्टया संपर्क राहात असावा असे दिसते. तसेच लोकसंख्येच्या बाबतीत आपल्याला खैरवाड्याचा उल्लेख करावा लागेल. एकट्या खैरवाड्याला १४९६ बृहदश्मीय शिळावर्तुळांची नोंद करण्यात आली. जर ही एकाच वसतीस्थानाशी निगडीत असली तर तेथील लोकसंख्येच्या प्रमाणाची तसेच गावाच्या आकाराची कल्पना येईल. त्याचे कारण असे की, काही दफनात ६-६ व्यक्ती पुरल्याचे तर काही दफनात १-२ पुरल्याचे आढळले. त्यामुळे सामान्यत: ४ व्यक्ती प्रत्येक दफनात पुरल्याचे गृहीत धरल्यास ५९८४ इतकी लोकसंख्या होईल. परंतु ती लोकसंख्या एकाच वेळी असेलच असे नाही तर ती शंभर वर्षाच्या काळातील असावी असे अनुमान करता येते.[४५]

आतापर्यंत झालेल्या उत्खननात बृहदश्मीय वसतीस्थानातील घरासंबंधीचे पुरावे फारच अल्प प्रमाणात आहेत. तरीही आपल्याला काही प्रमाणात घराचे चित्र रेखाटता येते. यासाठी वेगवेगळ्या राज्यात कशा प्रकारची घरांची रचना होती त्याचे विवेचन करावे लागेल.

कर्नाटक

पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे बृहदश्मीय वसतीस्थानाचा शोध अनेक ठिकाणी लावण्यात आला. त्यापैकी उत्खनन केलेल्या स्थळावरून त्या भागातील लोकांच्या गृहजीवनावर काही अंशी प्रकाश पडतो.

कर्नाटकातील बृहदश्मीय घरांच्या संदर्भात सर्वात आधीचा पुरावा हल्लूर येथील दुसऱ्या कालखंडात प्राप्त झाला.[४६] या स्तराचा कालखंड कार्बन १४ च्या सहाय्याने

इ. स. पू. १०५० इतका ठरविण्यात आला.

या कालखंडातील घरे आयताकृती असून घराच्या जमिनीवर चुन्याचे सारवण आढळले. ही घरे आगीमुळे नष्ट झाली म्हणून त्यांचे स्पष्ट चित्र उभे करता येत नाही.

ब्रह्मगिरी येथे घराचे पुरावे आढळले नाहीत. परंतु येथील द्वितीय कालखंड बृहदश्मीय संस्कृतीशी संबंधित असून या कालखंडात खांब रोवण्यासाठी काही खड्डे आढळून आले.[४७] त्यावरून असे अनुमान करता येते की खांबाच्या आधारावर घराचे छप्पर उभारले जाई. मस्की येथेही ताम्रपाषाणयुगीन संदर्भात अशाच प्रकारचे खड्डे आढळून आले.[४८]

महाराष्ट्र

महाराष्ट्रात बृहदश्मीय संस्कृतीचे वसतीस्थान फक्त विदर्भातच सापडले त्यामुळे विदर्भातील स्थळांच्या आधारे महाराष्ट्रातील बृहदश्मीय गृहरचनेचे चित्र चितारता येते. विदर्भातील टाकळघाट, भागीमाहिरी, वैकुंड आणि खैरवाडा येथे वसतीस्थान तसेच दफने आढळली. (टाकळघाट जवळ खापा आणि गंगापूरला शिळावर्तुळे आहेत.) पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे वसतीस्थानाचे प्रमाण ४.४४ % इतके आहे.

येथील उत्खननाच्या आधारे काही प्रमाणात गृहरचनेसंबंधी माहिती प्राप्त होते. पवनार येथील बृहश्मयुगीन सदृश्य असलेल्या वसतीस्थानातील घराला प्रामुख्याने माती चोपून केलेली जमीन आढळून आली. जमीन तयार करतांना अनेकदा माती कुटल्याचा पुरावा आढळला.[४९] तर कौण्डिन्यपूर येथील पहिल्या वसतीचे लोक घर तयार करण्यासाठी कच्च्या विटांचा वापर करीत असत.[५०]

टाकळघाट येथील वसतीस्थान कृष्णा नदीच्या तीरावर असून पलिकडील किनारी खापा (दफनभूमी) आहे. येथील उत्खननात बऱ्या अवस्थेत बृहदश्मयुगीन वसतीचे पुरावे प्राप्त झाले. येथील संस्कृतीचे तीन कालखंड विभागण्यात आले.[५१]

पहिल्या कालखंडातील घरे आयताकृती असून उत्खननात उघडकीस आलेले एक घर ३.३२ मीटर लांब आणि २.१७ मीटर रुंद होते. घराचा सांगाडा लाकडी खांबाचा असून त्यावर हलकेसे छप्पर असावे. उत्खननात उघडकीस आलेल्या पुराव्यावरून हे लाकडी वासे २० सें. मी. परिघाचे होते. जमीन माती चोपून तयार केली होती.

दुसऱ्या कालखंडातील पुराव्यावरून भिंती कुडाच्या होत्या असे दिसते. पडलेल्या भिंतीच्या अवशेषात कुडात वापरलेल्या वेळूचे छाप पडल्याचे आढळले. काळी चिकन माती चोपून तयार झालेली जमीन चुन्याने सारवण्याची पद्धत होती. अशा तयार केलेल्या जमिनीची जाडी एके ठिकाणी ३.७२ सें. मी. आढळली.

तिसऱ्या कालखंडात घराविषयी वेगळा पुरावा आढळला नाही. पहिल्या आणि

दुसऱ्या कालखंडातील घरामध्ये फरक आढळून येतो. पूर्वीची घरे ही लाकडाच्या वाश्यावर छप्पर असलेली तर दुसऱ्या व तिसऱ्या कालखंडाची घरे कुडाची होती. कुडाच्या घराला खांब असले तरी छप्पराचा भार खांबासोबत कुडावर पडत होता. परंतु खांबाच्या घरावरील छप्पराचा संपूर्ण भार खांबावरच पडतो अशा प्रकारची घरे ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीत आढळतात.

नैकुंड[५२] येथेही घरासंबंधीचा पुरावा उपलब्ध झाला. येथील वसतीस्थान पेंच नदीच्या डाव्या तीरावर आहे. दफनभूमी आणि वसतीस्थानाला अलग या दोहोंमध्ये नाला असल्यामुळे दफनभूमी वसतीस्थापासून आपोआपच वेगळी झाली. पहिल्या टेकाडातील खड्डयात ७ मीटर खोलीवर आणि दुसऱ्या टेकाडातील खड्डयात एकावर एक अशा तीन पातळीवर जमिनीचे थर आढळले. उत्खननातील ६ व्या स्तरात उघडकीस आलेल्या जमिनीची (floor) पातळी ही सर्वात प्राचीन होती. दोन्ही टेकाडांमधील जमीन एकाच पद्धतीने तयार केल्याचे आढळून आले. सर्वात प्राचीन जमीन वाय खड्डयात १.८५ मीटर खोल आढळली. त्याची लांबी ४ मीटर व रुंदी ६.५ मीटर होती. या जमिनीचा विस्तार (extension) दुसऱ्या खड्डयातही आढळून आला. जमीन काळ्या मातीच्या वर तयार करण्यात आली. त्यावर २.४ सें. मी. जाडसर कडक अशा तपकिरी रंगाचा मातीचा थर पसरविला होता आणि जमीन चुन्याने सारवली होती. जमिनीच्या आकारावरून ते घर वर्तुळाकार होते असे दिसते. त्याचा आतील व्यास ४.९ मीटर असून लाकडी खांब रोवण्यासाठी खड्डे घेतलेले आढळून आले. त्या खड्डयाचा व्यास सरासरी १२.४ सें. मी. इतका होता. पुष्कळशा खड्डयात कुजलेल्या वाश्याचे अवशेष आढळले. काळाच्या ओघात लाकडी खांब निरूपयोगी झाल्यामुळे त्याऐवजी दुसरे खांब रोवून छप्पराला आधार दिल्याचाही पुरावाही सापडला आहे. अशा प्रकारे १० खड्डे आढळून आले.

घरात उत्तरेला चुलीचे अवशेष सापडले. तिचा आकार लांबट गोल (Ovalish) रुंदी ७० सें. मी. व खोली २० सें. मी. होती. अग्नीच्या संपर्कामुळे चुलीचा आतील भाग लाल झाला होता. ईशान्येला ५० सें. मी. लांबीचा, लाकूड लावण्यासाठी खड्डा आढळला. तो पूर्णपणे राखेने युक्त होता. चुलीपासून वायव्येला १.५ मीटर अंतरावर दोन चापट दगड सापडले. त्यांचा उपयोग पाट्यासारखा केला जात असावा. राखेत प्राण्यांची जळालेली हाडे (उदा. गाईगुरे, मेंढी, बकरा, हरीण व डुकराची हाडे) तसेच गव्हाचा पुरावा सापडला. येथील घरांना विटा वापरत नसत.

दुसरी जमीन १.५ मीटर खोलीवर (स्तर- ५, टेकाड-द्वितीय) आढळली. त्याची लांबी ४ मीटर, रुंदी ४ मीटर आणि जाडी २.५ सें. मी. होती. तपकीरी रंगाच्या मातीने जमीन चोपून ती चुन्याने सारवली होती. वासे रोवण्यासाठी जमिनीच्या भोवताली खड्डे आढळून आले, त्यापैकी एकच खड्डा बऱ्या अवस्थेत असून त्याची रुंदी ४०

सें. मी. होती. त्यात कुजलेले लाकूड आणि बारीक रेती आढळून आली. पण या सर्व पुराव्यावरून गृहरचनेची पूर्ण कल्पना येत नाही.

तिसरी जमीन ७० सें. मी. खोलीवर नोंदल्या (टेकाड-२, स्तर-३) गेली. या जमिनीचा आकार २.३ मीटर रुंद व २ सें. मी जाड होता. जमीन पूर्वीसारखीच चोपून तयार केली होती. या घराच्या मध्यभागी दगडी पाटा आढळला. तसेच पूर्व भागात उभे दगड गाडल्याचे आढळले. परंतु त्याचे नेमके प्रयोजन काय? ते स्पष्ट झाले नाही.

पहिल्या टेकाडातील तिसऱ्या खड्ड्यामध्ये अशा जमिनीच्या व पर्यायाने घरांच्या पातळ्या आढळल्या. टेकाडाच्या पृष्ठभागापासून १७० मीटण खोलीवर घराचे अवशेष आढळले. घराची लांबी २.७५ मीटर असून तपकिरी रंगाच्या मातीने चोपून त्यावर चुन्याचे सारवण केल्याचे आढळले. याही घराला वासे गाडण्यासाठी खड्डे आढळून आले. घराच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात कोळसा, राख आणि जळलेल्या मातीची ढेकळे आढळली. खांब रोवण्यासाठी खोदलेल्या खड्ड्याचा व्यास १० सें.मी. होता. हे घर टेकाड क्रमांक २ मधील ५ व्या व ३ ऱ्या स्तरात सापडलेल्या घराच्या अवशेषाच्या समकालीन होते. मुबलक पुराव्या अभावी या घराच्या आकाराची कल्पना येत नाही.

नैकुंड येथील लोक सर्वसाधारणपणे वर्तुळाकार घरे बांधीत असत. जमीन तपकिरी रंगाने चोपून त्यावर चुन्याचे सारवण केले जाई. छप्पराला वाश्याचा आधार देत असत.

भागीमाहिरी [५३] येथेही घराचा पुरावा (स्तर-६) आढळला. लाकडी खांब रोवण्यासाठी खड्डे आढळून आले. येथील उत्खननाचा अहवाल अद्यापि प्रसिद्ध न झाल्यामुळे जास्त विवरण देणे कठीण आहे तसेच खैरवाडा येथील वसतीस्थानाचे उत्खनन करण्यात आले परंतु वृत्तांन्ताच्या अभावी तेथील लोकांच्या गृहरचनेविषयी माहिति प्राप्त होऊ शकली नाही.

आंध्र

या राज्यात बृहदश्मीय वसतीस्थानाचे उत्खनन अल्प प्रमाणात झाल्यामुळे त्यांच्या गृहासंबंधी फारशी माहिति प्राप्त होऊ शकली नाही. केसरपल्ली (वसतीस्थान व दफन) येथील द्वितीय कालखंडात (इ.स.पू. ४५० ते इ.स. चे ५०) खांब रोवण्यासाठी खड्डे आढळले. [५४] या लाकडी खांबावर हलकेसे छप्पर घालून घर तयार केले असावे. तसेच याच कालखंडात एक खड्डा आढळला. त्यात जळलेली माती आणि राख सापडल्यामुळे त्याचा उपयोग चूल म्हणून केला जात असावा.

दुसरा पुरावा पेद्दाबंकूर येथे नोंदला गेला. [५५] याही स्थळी दफने आढळली. या स्थळी बृहदश्मयुगीन संस्कृती ते सातवाहन काळापर्यंत वेगवेगळ्या लोकवस्त्या झाल्याचे निदर्शनास आले.

येथील पहिल्या कालखंडात चार लोकवस्त्या नोंदण्यात आल्या. त्यापैकी चवथी वस्ती ही बृहदश्मयुगीन संस्कृतीची होती. इथे लाकडी खांबासाठी खड्डे आढळले. तसेच घराला मातीच्या भिंती असून त्यावर पातळसा चुन्याचा थर दिला होता.

दुसऱ्या कालखंडात (Level II, ७ आणि ६ थर) लाकडी वासे रोवण्यासाठी खड्डे खोदल्याचे निदर्शनास आले. तर तिसऱ्या कालखंडात घराच्या जमिनीला नरम दगडाच्या फरशा लावल्या होत्या. याच काळात चुलीचे अवशेष सापडले. त्यासोबत तपकिरी लाल रंगाचा खोलगट वाडगा आढळला. तर दुसऱ्या चुलीजवळ धान्य साठविण्याचे तांबड्या रंगाचे रांजण आढळले.

चवथ्या कालखंडात लहान दगड-गोट्याची भर घालून त्यावर नरम दगडाच्या फरशा घराच्या जमिनीला लावण्यात आल्या.

या सर्व पुराव्यावरून घराच्या आकारासंबंधी कल्पना येत नाही. तरी येथील घरे महाराष्ट्र आणि कर्नाटकात आढळलेल्या घरापेक्षा निराळी नसावीत असे अनुमान करता येते.

तामिळनाडूमधला पुरावा तुलनेने उत्तरकालीन असला तरी दख्खनच्या लगतच असलेल्या या प्रदेशातील बृहदश्मयुगीन घरासंबंधी मिळालेल्या पुराव्यांचा विचार करणे अगत्याचे वाटते. पायमल्ली येथे घराचे अवशेष सापडले आहेत.[५६]

येथील उत्खननात गुरूराज राव यांना वर्तुळ आणि आयताकार रचनेची घरे आढळून आली. वर्तुळाकार घराचा व्यास १.५ ते ३ मीटर एवढा होता. एका आयताकार घराचा आकार १.७ × ४ मीटर इतका होता. घराच्या सभोवती लहान लहान दगडांनी फरसबंद जमीन तयार केली. तर घरातील जमीन ही लहान लहान दगडांच्या सहाय्याने तयार करून त्यावर मुरुमाचा लेप दिला गेला. त्यावर चुन्याचे सारवण केले होते. या ठिकाणी प्रामुख्याने एकाच खोलीच घरे होती परंतु काही घरे दोन खोल्यांचीही होती पण त्याचे निश्चित स्वरूप स्पष्ट झाले नाही.

याशिवाय उत्खननात सापडलेल्या अवशेषांच्या आधारे एकंदर गृहजीवनावर बराच प्रकाश पडतो. स्वतंत्र स्वयंपाक घराचा कुठेही पुरावा उपलब्ध झाला नाही. बोरगाव येथे खुराचा पाटा बृहदश्मात सापडला तर नैकुंड येथील घरात चापट दगड सापडले. त्यांचा उपयोग पाट्यासारखा करीत असावेत. याव्यतिरिक्त चुलीचे अवशेष आढळून आल्यामुळे (घराच्या उत्तरेला) या ठिकाणी ते लोक स्वयंपाक करीत असावेत. आसपास मोठ्या संख्येने प्राण्यांची हाडे व गहू सापडल्यामुळे वरील मताला दुजोरा मिळतो.

धान्य साठविण्यासाठी पेद्दाबंकूर येथे तांबड्या रंगाचे रांजण सापडले तसेच चुलीच्या जवळ तपकिरी लाल रंगाचा खोलगट वाडगा सापडला. यावरून आपल्याला एवढेच सांगता येईल की, बृहदश्मयुगीन संस्कृतीमध्ये धान्य साठवून ठेवण्याची प्रथा नव्हती.

ही संस्कृती शेतीप्रधान असली तरी शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे आणि आजच्या प्रमाणे एकाच जागेचा अनेकदा पीक घेता येत नसल्यामुळे, शिवाय शेतीला लागणारी अवजारे एकंदर वस्तुंच्या तुलनेत अल्प असल्यामुळे, त्यांच्या शिकारी जीवनाची आठवण होणे सहाजिकच आहे. मास हे भाजून की शिजवून खात होते याबद्दल आपल्याला तूर्त तरी अनुमान करता येत नाही. एवढेच आपल्याला सांगता येईल की, आहारात शाकाहाराबरोबर मांसाहाराचा समावेश होता. अशा प्रकारचा पुरावा नैकुंड येथील उत्खननात प्राप्त झाला.

संदर्भ वाङ्मय

१. सांकलिया, ह. धी. *प्रीहिस्ट्री अँड प्रोटोहिस्ट्री ऑफ इंडिया अँड पाकिस्तान*, पृ. ५०८

२. माने, ग. का. दख्खनमधील बृहदश्मीय संस्कृती (अप्रकाशित प्रबंध), नागपूर विद्यापीठ, नागपूर, पृ. १३५

३. *एक्स्कॅवेशन अॅट टाकळघाट अँड खापा*, पृ. ६३-६८. नैकुंड एक्स्कॅवेशन, पृ. ७१-७२, डॉ. देव यांच्या सौजन्याने.

४. सुंदर, अ. दि अर्ली चेम्बर टुम्ब्ज ऑफ साउथ इंडिया, पृ. १८०

५. *पवनार एक्स्कॅवेशन*, पृ. २५, *एक्स्कॅवेशन अॅट टाकळघाट अँड खापा*, पृ. ७०, नैकुंड एक्स्कॅवेशन, पृ. ७२, *एन्शन्ट इंडिया*, खंड १३, पृ. १२५-२९, नागराज राव, मि. श्री.; *(प्रोटोहिस्टारिक कल्चर्स ऑफ तुंगभद्रा व्हॅली*, पृ. १२३.

६. देव, शां. भा.; *इन्टरनॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसेन्ट अॅडव्हान्सेस इन आर्किऑलॉजी* (सायक्लोस्टाईल प्रत), पृ. ६.

७. *नैकुंड एक्स्कॅवेशन*, पृ. ७४.

८. माने, ग. का. पूर्वाक्त ७०८ पृ. १३९

९. सुंदर, अ. पूर्वोक्त, पृ. १८०

१०. देव, शां. भा., पूर्वोक्त, पृ. ६.

११. *नैकुंड एक्स्कॅवेशन*, पृ. ७४.

१२. देव, शां. भा., यांच्या सौजन्याने.

१३. देव, शां. भा., *इन्टरनॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसेन्ट अॅडव्हान्सेस इन इंडियन आर्किऑलॉजी* (सायक्लोस्टाईल प्रत), पृ. ६.

१४. *एन्शन्ट इंडिया*, खंड १२, पृ. ७४.

१५. *नैकुंड एक्स्कॅवेशन*, पृ. ७४.

१६. कित्ता.

१७. *पवनार एक्स्कॅवेशन*, पृ. १२६

१८. *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट अँड खापा,* पृ. ७२-७६.

१९. सुंदर, अ. पूर्वोक्त, पृ. १८०.

२०. *नैकुंड एक्स्कॅवेशन,* पृ. ६९.

२१. *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट अँड खापा,* पृ. ४९, आकृती २६, ४२-३, फलक १४, नागराजराव, मि. श्री. पूर्वोक्त, पृ. ७६.

२२. पवनार क्स्कॅवेशन, पृ. ८८, आकृती २८-१, फलक २६-४; *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट अँड खापा,* पृ. ५४, आकृती ३०-१४, फलक २३, पृ. ६०-६२.

२३. *एन्शान्ट इंडिया,* नं. १५, पृ. ११.

२४. *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट अँड खापा,* पृ. ६०, ६२, ७६. नैकुंड एक्स्कॅवेशन, पृ. ७५.

२५. नागराजराव, मि. श्री., पूर्वोक्त, पृ. ६०, ६३.

२६. *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट अँड खापा,* पृ. ६०, ६३.

२७. सुंदर, अ. पूर्वोक्त, पृ. १८०, इ. आ.रि. १९६४-६५, पृ. २२-२३.

२८. र. आ. रि, १९६८-६९ (टंकलिखित प्रत), पृ. ४६-४७.

२९. सुंदर, अ. पूर्वोक्त, पृ. १८०.

३०. *नैकुंड एक्स्कॅवेशन,* पृ. ४१.

३१. *पवनार एक्स्कॅवेशन,* पृ. ८, *नैकुंड एक्स्कॅवेशन,* पृ. ९.
कृष्णशास्त्री, व्ही. व्ही., *दि प्रोटो अँड अर्ली हिस्टॉरिकल कल्चर्स ऑफ आंध्र प्रदेश,* पृ. ६१.

३२. जामखेडकर, अ. प्र., यांच्या सौजन्याने.

३३. *एन्शान्ट इंडिया,* न १३, फलक २६, पृ. १०४; *एन्शान्ट इंडिया,* नं. ४, फलक सी.१६ नं. १२, इ.आ. रि. १९६९-७०, पृ. ३२-३४, *माहुरझरी एक्स्कॅवेशन,* पृ. २.

३४. *एन्शान्ट इंडिया,* नं. १३, पृ. १०३.

३५. ढवळीकर, म.के., *सेमिनर पेपर्स* (१९६९), पृ. ८५-८९.

३६. *नागपूर पत्रिका,* १२.२.७९, पृ. १., *नैकुंड एक्स्कॅवेशन,* पृ. ३४.

३७. देव, शां. भा. पूर्वोक्त, पृ. ६-७.

३८. रि., *कॅटलॉग ऑफ दि प्रिहिस्टारिक ॲन्टिकिटीज फ्रॉम आदिचनल्लूर अँड पेरूम्बर,* पृ. ५.

३९. ब्रिक्स, जे. डब्लू., *ॲन अकॉउन्ट ऑफ दि प्रिमिटीव्ह ट्राईब्स अँड मान्युमेंट ऑफ निलगिरी,* पृ. ८३.

४०. *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट अँड खापा,* पृ. ४, माने, ग. का., " बृहदश्मयुगीन संस्कृतीची गृहरचना " नागपूर-अमरावती इतिहास परिषद, कळंब येथे वाचलेला लेख, पृ. १.

४१. इ.आ. रि. १९५८-५९, पृ. ३२, १९६०-६१, पृ. २८.

४२. इ.आ. रि., १९५८-५९, पृ. १०, १९५९-६०, पृ. ११.

४३. देव, शां. भा., पूर्वोक्त, पृ. ४.

४४. कित्ता, पृ. १.

४५. माने, ग. का., दख्खनमधील बृहदश्मयुगीन संस्कृती अप्रकाशित प्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर १९८५, पृ. १२५.

४६. नागराजराव, मि. श्री., पूर्वोक्त, पृ. २५.

४७. *एन्शान्ट इंडिया,* नं. ४, पृ. २०३.

४८. *एन्शान्ट इंडिया,* नं. १३, पृ. १५.

४९. *पवनार एक्स्कॅवेशन,* पृ. ८.

५०. दीक्षित, म.गो., *एक्स्कॅवेशन ॲट कौण्डिन्यपूर,* पृ. १७.

५१. *एक्स्कॅवेशन ॲट टाकळघाट ॲंड खापा,* पृ. ४-६.

५२. *नैकुंड एक्स्कॅवेशन,* पृ. ९-१०.

५३. देगलूरकर, गो. ब. यांच्या सौजन्याने.

५४. *एन्शान्ट इंडिया,* नं. २२, पृ. ५५.

५५. कृष्णशास्त्री, व्ही. व्ही. पूर्वोक्त, पृ. ६०-६७.

५६. इ.आ. रि., १९६७-६८, पृ. २६-३०.

मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी केलेल्या सामाजिक व आर्थिक सुधारणांची फलश्रुती

प्रा. डॉ. मधुकर ज. जाधव

स्वातंत्र्यपूर्व मुंबई इलाख्यातील दक्षिणी संस्थांनांच्या इतिहासामध्ये फलटण संस्थान व फलटण संस्थानचे शेवटचे अधिपति श्रीमंत मालोजीराजे नाईक-निंबाळकर यांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. फलटणचे नाईक निंबाळकर घराणे महाराष्ट्रातील महत्त्वाच्या राजघराण्यांमधील अग्रगण्य घराणे मानले जाते. फलटण संस्थान, या इलाख्यातील सर्वात जुने संस्थान होय. फलटणच्या नाईक-निंबाळकर घराण्याला व फलटण संस्थानला साधारण सातशे वर्षांचा इतिहास आहे. श्रीमंत मालोजीराजे हे फलटण संस्थानचे पंचविसावे अधिपति होत. तत्कालीन महाराष्ट्रात जे काही मोजके प्रागतिक विचारसणीचे, प्रजाहितदक्ष व सुधारणावादी संस्थानिक होते त्यापैकी श्रीमंत मालोजीराजे हे एक होते. जेव्हा हिंदुस्थानातील बहुसंख्य संस्थानिक सरंजामाही थाटात राजवैभव उपभोगून विलासी जीवन जगत होते तेव्हा श्रीमंत मालोजीराजे प्रजेच्या उत्कर्षासाठी आपल्या संस्थानात अनेकविध सुधारणा घडवून आणण्यासाठी इ.स. १९१७ते १९४८ या काळात सतत कार्यरत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेच्या आगमनाबरोबर आलेले इंग्रजी शिक्षण, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, पाश्चात्त्यांची संस्कृती व पाश्चात्त्यांचा इतिहास यांच्या परिशीलनाने सुशिक्षीत झालेले पहिल्या पिढीतील तरूण अंतर्मुख झाले. आपल्या धर्माचे, सामाजिक जीवनाचे व चालीरीतींचे परीक्षण केल्यावर त्यात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता वाटल्यामुळे त्यांनी धार्मिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासंबंधीचे विचार प्रतिपादन करून सामाजिक सुधारणांचा श्रीगणेशा केला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर महात्मा जोतीराव फुले यांच्या समाजसुधारणेविषयीच्या क्रांतीकारी विचारांनी व कृतिशीलतेने सामाजिक सुधारणेला चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊन ती गतिमान बनली. म. फुले यांचे सामाजिक सुधारणेबाबतचे क्रांतीकारी विचार व कृतिशीलता यांचा प्रभाव फलटण संस्थानचे अधिपति श्रीमंत मालोजीराजे यांच्या सामाजिक सुधारणेच्या विचारांवर व कार्यावर असल्याचे दिसून येते. याशिवाय कर्मवीर भाऊराव

पाटील व महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या अलौकिक कार्याने मालोजीराजे प्रभावित झाले होते.

आपल्या संस्थानातील प्रजेच्या हिताच्या व कल्याणाच्या सुधारणा घडवून आणण्यात श्रीमंत मालोजीराजे सदैव तत्पर असल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या संस्थानातील प्रजेचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी खालील अनेकंविध सामाजिक व आर्थिक स्वरुपाच्या सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

शिक्षण : जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हा मूलभूत पाया आहे. याची श्रीमंत मालोजीराजांना पुरेपूर जाणीव होती. म्हणूनच त्यांनी आपल्या प्रजेला शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी भरपूर द्रव्य खर्च करून संस्थानात प्राथमिक शाळा स्थापन केल्या आणि फलटणमधील माध्यमिक शाळा (हायस्कूल) नावारूपास आणली.

प्राथमिक शिक्षण : आपल्या संस्थानातील ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यासाठी श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या कारकीर्दीत तरडगाव, साखरवाडी, आदर्की बु॥, निंबळक, बरड, गुणवरे, निरगुडी, बीबी इ. गावात इ. ७ वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. संस्थानातील बहुतेक सर्व लहान गावात इ. ४ थीपर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. विशेष म्हणजे शिक्षणाचे महत्त्व जाणून श्रीमंत मालोजीराजांनी इ.स. १९१७ नंतर आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची व्यवस्था केली.

माध्यमिक शिक्षण : संस्थानातील प्रजेच्या इंग्रजी व माध्यमिक शिक्षणासाठी इ.स. १८९३ मध्ये श्रीमंत मुधोजीराव महाराजांनी मुधोजी हायस्कूल स्थापन केले. त्यापूर्वी इ.स. १८८० पासून मराठीबरोबर इंग्रजी शिक्षणाची सोय फलटणमधील शाळेत केली होती. श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या कारकीर्दीत अगदी गरीबांनाही माध्यमिक व इंग्रजी शिक्षण घेणे परवडावे व त्यांची सोय व्हावी या उद्देशाने प्रारंभी हायस्कूलमध्ये मोफत शिक्षणाची सोय केली. पुढील काळात फी घेण्यास सुरूवात केली. पण फी अगदी अल्प म्हणजे इ. ७ वीपर्यंत द.म. १ ते २ रुपये ही फी इतर ठिकाणच्या तुलनेत केवळ १/३ इतकीच होती. मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना फी पूर्णपणे माफ होती. शिवाय होतकरू, गरीब विद्यार्थ्यांना भरपूर नादाऱ्या दिल्या जात. दिवसेंदिवस माध्यमिक शिक्षणाचा व्याप वाढला आणि पूर्वीची हायस्कूलची इमारत अपुरी पडू लागली. ती गैरसोय दूर करण्यासाठी श्रीमंत मालोजीराजांनी इ.स. १९३९ मध्ये सुमारे ६०,००० /-रुपये खर्च करून आठ-आठ खोल्यांचे दोन मोठे दुमजली विभाग बांधले.तसेच प्रयोगशाळा व फर्निचरची सोय केली.

प्रतापसिंह शेतकरी बोर्डिंग : संस्थानच्या ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी फलटणमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांची राहण्या-जेवण्याची गैरसोय दूर करण्याच्या

उद्देशाने श्रीमंत मालोजीराजांच्या प्रेरणेने बोर्डिंग समिती स्थापन करण्यात आली होती. इ.स. १९४०-४१ मध्ये या बोर्डिंग समितीला, सध्याच्या एस.टी.स्टँडच्या पूर्वेस कॅनॉलला लागून असलेली १० एकर जमीन श्रीमंत मालोजीराजांनी देणगी दिली. तेथे बोर्डिंग बांधून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची राहण्या-जेवण्याची सोय केली. या बोर्डिंगला 'प्रतापसिंह शेतकरी बोर्डिंग' असे नाव देण्यात आले होते.[३] आज याच जागेवर श्रीराम एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाखांचा ज्ञानयज्ञ चालू आहे.

स्त्री-शिक्षण : पारंपारिक विचारांच्या प्रभावाखाली असणाऱ्या समाजात त्यावेळी मुलींच्या शिक्षणासंबंधाने प्रमुख दोन अडचणी होत्या. पालक मुलींना मुलांच्या शाळेत पाठविण्यास राजी नव्हते आणि मुलींचे शिक्षण तिच्या लग्नानंतर फुकट जाते तेव्हा त्यावर पैसा कशासाठी खर्च करावयाचा अशी पालकांची भ्रामक समजूत होती. या दोन्ही अडचणी निवारण्यासाठी व मुलींच्या शिक्षणासंबंधाने समाजामध्ये असणारा गैरसमज दूर होऊन मुलींना शिक्षण देण्याची धारणा समाजात निर्माण व्हावी म्हणून श्रीमंत मालोजीराजांनी इ.स. १९३२ मध्ये प्रथम आपली सुकन्या श्रीमंत सरोजिनीदेवी ऊर्फ अक्कासाहेब यांना फलटणच्या शाळेत घातले आणि जनतेपुढे एक नवीन आदर्श निर्माण करून जनमत बदलण्यासाठी प्रत्यक्ष कृती केली. केवळ खर्चाच्या सबबीमुळे मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाऊ नये म्हणून श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या संस्थानात मुलींना संपूर्ण फी माफी दिली होती.[४]

संगीत व शारीरिक शिक्षणास उत्तेजन

श्रीमंत मालोजीराजे अधिकारावर आल्यापासून त्यांनी आपल्या संस्थानातील शिक्षणक्रमात शारीरिक शिक्षण व संगीत या विषयांचा समावेश केला. त्यांच्या मते विद्यार्थ्यांचे बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक सामर्थ्याचा विकास झाला पाहिजे. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानातील शाळांमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे केले. मुधोजी हायस्कूलमध्ये शारीरिक शिक्षण हा परीक्षेसाठी स्वतंत्र विषय सुरू केला. मुलांसाठी क्रिकेट, व्हॉलीबॉल, फुटबॉल तर मुलींसाठी आट्यापाट्या, खो-खो, कबड्डी, लेझीम, लाठी इ. खेळ सुरू केले. या शिवाय विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा म्हणून संगीताच्या शिक्षणाची सोय केली.[५]

इतर ठिकाणच्या शैक्षणिक कार्यास मदत

आपल्या संस्थांना बाहेर बहुजन समाजातील गरीब, पददलीत आणि अनाथ बालीका व निराधार स्त्रिया यांच्या शिक्षणासाठी, उत्कर्षासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना देखील श्रीमंत मालोजीराजांनी सतत मदतीचा हात देऊन त्यांच्या कार्यास प्रोत्साहित

केले. बहुजन समाज व पददलीत समाज यांच्या उद्धारासाठी अहर्निश झटणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांना आपल्या दरबारात निमंत्रित करून त्यांचा सत्कार केला. त्यांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यास मदत म्हणून आपला सातारा येथील 'फलटण निवास' या नावाचा बंगला भोवतालच्या साडे दहा एकरांच्या आवारासह इ.स. १९४६ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेस बक्षीस दिला. शिवाय या इमारतीच्या डागडुजीसाठी रोख पाच हजार रुपये दिले.[६] याच वास्तूत व जागेवर सध्या छत्रपती शिवाजी कॉलेज, धनंजयराव गाडगीळ कॉमर्स कॉलेज, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयांचे ज्ञानदानाचे पवित्र कार्य चालू आहे.कै. गो. कृ. देवधर यांचेमुळे श्रीमंत मालोजीराजांचा पुण्याच्या सेवासदन संस्थेशी संबंध आल्यापासून वेळोवेळी आपलेपणाने त्यांनी त्या संस्थेस आर्थिक मदत देऊन उत्कर्ष घडवून आणण्यास बहुमोल सहकार्य केले. या संस्थेस त्यांनी आपला पुण्याच्या लक्ष्मी रस्त्यावरील वाडा दान दिला. शिवाय त्या संस्थेस एकूण ३२०००/- रुपये रोख मदत केली होती. सेवासदन संस्थेने श्रीमंत लक्ष्मीदेवी नाईक निंबाळकर, राणीसाहेब यांना १ एप्रिल १९३८ ते ३१ मार्च १९८० या काळात अध्यक्षपदावर नियुक्त करून त्यांचा बहुमान केला होता.[७] हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेचे संस्थापक महर्षी धोंडो केशव कर्वे यांनाही त्यांची संस्था आर्थिक संकटात असताना दीर्घकाळ बहुमोल आर्थिक सहाय्य केले.[८] महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा आपल्या दरबारात सत्कार करून त्यांना दरवर्षी ६०० रुपये पेन्शन देण्याचे मान्य केले. इ.स. १९४४ पासून सतत ४० वर्षे हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेने श्रीमंत लक्ष्मीदेवी नाईक निंबाळकर, राणीसाहेब यांना अध्यक्षपदाचा बहुमोल मान दिला होता. या खेरीज सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र साहित्य परिषद, भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट इ. संस्थांना श्रीमंत मालोजीराजांनी बहुमोल सहाय्य केले होते.[९] इ.स. १९१७ मध्ये फलटण संस्थानच्या अंदाज पत्रकात शिक्षणासाठी फक्त १०,००० रुपयांची तरतूद केली होती. पुढील काळात त्या रकमेत सतत वाढ करून इ.स. १९४५ च्या अंदाज पत्रकात शिक्षणासाठी १,००,००० रुपयांची तरतूद केली होती.[१०] यावरून श्रीमंत मालोजीराजांचा शिक्षणाबाबतचा पुरोगामी दृष्टिकोन स्पष्ट होतो.

अस्पृश्यता निवारणासाठी प्रयत्न

समाज रचनेच्या जातीय पद्धतीतून उदयास आलेली अस्पृश्यता फलटण संस्थानातही होती. श्रीमंत मालोजीराजे अधिकारावर आल्यापासून त्यांनी अस्पृश्यतेची दाहकता कमी करण्याचा व अस्पृश्य समाजातील व्यक्तींना बरोबरीने वागवून त्यांची उन्नती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. श्रीमंत मालोजीराजे सर्व जाती, धर्म व पंथाच्या

यांचे अध्यक्षतेखाली पुणे येथे भरणार होती. तिचा सर्व खर्च देण्याचे श्रीमंत राजेसाहेबांनी मान्य केले होते.[१७] श्रीमंत मालोजीराजांच्या पुरोगामी वृत्तीच्या व विचारांच्या द्योतक होत.

स्त्रियांचे उन्नतीसाठी केलेल्या सुधारणा

कोणत्याही समाजातील स्त्रिया साक्षर, जागृत व सुजाण झाल्याशिवाय त्या समाजाची सर्वांगीण प्रगती होणे अशक्य आहे, या जाणीवेने श्रीमंत मालोजीराजे व त्यांच्या पत्नी श्रीमंत लक्ष्मीदेवी यांनी आपल्या संस्थानातील स्त्रियांच्या अडीअडचणी दूर करून त्यांच्या उन्नतीसाठी कार्य केले. या कार्यात श्रीमंत राणीसाहेबांचा पुढाकार असला तरी त्या पाठीमागे श्रीमंत राजेसाहेबांची प्रेरणा व प्रोत्साहन होते. स्त्रियांचे उन्नतीकरीता श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या कारकीर्दीत खालील सुधारणा केल्या.

पडदा पद्धती बंद केली

त्या काळात उच्चकुलीन मराठा समाजात सरदार, इनामदार, राजेरजवाडे यांच्या घराण्यातील स्त्रियांमध्ये पडदा(गोशा) पद्धत जारीने चालू होती. पण पुरोगामी विचारांच्या राजदांपत्याला ही पद्धत कालबाह्य व अनावश्यक वाटली. श्रीमंत राजेसाहेबांच्या प्रोत्साहनावरून श्रीमंत राणीसाहेबांनी राज्यारोहणाचे दिवशीच (दि. १७ नोहेंबर १९१७) मोठ्या धैर्याने पूर्वापार चालत आलेली पडद्याची पद्धती झुगारून दिली.[१८] श्रीमंत राणीसाहेब पडद्याशिवाय राज्यारोहणाच्या सोहळ्यात सहभागी झाल्या. त्यानंतर प्रजाजनांनी शंकर मार्केट येथे आयोजित केलेल्या जाहीर सत्कारास श्रीमंत राणीसाहेब पडद्याशिवाय नि:संकोचपणे उपस्थित राहिल्या. राजदांपत्याचे हे पहिले क्रांतीकारक पाऊल होते.[१९] अनेक सभा, समारंभातून राजदांपत्याने स्त्रियांनी धीट व्हावे, पडदा पद्धतीसारखी कालबाह्य, अनावश्यक पद्धती सोडून द्यावी असे आवाहन केले. त्याची परिणती म्हणून मराठा, मुस्लीम समाजातील अनेक स्त्रियांनी श्रीमंत राणीसाहेबांचे अनुकरण करून पडदा पद्धतीचा त्याग केला.[२०]श्रीमंत राजेसाहेबांनी पडदा पद्धती बंद करून श्रीमंत राणीसाहेबांना समाजात मिसळण्याची मुभा दिली. त्यामुळे समाजातील स्त्रियांची दु:खे कोणकोणती आहेत हे पाहण्याची, त्यावर विचार करण्याची व ती दूर करण्याची त्यांना संधी प्राप्त झाली.

सगुणमाता सुतिकागृहाची स्थापना

श्रीमंत राणीसाहेब संस्थानातील स्त्रियांच्या प्रश्नामध्ये जातीने लक्ष घालीत आणि श्रीमंत राजेसाहेब त्यांच्या सोडवणुकीसाठी सर्वतोपरी मदत करीत. संस्थानातील स्त्रियांच्या आरोग्याचा आणि मुख्यत: प्रसूतीचा प्रमुख प्रश्न होता. श्रीमंत राणीसाहेबांनी इ.स.

१९२८ मध्ये फलटण येथे सगुणमाता सुतिकागृहाची स्थापना करून अगदी अल्प खर्चात स्त्रियांच्या प्रसूतीची व औषधोपचाराची सोय केली.[२१] त्यामुळे स्त्रियांचे बाबतीतील महत्त्वाच्या प्रश्नाची सोडवणूक झाली. या सोयीचा लाभ आजतागायत स्त्रियांना होत आहे.

महिला मंडळाची स्थापना

श्रीमंत राजेसाहेबांच्या प्रेरणेने श्रीमंत राणीसाहेबांनी स्त्रियांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक विकास आणि सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले. स्त्रियांच्या विचारांचा व कर्तृत्वाचा आदर केला पाहिजे असे त्यांना वाटे. महिलांचे प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी व त्यांच्या उन्नतीसाठी श्रीमंत राणीसाहेबांनी फलटण येथे इ.स. १९१७ मध्ये 'फलटण महिला मंडळाची' स्थापना केली. फलटण येथे इ.स. १९३६ मध्ये अखिल भारतीय महिला मंडळाचे अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडले.[२२] ग्रामीण भागातील महिलांची संघटना व उन्नती करण्यासाठी ग्रामीण भागातही महिला मंडळाच्या शाखा सुरू करण्यात आल्या. महिला मंडळामार्फत फिरत्या दवाखान्याचे पथक सुरू केले.

स्त्रियांमधील पारंपारिक गैरसमजुती व देवभोळेपणा काढून टाकण्याचा प्रयत्न महिला मंडळामार्फत श्रीमंत राणीसाहेबांनी केला. पण स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने अपेक्षित यश आले नही. म्हणून श्रीमंत राजेसाहेबांनी आपल्या संस्थानात मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विनामूल्य देण्याची व्यवस्था केली. स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी व स्त्रियांनी, मुलींनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रचार करून स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणली. श्रीमंत राणीसाहेबांच्या पुढाकारामुळे इ.स. १९३६ नंतर संस्थानातील स्त्रियांना कायदे मंडळाच्या निवडणुकीत मत देणे, कायदे मंडळाचे सभासद होणे हे हक्क प्राप्त झाले.[२३]

इंग्रजी शिक्षण

श्रीमंत मालोजीराजांच्या प्रेरणेने व प्रोत्साहनाने आणि श्रीमंत राणीसाहेबांच्या पुढाकाराने इ.स. १९३१ मध्ये खुद्द राजवाड्यात शहरातील प्रौढ स्त्रियांना इंग्रजी शिकविण्याचा वर्ग सुरू करण्यात आला होता. या वर्गात सौ. लिखिते, सौ. उमाबाई कानेटकर, सौ. हळबे, श्रीमंत राणीसाहेब व इतर पाच-सात स्त्रिया येत होत्या. या वर्गाला शिकविण्याची जबाबदारी श्री. शं. के. कानेटकर यांच्यावर सोपविली होती.[२४]

बालविवाहास बंदी

समाजात प्रचलित असलेली बालविवाहाची अनिष्ट प्रथा बंद करण्याच्या दृष्टीने श्रीमंत राजेसाहेबांनी बुद्धिवंतांशी विचारविनिमय करून, त्या दृष्टीने संस्थानातील लोकांचे

प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. परंतु बालविवाह समाजाच्या इतका अंगवळणी पडला होता की प्रबोधनाचा अपेक्षित परिणाम झाला नाही. तेव्हा ब्रिटिश सरकारने बालविवाहास आपल्या राज्यात बंदी घालण्यासाठी इ.स. १९२४ मध्ये पास केलेला ' शारदा कायदा ' आपल्या संस्थानात तात्काळ लागू करण्याची व्यवस्था केली. या कायद्यानुसार मुलगी पंधरा वर्षांची झाल्याशिवाय तिचा विवाह करण्यास बंदी घातली. या कायद्याची अंमलबजावणी कडकपणे होत आहे किंवा नाही. याकडे श्रीमंत राणीसाहेबांनी स्वत: जातीने लक्ष दिले. त्यादृष्टीने त्यांनी खेड्यातील गावकामगारांना सक्त आदेश दिले होते.[२५]

आर्थिक सुबत्तेसाठी प्रयत्न

प्रजेच्या सामाजिक मागासलेपणामागे आर्थिक दुर्बलता हे प्रमुख कारण आहे, याची श्रीमंत मालोजीराजांना जाणीव होती. म्हणून त्यांनी राजपदावर आल्यापासून आपल्या शेतकरी प्रजेची आर्थिक दुर्बलता व अवनत अवस्था संपवून त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले होते. शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी इ.स. १९१८ पासून संस्थानात सहकारी पत संस्था स्थापन केल्या, मध्यवर्ती बँकेची स्थापना केली. सर विश्वेश्वरय्या यांच्या मध्यस्थीने ' निरा उजवा कालवा ' संस्थानी प्रदेशातून नेण्यासाठी प्रयत्न करून संस्थानातील ३० गावांना इ.स. १९२५ पासून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले.[२६] संस्थानच्या ज्या भागात कालव्याचे पाणी मिळाले नाही त्या भागात पडलेल्या पावसाचे पाणी वाहून न जाता ते पाणी तेथेच मुरून त्या टापूतील विहिरींना बारामाही पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून मिरढे, जावळी, धुमाळवाडी, आदर्की, तांबवे इ. ठिकाणी मुराईची धरणे बांधली. पिंपरद, गोखळी, जिंती व होळ येथे पॉवर क्रशर सुरू करून उत्तम गूळ तयार करण्यासाठी गुळव्यांना प्रशिक्षण देऊन तयार केले. मुंबई सरकारकडे खटपट करून ' इंपेरियल ॲग्रिकल्चरल रिसर्च स्कीम 'च्या ऊस संशोधन केंद्राचा लाभ संस्थानातील शेतकऱ्यांना मिळावा म्हणून इ.स. १९३१ मध्ये पाडेगाव येथे ते केंद्र सुरू करण्यात यश मिळविले.[२७]

इ. स. १९२९-३० पासून संस्थानातील ऊसाचे उत्पादन वाढल्यावर संस्थान हद्दीत साखर कारखाना काढण्यासाठी मुंबईचे उद्योगपती श्रीमान शेठ मफतलाल, कांतीलाल व आपटे यांच्याशी वाटाघाटी करून, त्यांना काही काळ आवश्यक त्या सवलती देऊन, इ.स. १९३३ मध्ये पिंपळवाडी (आजची साखरवाडी) येथे ' दि फलटण शुगर वर्क्स लि. ' हा कारखाना काढला. त्यामुळे संस्थानातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला. कारागिर तयार झाले. ऊस उत्पादक शेतकरी व संस्थानचे उत्पन्नात वाढ झाली. इ.स. १९३८ मध्ये शेतकऱ्यांची रु. ५१,२४९/-ची जमीन महसुलाची थकबाकी माफ केली. जप्त केलेल्या जमिनी परत दिल्या. जमीन महसूल एक रूपयास तीन

आणे (साधारण १८%) कमी केला. इ.स. १९४० च्या सुमारास रु. १००,०००/-चा शेती सुधारणा फंड व रु. १०,०००/-चा औद्योगिक सुधारणा फंड निर्माण केला.[२८] वरील उपक्रमांचा परिपाक म्हणून संस्थानातील प्रजेची व संस्थानची आर्थिक स्थिती सावरून सुबत्ता आली.

फलटण तालुक्यात स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक व क्रीडाविषयक प्रगती, वैचारिक व राजकीय जागृती, विविध जातीजमातीमध्ये सलोखा व सामंजस्य, स्त्रियांची विविध क्षेत्रात प्रगती, आधुनिक वैद्यकीय सुविधा, सहकारातील उत्कर्ष आणि औद्योगिक व कृषी क्षेत्रात प्रगती मोठ्या प्रमाणात झाल्याची दिसून येते. फलटण तालुक्याची विविध क्षेत्रात झालेली ही प्रगती म्हणजे श्रीमंत मालोजीराजांनी फलटण संस्थानचे अधिपति असताना इ.स. १९१७ ते १९४८ या काळात संस्थानातील प्रजेच्या उत्कर्षासाठी केलेल्या विविध सामाजिक व आर्थिक सुधारणांची फलनिष्पत्ती होय.

संदर्भ सूची :

१. दोशी, मा. म. (सं.), ना. मालोजीराव सत्कार अंक, फलटण, १९५६, 'मालोजीरावांचे 'राजे 'पण', श्री. ग. म.. वीरकर यांचा लेख, पृ. ४२.

२. कित्ता, 'विद्यार्थ्यांचा आदरभाव'- पृ. ८०.

३. भोसले (प्राचार्य) शि. अ. (सं.), स्मरणिका, कै. श्रीमंत मालोजीराव मु. ना. निंबाळकर राजेसाहेब, पुतळा स्मारक समिती, १९८३, 'ग्लीम्पसेस ऑफ दि मून', श्री. स. रा. भोसले यांचा लेख हे संस्थानात लोकनियुक्त मंत्री होते., पृ. २२.

४. दोशी मा. म. (सं.), उपरोक्त, 'विद्यार्थ्यांचा आदरभाव', पृ. ८०.

५. कित्ता, 'शिक्षण संस्थाकी स्थापना', श्री. मा. म. दोशी यांचा लेख, पृ. ८२.

६. भोसले (प्राचार्य) शि. अ. (सं.), उपरोक्त, 'जनहिताची काळजी वाहणारा राजा', श्री. आ. भा. पाटील यांचा लेख. (हे रयत शिक्षण संस्थेचे संघटक आहेत.,) पृ. १२.

७. दोशी मा. म. (सं.), उपरोक्त, 'कृतज्ञता', कु. काशीताई आठवले यांचा लेख (ह्या सेवासदन संस्थेच्या सेक्रेटरी होत्या) पृ. ७४.

८. भोसले (प्राचार्य) शि. अ. (सं.), उपरोक्त, 'श्रीमंत राजेसाहेब हे असे होते', श्री. रा. ब. भगत यांचा लेख (हे प्रजा परिषदेचे संस्थापक सचिव होते), पृ. २९-३०.

९. कित्ता, पृ. ३०

१०. दोशी मा. म. (सं.), उपरोक्त, 'दि इकॉनॉमिक्स ऑफ ए मॉडेल स्टेट', प्रा. श्री. एम. एस. गोसावी यांचा लेख, पृ. ११२.

११. भोसले प्राचार्य. शि. अ. (सं.), उपरोक्त, श्री. रा. ब. भगतांचा उपरोक्त लेख, पृ. २७.

१२. दोशी मा. म. (सं.), उपरोक्त, 'राजर्षी मालोजीराव', श्री. भा. ल. वेलणकर यांचा लेख, पृ. ५६.
१३. दाणी एस.एम., ॲन्युअल रिपोर्ट ॲण्ड गॅझेट ऑफ फलटण स्टेट -१९३०-३१, पृ. १०.
१४. घळसासी जे. आर. (सं.), कै. श्रीमंत लक्ष्मीदेवी ना. निंबाळकर स्मृती विशेषांक, फलटण, १९८५, 'प्रजाहितदक्ष', श्री. आर. एच. शहा यांचा लेख (हे संस्थानात मंत्री होते), पृ. १८.
१५. भोसले (प्राचार्य) शि. अ. (सं.), उपरोक्त, श्री. रा. ब. भगत यांचा उपरोक्त लेख, पृ. ३१.
१६. कित्ता, 'जनसेवक व सुधारक मालोजीराजे' श्री. त्र्यं. शि. भारदे यांचा लेख, पृ. २६.
१७. दोशी मा. म. (सं.), उपरोक्त, श्री. भा. ल. वेलणकर यांचा उपरोक्त लेख, पृ. ५७.
१८. पटवर्धन वि. अ. (सं.), संस्थानांतील लोकशाहीचा लढा, पुणे, १९४०, पृ. ३०४.
१९. घळसासी जे. आर. (सं.), उपरोक्त, 'न मातुः परदैवतम्' श्री. स. रा. भोसले यांचा लेख, पृ. १४.
२०. भोसले (प्राचार्य) शि. अ. (सं.), उपरोक्त, श्री. स. रा. भोसले यांचा उपरोक्त लेख, पृ. २२.
२१. घळसासी जे. आर. (सं.), उपरोक्त, 'समाजाभिमुख व पुरोगामी नेतृत्व', श्री. वा. र. लेले यांचा लेख, पृ. २३.
२२. कित्ता, 'वैभवशाली धर्मशील राणी', श्री. वा. मो. कोळेकर यांचा लेख, पृ. २२.
२३. पटवर्धन वि. अ. (सं.), उपरोक्त, पृ. ३०४.
२४. दोशी मा. म. (सं.), 'स्मृति गंध', श्री. शं. के. कानेटकर यांचा लेख, पृ. ८६.
२५. घळसासी जे. आर. (सं.), उपरोक्त, 'प्रजाहितदक्ष कै. श्रीमंत लक्ष्मीदेवी ना. निंबाळकर', श्री. आर. एच. शहा यांचा लेख, पृ. १७.
२६. भोसले (प्राचार्य) शि. अ. (सं.), उपरोक्त, श्री. रा. ब. भगत यांचा उपरोक्त लेख, पृ. २८.
२७. दोशी मा. म. (सं.), उपरोक्त, श्री. ग. म. वीरकर यांचा उपरोक्त लेख, पृ. ४२.
२८. पटवर्धन वि. अ. (सं.), उपरोक्त, पृ. ३०१.

मंगळवेढा येथील शिल्पपटाच्या निमित्ताने प्रतिक्रिया

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक

प्रा. ब्रम्हानंद देशपांडे यांनी मंगळवेढा येथील शिल्पपटावर प्रथमच प्रकाश टाकला. (संशोधक-वर्ष ६९ अंक ३/४ - पृष्ठ ३७ ते ४३) रुद, विर्गळ शिल्पांच्या पेक्षा यातील वेगळेपण त्यांनी स्पष्ट केले. तसेच शैव-आणि-जैन पंथीयातील संघर्षच एकन्तक रामैय्याचे कथानक याची नोंद केली आहे. या लेखाच्या निमित्ताने मला तेर (जि. उस्मानाबाद) येथील श्री. उत्तरेश्वर मंदिर परिसरातील विर्गल आठवले. मध्ययुगाच्या प्रारंभिक कालखंडात शैव-वैष्णव, शैव-जैन व अन्य पंथीत परस्पर संघर्ष व समन्वय झाल्याचे आढळते. महाराष्ट्रात राणीसावरगाव (जि. परभणी) सारखी काही स्थाने याबाबतीत दाखवता येतात. जैनांच्या शाक्त व शिव सांप्रदायी मंडळींचा संघर्ष झाला असावा. अर्थात विरगळ सदृश्य शिल्पपटावर अशी आठवण कोरून ठेवण्याची रुढी अपवादात्मक होती.

विरगळ- ग्रामीण भागात या विरगळ शिल्पात कांदलाचे दगड किंवा कांदलकल्लू म्हणतात. हा कांदल म्हणजे संघर्ष. तो अनेक कारणांनी झाला. विशेषत: ग्रामरक्षण, गोधनरक्षण किंवा दोन राजे, सामंत यांच्या परस्पर प्रभूसत्तेसाठी झाला.

निरगळ- तेर येथील अनेक विरगळ शिल्पांपैकी उत्तरेश्वर मंदिर परिसरातील एका शिल्पपटावर जे दृश्य कोरले आहे त्यात एका नि:शस्त्र, शांत उभ्या असलेल्या व्यक्तीवर (कदाचित हा जैन मुनी असावा) दुसरी खड्गधारी व्यक्ती आक्रमण करीत आहे. याही स्थितीत पहिला शांतमुद्रित उभा आहे. वरील पटात आक्रमक व्यक्ती आपला आनंद व्यक्त करते आहे. त्याला दोन अप्सरा स्वर्गात नेतात, असा पारंपारिक अर्थ लावता येणे शक्य आहे. पण शिल्पपटावरील दृश्य हे विजयाचा आनंद व्यक्त करणाऱ्या व्यक्तीचे वाटते व त्यावरील शिल्पपटात हाच विजयी वीर शिवाची पूजा करीत आहे. एकूण, हा शिल्पपट रुढ विरगळ शिल्पापेक्षा वेगळ्या अर्थाने उल्लेख करावासा वाटतो. प्रा. देशपांडे यांच्या लेखाच्या अनुषंगाने हा एक निर्देश आहे. ●

डॉ. व. दा. कुलकर्णी यांना श्रद्धांजली

डॉ. प्र. न. देशपांडे

मुख्य चिटणीस

[डॉ. व. दा. कुलकर्णी यांचे निधन झाल्याचे वृत्त समजल्यावर मंडळाचे चिटणीस डॉ. प्र. न. देशपांडे यांनी डॉ. कुलकर्णींच्या चिरंजिवांना लिहिलेले पत्र]

प्रती, दिनांक : २६-८-१९९२

श्रीयुत कुलकर्णी, हैदराबाद,

स.न.वि.वि.

दि. २५ ऑगस्ट ९२ 'महाराष्ट्र टाईम्स' या धुळे येथे येणाऱ्या वर्तमान पत्रातून डॉ. व. दा. कुलकर्णी यांचे १५ ऑगस्ट रोजी हृदय विकाराच्या आजाराने दुःखद निधन झाल्याची बातमी वाचण्यात आली. डोळ्याचे ऑपरेशन झाल्यानंतर नवी दृष्टी प्राप्त झाली व संशोधन कार्यास नव्याने जोम आला अशा आशयाचे त्यांचे नुकतेच पत्र येऊन गेले होते. त्यामुळे आम्ही उत्साहित झालो होतो. परंतु त्यांच्या अचानक व अकाली दुःखद निधनाने वज्राघात झाल्याचे जाणवते.

राजवाडे मंडळाशी "डॉ. व. दा." चे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. मंडळाच्या संशोधन कार्यात त्यांचे अमोल सहकार्य मिळाले. मंडळात संशोधन कार्याचे निमित्ताने त्यांचे येणे होत असे, त्या प्रत्येक वेळी माझा व त्याचप्रमाणे माझे सहकारी व सेवकवर्ग यांची आपुलकीने चौकशी करत असत आणि मला धाडलेल्या पत्रात सर्वांची आठवण काढून सप्रेम नमस्कार लिहित असत. या कौटुंबिक जिव्हाळ्यामुळे त्यांचेशी अप्रुप असे कौटुंबिक नाते जुळले होते. त्यांच्या अकाली दुःखद निधनाने कुटुंबातील प्रिय व्यक्ती गेल्याचे दुःख होत आहे. आपल्या कुटुंबियांचे दुःखात मी व्यक्तीशः तसेच मंडळाचे पदाधिकारी व सेवकवर्ग सहभागी होत आहे.

डॉ. व. दा. हे त्यांच्या अथक संशोधन कार्यामुळे चिरस्मरणीय राहतीलच. त्यांच्या अचानक निधनाचा आघात सहन करण्याची शक्ती आपल्या कुटुंबियांस व आम्हा सर्वास परमेश्वर देवो ही प्रार्थना. त्यांच्या आत्म्यास सद्गती व चिरशांती लाभो ही प्रभुचरणी प्रार्थना. ॐ शांती: शांती: शांती.

आपला

(डॉ. प्र. न. देशपांडे)

मंडळ वृत्त

श्री. गिरीश दत्तात्रय मांडके

जून व जुलै महिन्यात राजवाडे संशोधन मंडळास काही मान्यवरांनी भेटी दिल्या. त्यामध्ये 'ग्रंथाली'चे श्री. दिनकर गांगल, श्री. इ.म.धोपटे, उपसचिव, नगरविकास मंत्रालय, मुंबई, श्री. अ.दा. धारप, संचालक, कोषागार, महाराष्ट्र राज्य यांनी भेटी दिल्या व मंडळाच्या कार्याची माहिती घेतली.

दिनांक २३/६/१९९२ रोजी धुळे शहरात महाराष्ट्रातील नगरपालिका अभियंत्यांची परिषद भरली होती. त्यावेळी ५० नगर अभियंत्यांनी राजवाडे संशोधन मंडळाच्या वस्तू संग्रहालयाला भेट दिली.

जगद्गुरु शंकराचार्य यांची मंडळास भेट

श्रीमद् भगवतपूज्यपाद जगद्गुरू शंकराचार्य श्री. भारतीतीर्थ महास्वामी महाराज, श्री श्रृंगेरी शारदापीठाधीश्वर यांनी दिनांक २९/६/१९९२ रोजी मंडळास भेट दिली. मंडळाच्या वस्तुसंग्रहालयातील विविध दालनांचा मोठ्या आस्थेने त्यांनी परिचय करून घेतला.

मंडळाच्या वस्तुसंग्रहालयाचे विद्युतीकरण

मंडळाच्या वस्तुसंग्रहालयातील विविध दालनांमध्ये असलेल्या शोकेसेस मध्ये ट्यूब लाईटस् बसविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक दालनात एक्झॉस्ट फॅन व सिलींग फॅन बसविण्यात आले आहेत. नव्या विद्युतीकरणाने वस्तुसंग्रहालयाच्या सजावटीत अधिक चांगली भर पडली आहे.

मंडळाच्या वस्तुसंग्रहालयाला विविध वस्तू भेट

धुळे येथील प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. अरुण साळुंके, अमेरिकेत स्थायिक झालेले श्री. प्रकाश रामरतनजी जाजू, व नाशिक येथील 'बँक ऑफ बडोदा'चे रिजनल मॅनेजर श्री. ए. के. साने यांनी आपल्या जवळील बहुमोल अशी विविध देशांची चलनी नाणी वस्तुसंग्रहास भेट म्हणून दिली. त्यामुळे वस्तुसंग्रहालयाच्या नाणी संग्रहात मोठी भर पडली. मंडळ त्यांचे आभारी आहे.

धुळे येथील प्रसिद्ध शाहीर श्री. करीम शेख फतरू व श्री. क्षीरसागर, नवग्रही यांनी आपल्याकडील जुन्या तलवारी मंडळाच्या वस्तुसंग्रहालयाला भेट म्हणून दिल्या. त्यामुळे मंडळाच्या शस्त्रागारात चांगलीच भर पडली. मंडळ त्यांचेही आभारी आहे.

पी.एच.डी. अध्ययनासाठी मंडळात आलेले अभ्यासक

प्रा. ए. के. सरदेसाई, सारडा कॉलेज, नगर, प्रा. प. दौ. जगताप, नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव, श्री. श्रीपाद नांदेडकर, धुळे, सौ. अर्चना श्रीवास्तव, धुळे, प्रा. श्रीमती उज्वला नेहते, धुळे व सौ. विजया देशपांडे, धुळे, यांनी मंडळात येऊन मंडळाच्या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ घेतला. तसेच काहींनी मंडळाच्या पुराभिलेखागारातील कागदपत्रांचाही अभ्यास केला.

श्रद्धांजली

राजवाडे संशोधन मंडळाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध सर्वोदयवादी नेते परमपूज्य शिवाजीराव भावे यांचे २९/६/१९९२ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ "श्री ज्ञानेश्वरी पदकोश" हा राजवाडे संशोधन मंडळाने प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच राजवाडे मंडळातर्फे श्रद्धांजली सभा घेण्यात आली.

साभार पोच :

(१) विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक - १९९१
संपादक - प्रा. श्री. मा. कुलकर्णी
विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

(२) श्री. दत्तनाथ उज्जयिनीकर (ढोलीबुआ)
(साहित्य आणि साहित्यिक)

संपादक - डॉ. बाळकृष्ण नारायण मुंडी, उज्जयिनी

(३) द्विज बादलदास कृत गुवालियर - नामा
(दो शतक पूर्व का ऐतिहासिक हिन्दी काव्य)
संपादक - डॉ. बालकृष्ण नारायण मुंडी, उज्जैन

(४) श्री. शिवदिननाथ केसरी यांची हिन्दी पदे (भाग पहिला)
संपादक - डॉ. बालकृष्ण नारायण मुंडी, उज्जयिनी

(५) *ANUSANDHAN PATRIKA*
Research Journal of Bharatiya Anusandhan Parishad,
Ambajogai (Maharashtra) - 431 517.

(६) सीता जोस्यम (तेलुगू नाटक)
मूळ लेखक - नार्ला वेंकटेश्वरराव
मराठी अनुवाद - डॉ. नलिनी साधले
मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश,
इसामिया बाजार, हैदराबाद

(७) पाषाणभय
मूळ लेखक - श्री. नरेंद्र कोहली (हिंदी)
मराठी अनुवाद - प्रा. द. पं. जोशी
मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश

(८) लक्ष्मणा स्वयंवर अर्थात विवेक विलास
(महानुभाव पंथातील १७ व्या शतकातील
कविश्रेष्ठ डिंभ यांचे काव्य)
मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश

(९) देवभूमी गोमंतक
विनायक नारायण शेणवीं घुमे
ऑल इंडिया सारस्वत फौन्डेशन, मुंबई - १६

(१०) The penguin Atlas of Modern History (to 1815)
Colin McEvedy
Penguin Books

(११) Indian Folk Arts And Crafts
Jasleek Dhamija
National Book Trust, India

(१२) Social Reformers of Maharashtra
Y. D. Phadke
Maharashtra Information Centre, New Delhi - 110 001
(क्र. ९, १०, ११, १२ पुस्तके श्री. व. ग. हाजिरनीस यांजकडून सप्रेम भेट.)

(१३) आधार - पण आश्रय नव्हे
विमला ठकार
प्रकाशक - विमल - सत्संग - परिवार, शिवाजीनगर, पुणे-४

(१४) Defeating Depression
C. A. H. Watts
Jaico Publishing House, Bombay
(क्र. १३ व १४ श्री. र. नि. भट यांजकडून सप्रेम भेट)

(१५) तापीतीर
लेखक - श्री. गणेश कुडे
का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे

(१६) "प्राचीन मराठी हस्तलिखित" संशोधन आणि संपादन
डॉ. श्री. र. कुळकर्णी
का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे.

(१७) *PROFILES* IN CONSTRUCTIVE WORK - Brief sketches of life and work of recipient of Jamnalal Bajaj Awards -1978-1987.

(१८) *INTERNATIONAL* CONFERENCE ON CORPORATE PHILANTHROPY - 11th and 12th January, 1991, Report of the Proceedings.

(१९) जमनालाल बजाज - बोले तैसा चाले

(२०) विनोबा जीवन दर्शन - लेखक शिवाजीराव भावे
(क्र. १७, १८, १९, २० पुस्तके बालमुकुंद पौद्दार यांजकडून सप्रेम भेट)

[टीप : पुढील अंकापासून यातील निवडक पुस्तकांवर परीक्षणे प्रसिद्ध केली जातील.]

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

	पृष्ठे	उपलब्ध प्रती	रुपये
१. राजवाडे नामादी व्युत्पत्तिकोश	३३८	८७	५०
२. राजस्थान महाराष्ट्र संघर्ष (शु.पु.जोशी)	१९१	३३	३५
३. मराठ्यांच्या इतिहासाची साधने (मो.रा.जोशी)	३८७	५०	५०
४. संस्कृत भाषेचा उलगडा (वि.का.कुळकर्णी)	२१०	१०८	२५
५. ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण	१२६	४२	१०
६. विलासमणिमंजरी (प्राचीन काळातील गंजीफा खेळाची माहिती देणारा ग्रंथ)	८३	४३	१०
७. ऐतिहासिक लेखचर्चा-भाग ४ था	२२१	४०	३५
८. चर्चात्मक निबंध	२२८	५२	४०
९. ऐतिहासिक चर्चा ग्रंथ १६	२४८	२२	३५
१०. पंचीकृत विवेक-प्राचीन मराठी गद्यग्रंथ गरीबनाथ स्वामीकृत	१०३	१८	१०
११. जानकीसैंवर (सं.द.रा.भट)	२८८	५४	३०
१२. आज्ञापथ (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित	—	३००	२०
१३. अमृतानुभव ऑफसेट प्रिंट मूळ हस्तलिखित	—	३००	४०
१४. योग चिंतामणी (ऑफसेट प्रिंट)	—	२९९	४०

	पृष्ठे	उपलब्ध प्रती	रुपये
१५. वेडिया नागेश (सं.डॉ.मु.ब.शाह)	७३	२५०	१०
१६. शिवछत्रपतींची १०९ कलमी बखर (सं.डॉ.प्र.न.देशपांडे)	७४	२७५	१०
१७. नवरस रागमाला' इब्राहिम आदिलशाह द्वितीय लिखित (सं.डॉ.पंढरीनाथ रानडे)	१२९	२२५	१२
१८. संशोधक 'सुवर्ण महोत्सवी अंक'	३२३	१६०	४०
१९. संशोधक 'हीरक महोत्सवी अंक'	२२५	१५०	४५
२०. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ.प्र.न.देशपांडे)	३००	१४०	८५


विशेष सवलत : वरील २० पुस्तकांचा संच किंमत रु. ६१२ चा केवळ रु. ५०० ला मिळेल. दोन अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. टपाल खर्च वेगळा.

संशोधक त्रैमासिक : इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५९ वर्षे अविरतपणे प्रकाशित होत आहे. **जानेवारी १९८९ पासून वार्षिक वर्गणी रु.** ३५ करण्यात आली आहे. या **वर्षापासून प्रत्येक अंकाची किंमत १० रु. राहील.** वर्ष १ ते २९ वर्षांतील अंक उपलब्ध नाहीत. वर्ष ३० ते ५९ वर्षांतील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ ५०० रुपयांत उपलब्ध. (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक, कॉंग्रेसशताब्दी विशेषांक, हीरकमहोत्सवी अंक, योग चिंतामणी, आज्ञापथ यांचा समावेश आहे.)

मुख्य चिटणीस

इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळ

धुळे ४२४ ००१



सावरखेड ब्रासप्लेट्स

पो.प.नं. एल-२/डी आय् ए-१७६/९२

एक कडी जरी तुटली तरी सांधा निखळेल आणि आक्रमक शक्ती उधळतील मने दुरावली तर परदास्याचा पाश आवळेल. अशा वेळी खरी निकड भासते सामाजिक सलोख्याची, ऐक्याच्या भावनेची.

राष्ट्र म्हणजे एक विशिष्ट भूभाग नव्हे; तर समानता आणि प्रबळ इच्छाशक्ती असलेला अभेद्य ऐक्याचा जागृत समाज होय.

सारे एक राहू...
राष्ट्र महान घडवू!

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

एकसंध साखळीची
एक जरी कडी निखळेल
तरी पण नसून विनाश ओढवेल

